॥ जयतु हिन्दुराष्ट्रम् ॥



प्रा. सु. ग. शेवडे

शंभूराजे

काही खास अवतरणे

''...सभासदाने आपली बखर राजाराममहाराजांचे जिंजीस वास्तव्य असताना त्यांच्या दरबाराच्या आश्रयाने लिहून पुरी केली. त्यामध्ये संभाजीमहाराजांची नालस्ती करून राजाराममहाराजांची स्तुती करण्याचा त्यांचा हेतु स्पष्ट दिसतो. कारण त्याने संभाजीमहाराजांची केलेली नालस्ती ही जशी खोटी आहे, तशी त्याने केलेली राजाराममहाराजांची अवास्तव स्तुतीही खोटी आहे.''

–डॉ.जयसिंगराव पवार

''...मल्हार रामरावाने संभाजीमहाराजांच्या राज्यकारभाराचे (बेबंद-शाहीचे) जे चित्र रंगविले आहे, त्यास तत्कालिन कागदोपत्री काही पुरावा मिळत नाही. उलट, जी काही हाताच्या बोटावर मोजता येण्यासारखी अस्सल कागदपत्रे मिळतात, त्यावरून संभाजीमहाराज आपला राज्य-कारभार कर्तव्यनिष्ठेने, दक्षतेने व न्यायाने करीत होते असेच पुरावे मिळतात.''

–डॉ.जयसिंगराव पवार

...या संभाजीच्या चरित्राने एक प्रभावी व मंगल सत्य प्रकट केले आहे. इतिहाससाधनांच्या प्रचंड पर्वतांच्या उत्खननाच्या उलाढालीतून जुना लोकप्रसिद्ध धर्मवीर, परंतु दुर्गुणी संभाजी न सापडता एक महान विभूती असलेला संभाजी बेंद्रे यांना गवसलेला आहे. आता मराठ्यांच्या इतिहासातील एका अभिमानास्पद कालखंडाच्या पार्श्वभूमीवर एक उज्ज्वल, दिव्य व भव्य अशी संभाजीसारखी व्यक्ती उभी आहे.''

–तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

''...तेथे (शृंगारपूरला) संभाजीचा चांगला जम बसलेला सोयराबाई आणि तिच्या साहाय्यकांना बघवेना, म्हणून त्यांनी संभाजीला त्रास देण्यास सुरुवात केली; परंतु संभाजी खंबीर असल्यामुळे त्यांचे काही चालले नाही.''

–डॉ.कमल गोखले

'छत्रपती संभाजी महाराज वास्तव चरित्र प्रसार अभियान'
यासाठी प्रकाशित

शंभूराजे

लेखक

भारताचार्य, धर्मभूषण

प्रा. सुरेश गजानन शेवडे

एम्.ए., एम्.एड.

भ्रमणध्वनी ९८६७६२१७५१

धर्मसेवा प्रकाशन, चेंबूर, मुंबई ४०० ०७१

प्रकाशक :
सौ. सुमंगला सुरेश शेवडे
धर्मसेवा प्रकाशन,
डी-१२४, गावठण, चेंबूर,
मुंबई - ४०० ०७१
दूरध्वनी (०२२) २५२८४२७४

प्रथमावृत्ती
ऑक्टोबर १९९३

दहावी आवृत्ती
धर्मवीर संभाजी महाराज पुण्यतिथी,
दि. ३.४.२०११

मुखपृष्ठ
धर्मवीर संभाजी महाराज प्रतिष्ठान, पुणे ४
यांच्या सौजन्याने

मुद्रक :
मिलिंद मोहनदास
ग्राफिटेक
७, कल्याणदास उद्योग भवन,
प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५
फोन : ९८१९२०८७१२

एक लक्ष
प्रती छापण्याचा
संकल्प पूर्ण

प्रती १०,०००
'शंभूराजे' या पुस्तकाच्या एक लक्ष प्रती छापण्याचा संकल्प होता.
दहा हजाराच्या नऊ आवृत्त्या संपल्या. ही १० हजाराची दहावी आवृत्ती आहे.
मूल्य ४० रुपये



अत्यंत प्रतिकूल दैव असतांना,
सनातन धर्मकार्यासाठी जिवाचे रान करणारे
माझे परममित्र
सुप्रसिद्ध कीर्तनकार
कै. नरेंद्रबुवा हाटे
यांना ही दहावी आवृत्ती समर्पण!

- सु. ग. शेवडे

अनुक्रमणिका

प्राक्कथन (पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना)

आम्हाला सुद्धा शंभूराजांचा परिचय होता तो असाच -संभाजी हा शिवाजी महाराजांचा वडील पुत्र. आईमागे आजीने लाडाने वाढवलेला. महाराजांबरोबर आग्र्याला जाऊन आलेला. रायगडावर तरुणपणी टगेपणा करणारा. थोरातांची कमळा, तुलसी, गोदावरी आदी पोरींना नादी लावणारा, दारू पिणारा, शिवाजी महाराजांना सोडून एकदा मोगलांना जाऊन मिळालेला. महाराजांनी मोठ्या मिनतवारीने परत आणलेला. अखेर पन्हाळगडावर तुरुंगात ठेवलेला. महाराजांच्या मृत्यूनंतर संतापून, तुरुंगाचे गज तोडून रायगडावर आलेला जणू वेताळ. अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी इत्यादींना हत्तीच्या पायी देणारा, राजारामाला तुरुंगात टाकणारा. सोयराबाईला भिंतीत चिणून ठार मारणारा. आपल्या हाती सत्ता घेतल्यानंतर काही लढाया करणारा; पण अखेर औरंगजेबाच्या हाती गाफीलपणामुळे लागलेला. त्याने 'मुसलमान हो' म्हटल्यावर 'तुझी मुलगी देत असशील तर मुसलमान होतो' असे बाणेदार उत्तर देणारा आणि शेवटी औरंगजेबाकडून हाल हाल होऊन मारला गेलेला असा उग्रप्रकृती, अविचारी, व्यभिचारी! शिवरायांचे राज्य बुडविणारा, सूर्यापोटी शनीश्वर!

आता अभ्यास करताना असे लक्षात येते की, आम्हाला शंभूराजे कळलेच नव्हते. जे दुर्गुण कळले होते ते त्यांच्यात नव्हतेच. जे सदगुण त्यांच्यात होते ते कुणी सांगितलेच नाहीत. ते वीर होते, त्यांना प्रेमवीर बनविले. ते संस्कृत भाषेत निष्णात होते. हिंदी-संस्कृतात त्यांचे ४ काव्यग्रंथ आहेत हे आम्हाला कुणी कधी बोललेही नाही! वयाच्या ९ व्या वर्षापासून राजकारणाचे धडे ते घेत होते. मोअज्जमच्या छावणीत शिवरायांनी त्यांना २ वर्षे मनसबदार म्हणून पाठविले होते. त्याच वेळी ते शूर आणि शत्रूंना भीती निर्माण करणारे ठरले होते, ११ व्या-१२ व्या वर्षी! राजगडावरील सदरेवरून ते राज्यकारभारात लक्ष घालू लागले. १७ व्या वर्षी रायगडावर युवराज म्हणून घोषित झाले. १९ व्या वर्षी पन्हाळा, शृंगारपूर आणि प्रभावलीचे सरसुभेदार म्हणून नेमले गेले. त्यानंतर महाराजांच्या मृत्यूपर्यंत रायगडावर चार वर्षांत कधी आलेच नाहीत. महाराज दीड वर्ष दक्षिणदिग्विजयाला गेले, तेव्हां पन्हाळ्याहून त्यांनी युक्तिप्रयुक्तीने मोगली आक्रमण रोखून धरले. महाराज परत

आल्यावर राजनैतिक कारस्थान म्हणून ते एक वर्ष दिलेरखानकडे मोगलांना सामील झाल्याचा बहाणा करून गेले. परत आल्यावर जालन्याकडील लढाईवर गेले तेव्हां त्यांचे वय २ वर्षांचे होते. त्याच सुमारास महाराज निधन पावले. महाराजांच्या निधनाचे वृत्त आणि रायगडावरील राजारामाला गादीवर बसविण्याचे कारस्थान त्यांना कळले, पन्हाळ्यावर! पण ते संयमाने तेथेच राहिले. त्यानंतर त्यांनी कारभार पन्हाळ्याहून चालविला. हजारो मराठे तेथे येऊन त्यांना मिळाले. परंतु रायगडाच्या कटकऱ्यांनी पन्हाळ्यावर जाऊन त्यांना अटक करायचा प्रयत्न केला, तेव्हां त्यांनाच अटक करून शंभूराजे रायगडावर आले. ही गोष्ट महाराजांच्या मृत्यूनंतर अडीच महिन्यांनंतरची आहे; पण रायगडावर आल्यावर त्यांनी सर्वांना क्षमा करून आपापल्या पदांवर पुन्हा नेमले. त्यानंतर सात महिन्यांनी स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला. सोयराबाईंना भिंतीत चिणले नाही की राजारामाला तुरुंगात टाकले नाही. त्यानंतर सहा महिन्यांनी पुन: त्याच रायगडाच्या कटकऱ्यांनी शंभूराजांनी विषप्रयोग करण्याचा प्रयत्न केला, तेव्हां मात्र शंभूराजांनी गय न करता त्या सर्व कारस्थान्यांना देहान्त शिक्षा दिल्या. त्यातही सोयराबाईंचा अपवाद! पण त्यांना नजरकैदेत मात्र टाकले. पुढे दोन महिन्यांनी त्यांनी आत्महत्या केली. त्यांच्या कारकीर्दीचा एकूण आठ वर्षे आणि आठ महिन्यांचा काळ विलक्षण धामधुमीचा ठरला. सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज आणि मोगल हे चार शत्रू, त्यातही मराठेशाही नष्ट करण्याची प्रतिज्ञा घेऊन महाराष्ट्रात जातीनिशी उतरलेला महाशत्रू औरंगजेब! या अल्पकाळात सुमारे सव्वाशे लढाया शंभूराजांनी केल्या. औरंगजेबाने चिडून जमिनीवर आपली पगडी आपटली आणि शंभूराजांचे पारिपत्य केल्याशिवाय पगडी डोक्यावर न घालण्याची प्रतिज्ञा केली. त्याच्या सात लाख फौजेशी आपल्या बेताच्या सामर्थ्यानिशी उणीपुरी नऊ वर्षे शंभूराजांनी झुंज दिली. हा जगाच्या इतिहासातला अपूर्व पराक्रम आहे. कोणत्याही गाफिलपणामुळे नव्हे, तर कर्तव्य पार पाडताना शंभूराजांना अटक झाली तेव्हां त्यांना बत्तीसावे वर्ष होते. त्यांचे डोळे फोडले, जीभ तोडली, पण ते शरण गेले नाहीत. बावीस दिवस अतोनात हालहाल करून बादशहाने शेवटी त्यांच्या देहाचे तुकडे तुकडे करून ठार केले तरी ते झुकले नाहीत. हे शंभूराजे आमच्या महाराष्ट्राला माहीतच नाहीत. आपले खापरपणजोबा बाळाजी आवजी चिटणीस यांना हत्तीच्या पायी देण्यात आले, याचा सूड शंभूराजांच्या मृत्यूनंतर १२२ वर्षांनी मल्हार रामराव चिटणीस याने घेतला आणि सभासदाच्या मूळच्याच मसालेदार बखरीत खोट्यानाट्याचा मसाला बेमालूम घुसडून देऊन

संभाजीचरित्र लिहिले. संभाजीराजांना व्यसनी ठरविले यानेच! स्त्रियांशी अनैतिक संबंध चिकटविले यानेच! पन्हाळ्याच्या सरसुभेदाराला कैदी बनवला, याच्याच सुपीक मेंदूने! सोयराबाईंना भिंतीत चिणून मारण्याचा जावईशोध याचाच! संभाजी महाराज अत्यंत धर्मनिष्ठ व साधुसंतांचा आदर करणारे होते याचे असंख्य पुरावे असताना मल्हार रामराव मात्र 'न्यायाची रीत राहिली नाही. देवाब्राह्मणाचे ठाईही निष्ठा राहिली नाही.' असे बेछुट विधान करतो! शिरकाण म्हणजे शिर्क्यांची संपत्ती, प्रदेश असा अर्थ असताना शिर्क्यांची कत्तल केल्याची कल्पित कथाही ठोकून देतो! शेवटी कवि कलशाच्या नादाने शंभूराजे बेहोष होऊन संगमेश्वरात असताना त्यांना अटक झाली अशीही लोणकढी थाप सरळ हाणतो.आणि ही मल्हार रामरावाची बखर इतकी बहुप्रसव ठरली, की सत्यासत्याचा परामर्ष न घेता कथा-कादंबरीकारांनी, नाटककारांनी, कवींनी, साहित्यिकांनी, चित्रपट निर्मात्यांनी खोट्या शंभूचरित्राच्या इमारती रचल्या. कवी बी यांच्या कल्पित काव्यावर 'थोरातांची कमळा' हा चित्रपट निघाला. शिवभक्तांनी शिवरायांच्या न्यायनिष्ठुरतेचा नमुना दाखवताना शंभूराजांचा मात्र नाहक बळी दिला. हा प्रकार आणखीही अनेक शिवभक्तांनी केला आहे, इतिहासकारांनीही केला आहे. कै.वा.सी. बेन्द्रे यांनी चाळीस वर्षे कष्ट करून इतिहासाचा ढिगारा उपसला आणि त्यातून त्यांना शंभूराजांचे दिव्य-भव्य चरित्र हाती लागले. त्यानंतर मात्र शंभूराजांनी अनेक विद्वानांना आकृष्ट केले व दिव्य दृष्टी दिली. डॉ. कमल गोखले यांनी 'शिवपुत्र संभाजी' हे अप्रतिम पुस्तक लिहिले. डॉ.जयसिंगराव पवार यांनी 'छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ' संपादन करून अपूर्व कामगिरी केली. श्री. विजय देशमुख यांनी शंभूराजांचे 'राजा शंभूछत्रपती' हे गुणगान करणारे रसाळ तेजस्वी चरित्र लिहिले. आणखीही काही निर्मिती होत आहे आणि होईल. एवढे खरे की, मल्हार रामरावाने शंभूचरित्राचे जे पाणी वेगळ्या पाटाने वळवले, ते पुनः मूळ पाटात आणून सोडण्याचे काम कै.वा. सी. बेंद्रे यांनी केले.

माझी तळमळ अशी आहे की, सामान्य वाचकाला परवडेल अशा किंमतीत, सामान्य वाचकाला वाचवेल अशा सोप्या व बाळबोध भाषेत एक छोटे शंभूराजे चरित्र लिहावे आणि त्याच्या किमान एक लाख प्रती निघाव्यात. त्याचा महाराष्ट्रभर प्रसार व्हावा. गेली पावणेदोनशे वर्षे एका महान राष्ट्रपुरुषाची जी आपण सर्वांनी अवहेलना केली त्याचे पाप धुवून काढण्याचा हा एक मार्ग आहे असे मला वाटते.

नव्या पिढीला तरी हे पाप न लागो एवढीच सदिच्छा, याच हेतूने हे चरित्र लिहिले आहे.

या चरित्रलेखनासाठी - विशेषतः कै. वा. सी. बेंद्रे, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. कमल गोखले, श्री. विजय देशमुख यांच्या पुस्तकांचा भरपूर उपयोग झाला. त्यांचे ऋण व्यक्त करताना मला कर्तव्यपूर्तीचे समाधान लाभत आहे. माझ्या मनात शंभूराजांच्याबद्दल जो आदरभाव उत्पन्न झाला त्याचे मूळ कारण, सांगली येथील श्रीशिवप्रतिष्ठानचे प्रणेते श्री. संभाजीराव भिडे यांनी प्रथम मला हा दृष्टिकोन देऊन शंभूचरित्र अभ्यासण्याची प्रेरणा दिली. त्यांच्याच सूचनेवरून मी शंभूराजांचे आख्यान व चरित्र कीर्तनकारांसाठी तयार करून साठ कीर्तनकारांना दिले.

कोकणातील डेरवण येथे श्री शिवसमर्थ गडाचे भव्य स्थान ज्यांनी निर्माण केले, लक्षावधी लोकांच्या अंतःकरणात आपल्या आध्यात्मिक सामर्थ्याने व व्यावहारिक चातुर्याने ज्यांनी धर्माची प्रतिष्ठापना केली, ते भगवत्स्वरूप सत्पुरुष प. पू. श्री. दिगंबरदास महाराज यांची मला सतत प्रेरणा लाभली.

शंभूराजांचे हे चरित्र लिहायला आणि 'वास्तव चरित्र अभियान' चालवायला मला सर्वांत जास्त उत्साह दिला, तो डॉ. जयसिंगराव पवारांनी! या सर्वांचे ऋण माझ्यावर मोठेच आहे व त्याचाच परिपाक म्हणजे हे चरित्र आहे.

आमच्या अनेक स्नेह्यांनी व शंभूराजांच्या भक्तांनी मला हे पुस्तक स्वस्तात प्रकाशित करण्यासाठी उदार व प्रसिद्धिनिरपेक्ष आर्थिक साहाय्य केले.

पुण्याचे माजी उपमहापौर श्री. सुरेश नाशिककर यांनी 'धर्मवीर संभाजी प्रतिष्ठान, पुणे ४' तर्फे प्रकाशित श्री. शंभूराजांच्या रंगीत चित्राचा मुखपृष्ठासाठी उपयोग करण्यास मान्यता दिली, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

माझे मित्र श्री.मुकुंदराव दाते यांनी आपल्या यशवंत मुद्रणालयात सदर पुस्तक सुबकपणे व रास्त दरात, वेळेवर छापून दिले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

—सु. ग. शेवडे

चेंबूर,
९ ऑक्टोबर १९९३

कशासाठी हा प्रपंच ? दहाव्या आवृत्तीची प्रस्तावना

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे चरित्र, जे आजपर्यंत लोकांपुढे आले आहे, ते धादांत खोटे आहे. अमुक एका प्रसंगी शंभूराजांनी नशापाणी केले होते असा एकही प्रसंग विश्वासार्ह ऐतिहासिक कागदपत्रांत नाही. तरीही शंभूराजे म्हणे व्यसनी होते! थोरातांची कमळा, गोदावरी इ. तथाकथित एकही स्त्री जन्मालाच आलेली नाही. तरीही म्हणे शंभूराजे स्त्रीलंपट! आपल्या वडिलांवर अत्यंत प्रेम व निष्ठा असणारे शंभूराजे अकस्मात एकाएकी मुघलांना जाऊन मिळतात आणि बरोबर वर्षाने परत येतात, तेव्हां शिवाजी महाराज त्यांना शिक्षा करीत नाहीत. यामागचे रहस्य शोधून काढण्याचे परिश्रम न करता म्हणे युवराज फितुर झाले ? आणि शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर अडीच महिने रायगडावरील राजारामाला गादीवर बसविण्याच्या कटाकडे दुर्लक्ष करून पन्हाळ्यावरून स्वराज्याचा कारभार शंभूराजांनी चालविला, कटकऱ्यांनी अटक करण्याचा प्रयत्न केला असताना त्यांना बंदिवासात टाकले; पण नंतर उदार अंतःकरणाने क्षमा करून त्यांनी पूर्ववत त्यांच्या पदावर नेमण्याचे सामंजस्य शंभूराजांनी दाखवले आणि पुनः त्यांनी शंभूराजांवरच विषप्रयोग करायचा प्रयत्न केला, तेव्हां मात्र त्यांना देहान्त शिक्षा दिल्या. इतके गांभीर्य व्यक्त होत असताना म्हणे शंभूराजे उग्रप्रकृती ?

आजवर या महापुरुषाला कलंकित करण्यात आले. त्यांचे संस्कृत ज्ञान, राजनैतिक पांडित्य, शौर्य, कवित्व, चातुर्य आणि बलिदान सारे सारे मलीन करून टाकण्यात आले आहे. ज्यांनी त्यांच्या देहाचे- एका हिंदवी स्वराज्याच्या रक्षकाच्या देहाचे-तुकडे तुकडे केले, त्यांच्याबद्दल संताप व्यक्त करायला यांच्या लेखण्या बोथट झाल्या, जिभा लुळ्या पडल्या आणि राजांना बदनाम करायला मात्र सरसावल्या, त्यांचा तीव्र धिक्कार असो!

आम्हाला हा अन्याय मुळीच सहन होत नाही, म्हणून रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी इ. विषयांवरचा हा प्रवचनकार शंभूराजांचे हे वास्तव चरित्र कंठरवाने जगासमोर गर्जून सांगत आहे. एक हजार व्याख्याने शंभूराजांच्या जीवनावर करण्याची आणि त्यांच्या जीवनावरील 'शंभूराजे' पुस्तकाच्या एक लक्ष प्रती छापून वितरित करायची आमची प्रतिज्ञा आहे. त्यापैकी आजअखेर ९०,००० प्रती वितरित केल्या गेल्या आहेत. आज ही **दहावी** १०,००० प्रतींची आवृत्ती प्रकाशित करीत आहोत. या विषयावर आजअखेर ९९१ व्याख्यानेही झाली! हे पुस्तक घ्या! वाचा! वाटा! विका!! कळू द्या साऱ्या जगाला, खरोखर शंभूराजे कसे होते ते!

दि. ३.४.२०११

–सु. ग. शेवडे
भारताचार्य, धर्मभूषण

डी-२१४, गावठाण
चेंबूर, मुंबई ४०० ०७१
दूरभाष : (०२२) २५२८ ४२७४

कशासाठी हा प्रपंच? दहाव्या आवृत्तीची प्रस्तावना

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे चरित्र, जे आजपर्यंत लोकांपुढे आले आहे, ते धादांत खोटे आहे. अमुक एका प्रसंगी शंभूराजांनी नशापाणी केले होते असा एकही प्रसंग विश्वासार्ह ऐतिहासिक कागदपत्रांत नाही. तरीही शंभूराजे म्हणे व्यसनी होते! थोरातांची कमळा, गोदावरी इ. तथाकथित एकही स्त्री जन्मालाच आलेली नाही. तरीही म्हणे शंभूराजे स्त्रीलंपट! आपल्या वडिलांवर अत्यंत प्रेम व निष्ठा असणारे शंभूराजे अकस्मात एकाएकी मुघलांना जाऊन मिळतात आणि बरोबर वर्षाने परत येतात, तेव्हां शिवाजी महाराज त्यांना शिक्षा करीत नाहीत. यामागचे रहस्य शोधून काढण्याचे परिश्रम न करता म्हणे युवराज फितुर झाले? आणि शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर अडीच महिने रायगडावरील राजारामाला गादीवर बसविण्याच्या कटाकडे दुर्लक्ष करून पन्हाळ्यावरून स्वराज्याचा कारभार शंभूराजांनी चालविला, कटकऱ्यांनी अटक करण्याचा प्रयत्न केला असताना त्यांना बंदिवासात टाकले; पण नंतर उदार अंतःकरणाने क्षमा करून त्यांनी पूर्ववत त्यांच्या पदावर नेमण्याचे सामंजस्य शंभूराजांनी दाखवले आणि पुनः त्यांनी शंभूराजांवरच विषप्रयोग करायचा प्रयत्न केला, तेव्हां मात्र त्यांना देहान्त शिक्षा दिल्या. इतके गांभीर्य व्यक्त होत असताना म्हणे शंभूराजे उग्रप्रकृती?

आजवर या महापुरुषाला कलंकित करण्यात आले. त्यांचे संस्कृत ज्ञान, राजनैतिक पांडित्य, शौर्य, कवित्व, चातुर्य आणि बलिदान सारे सारे मलीन करून टाकण्यात आले आहे. ज्यांनी त्यांच्या देहाचे- एका हिंदवी स्वराज्याच्या रक्षकाच्या देहाचे-तुकडे तुकडे केले, त्यांच्याबद्दल संताप व्यक्त करायला यांच्या लेखण्या बोथट झाल्या, जिभा लुळ्या पडल्या आणि राजांना बदनाम करायला मात्र सरसावल्या, त्यांचा तीव्र धिक्कार असो!

आम्हाला हा अन्याय मुळीच सहन होत नाही, म्हणून रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी इ. विषयांवरचा हा प्रवचनकार शंभूराजांचे हे वास्तव चरित्र कंठरवाने जगासमोर गर्जून सांगत आहे. एक हजार व्याख्याने शंभूराजांच्या जीवनावर करण्याची आणि त्यांच्या जीवनावरील 'शंभूराजे' पुस्तकाच्या एक लक्ष प्रती छापून वितरित करायची आमची प्रतिज्ञा आहे. त्यापैकी आजअखेर ९०,००० प्रती वितरित केल्या गेल्या आहेत. आज ही **दहावी** १०,००० प्रतींची आवृत्ती प्रकाशित करीत आहोत. या विषयावर आजअखेर ९९१ व्याख्यानेही झाली! हे पुस्तक घ्या! वाचा! वाटा! विका!! कळू द्या साऱ्या जगाला, खरोखर शंभूराजे कसे होते ते!

दि. ३.४.२०११

–सु. ग. शेवडे
भारताचार्य, धर्मभूषण

डी-२१४, गावठाण
चेंबूर, मुंबई ४०० ०७१
दूरभाष: (०२२) २५२८ ४२७४

॥ जयतु हिन्दुराष्ट्रम् ॥

मूकपदयात्रेचा अन्वयार्थ

हिन्दुस्थानच्या आजच्या सद्यस्थितींत धर्मवीर छत्रपती श्रीसंभाजी महाराजांच्या बलिदानाचा अन्वय व अर्थ पाहणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

गेल्या तेराशे वर्षांपासून यावनी आक्रमणाचा भस्मासूर हिंदुधर्म, हिंदुसमाज व हिंदुस्थान यांचा समूळ नाश करण्यासाठी, अखंडपणे प्रयत्नशील आहे. हिंदुस्थानची जीवनयात्रा संपविणें, हें त्याचे एकमेव उद्दिष्ट आहे. धर्मवीर छत्रपती श्रीसंभाजी महाराज यांची अतिक्रूरपणें, तुकडे तुकडे करून कत्तल करणारा औरंग्या, पाकिस्तान व बांगलादेशच्या रूपानें आजही, हिंदुस्थानचा सर्वंकष नाश करण्यासाठीं वखवखलेला आहे. या औरंग्याची अंत्ययात्रा काढल्यानंतरच, धर्मवीर श्रीसंभाजी महाराजांची न निघालेली अंत्ययात्रा पूर्ण होणार आहे. हे इतिहासपूत सत्य लक्षांत घेऊन, हिंदुस्थाननें या तेराशे वर्षांपासूनच्या आणि आता पाकिस्तान व बांगला देशच्या रूपांत उभ्या असणाऱ्या इस्लामी भस्मासुराचा समूळ नायनाट केलाच पाहिजे.

व्यक्तिजीवन सुखरूप होण्यासाठीं, देहांतील रोगबीज, अन्नांतील विषबीज व घरातील अग्निबीज जसें नष्ट करणें अत्यावश्यक असतें, तसेच हिंदुस्थानचे राष्ट्रजीवन चिरंतनपणें सुरक्षित होण्यासाठी, पाकिस्तानच्या रूपांतील हे शत्रूबीज हिंदुसमाजाने निःशेष संपविण्याचा ध्यास घेतला पाहिजे. पुण्यश्लोक श्रीशिवछत्रपती व धर्मवीर छत्रपती श्रीसंभाजी महाराज याचसाठीं आयुष्यभर जगले व झगडलें.

मूकपदयात्रेसाठी आवाहन

धर्मवीर छत्रपती श्रीसंभाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त, त्यांच्या न निघालेल्या अंत्ययात्रेचे स्मरण म्हणून निघणाऱ्या मूकपदयात्रेंत सहभागी होऊन संपूर्ण दिवस उपवास करून, सर्वांनी धर्मवीर छत्रपती श्रीसंभाजी महाराजांना श्रद्धांजली वाहावी.

॥ श्रीतुळजाभवानी प्रसन्न ॥

धर्मवीर छत्रपती श्रीसंभाजीमहाराज बलिदान मास

(फाल्गुन शुद्ध प्रतिपदा ते फाल्गुन अमावास्या)

पकडले गेल्याक्षणापासून, अतिक्रूर पाशवी छळ सहन करणाऱ्या, श्रीसंभाजी- महाराजांचा रोज एक एक अवयव ते निष्ठुरतेने तोडत होते. रोज अंगाची साल सोलून काढत होते. शेवटी फाल्गुन अमावास्येचे दिवशी पायापासून डोक्यापर्यंतचे देहाचे कुऱ्हाडीने तुकडे तुकडे केले. म्हणजेच श्रीसंभाजी महाराज मृत्यूच्या दिशेने, बलिदानाच्या मार्गावर, संपूर्ण महिनाभर, रोजच अति धीरोदात्तपणे चालत होते. म्हणून त्यांना फाल्गुन शुद्ध प्रतिपदेपासून फाल्गुन अमावास्येपर्यंत रोजच सामाजिक व कौटुंबिक स्तरावर संपूर्ण महिनाभर प्रत्येक दिवशी श्रद्धांजली वाहून ''धर्मवीर बलिदान मास'' पाळणे हे प्रत्येक हिंदुमात्राचे पवित्र असे आद्य कर्तव्यच आहे.

''धर्मवीर बलिदान मास'' आचरण करताना प्रत्येकाने १) धर्मवीर श्रीसंभाजी महाराजांनी शेवटच्या दिवसांत अन्नपाण्याचा त्याग केला होता हे लक्षात घेऊन, प्रत्येक धारकऱ्याने संपूर्ण मास संपेपर्यंत दिवसाकाठी एकदाच जेवावे, २) मिष्टान्न न खाण्याचा निश्चय करावा, ३) या महिना- भरात चहा पिणे, पान-तंबाखू खाणे, दूरदर्शन व चित्रपट पहाणे व पायांत पादत्राणे घालणे यांपैकी किमात एखादी तरी गोष्ट सोडावी, ४) हा महिना आपणा सर्वच हिंदू बांधवांना शोकाचा, दुःखाचा, सुतकाचा असल्यामुळे कोणत्याही आनंदाच्या, उत्सवाच्या कार्यक्रमाचे आयोजन टाळावे.

❊❊❊

।। प्रेरणामंत्र ।।

(कार्यक्रमाच्या प्रारंभी म्हणणे)

धर्मासाठी झुंजावें। झुंझोनी अवघ्यासी मारावें।
मारितां मारितां घ्यावें। राज्य आपुलें।।१।।
देशद्रोही तितुके कुत्ते। मारोनी घालावें परते।
देवदास पावती फत्ते। यदर्थीं संशोयो नाही।।२।।
देव मस्तकीं धरावा। अवघा हलकल्लोळ करावा।
मुलुख बडवावा कीं बुडवावा। धर्मसंस्थापनेसाठीं।।३।।

।। पुण्यश्लोक छत्रपति श्रीशिवाजीमहाराज की जय।।
।। धर्मवीर छत्रपति श्रीसंभाजीमहाराज की जय।।
।। भारतमाता की जय।। हिंदुधर्म की जय।।

।। ध्येयमंत्र ।।

(कार्यक्रमाच्या शेवटी म्हणावे)

शिवरायांचें आठवावें रूप। शिवरायांचा आठवावा प्रताप।।
शिवरायांचा आठवावा साक्षेप। भूमंडळी।।१।।
शिवरायांचें कैसें बोलणें। शिवरायांचें कैसें चालणें।
शिवरायांची सलगी देणें। कैसी असे।।२।।
सकल सुखांचा केला त्याग। म्हणोनि साधिजे तो योग।।
राज्यसाधनाची लगबग। कैसी केली।।३।।
याहूनी करावें विशेष। तरीच म्हणवावें पुरुष।।
याउपरीं आता विशेष। काय लिहावें।।४।।
शिवरायांसी आठवावें। जीवित तृणवत मानावें।
इहलोकीं परलोकीं उरावें। कीर्तिरूपें।।५।।

निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू।।
अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी।।६।।

।।पुण्यश्लोक छत्रपति श्रीशिवाजीमहाराज की जय।।
।।धर्मवीर छत्रपति श्रीसंभाजीमहाराज की जय।।
।।भारतमाता की जय।। हिंदुधर्म की जय।।

।।प्रतिज्ञा।।

(मूकपदयात्रेनंतर पेटविलेल्या चितेच्या साक्षीने ही प्रतिज्ञा घ्यावयाची आहे.)

आदिशक्ती माता श्रीतुळजाभवानी व काशीचा श्रीविश्वेश्वर यांना स्मरून, पुण्यश्लोक छत्रपति श्रीशिवाजीमहाराज व धर्मवीर छत्रपति श्रीसंभाजीमहाराज यांच्या दिव्य आदर्शांना साक्षी ठेवून हिंदुस्थान, हिंदुसमाज व हिंदुधर्म यांच्या आंतरबाह्य शत्रूंचे समूळ निर्दालन करण्याची व जगत्‌जननी भारतमातेच्या संरक्षणाची पवित्र शपथ आज आम्ही घेत आहोत.

।।जयतु हिंदुराष्ट्रम्।।

(धर्मवीर बलिदान मास पाळताना प्रेरणामंत्रानंतर म्हणावयाचे श्लोक)

मृत्यूस ही न डरले मनि धर्मवीर।
फुटले स्वनेत्र, तुटले जरि जीभ, शीर।।
दुर्दान्त दाहक ज्वलंत समाज व्हावा।
म्हणुनी उरात धरुं या 'शिवसिंहछावा'।।१।।

राष्ट्रांत धर्म जणु हां शरिरांत प्राण।
ही निर्मु हिंदुहृदयीं अति तीव्र जाण।।
संभाजि छत्रपति म्लेंच्छवधार्थ लढले।
धर्मार्थ देह त्यजुनी 'ध्वजरूप' झाले।।२।।

हिंदू म्हणूनि जगण्या तव वृत्ति देई।
सिंहासमान जगण्या तव तेज देई।।
शिवपुत्र! द्याल उरिचे जरी धैर्यमर्म।
मारूनि म्लेंच्छ अवघे रणिं रक्षु धर्म।।३।।

प्राणांतिही न फिरणें कधीं मार्गिं मागें।
रविवत् बना पथिं तुम्ही शिवसूत सांगे।।
उद्ध्वस्त तोडुनि करा रणिं म्लेंच्छ पाश।
संपूर्ण हिंदवि करा अपुला स्वदेश।।४।।

जाळून राख करण्या जगिं म्लेंच्छसत्ता।
हिंदूमनास शिकवू शिवपुत्रकित्ता।।
राष्ट्रातलें न उखडू जरि म्लेंच्छविष।
टिकणार नाहि कधि ही जगिं हिंदुदेश।।५।।

'संभाजिजाळ' तद्वत् 'शिवसूर्यजाळ'।
निर्मूनि हिंदुहृदयीं बनु म्लेंच्छकाळ।।
हें हिंदुराष्ट्र करुनी यवनांतकांचे।
संकल्प पूर्ण करुं या शिवभूपतींचे।।६।।

विघ्नें असंख्य जरि हीं पथ चालताना।
घालू न भीक कधिही यमयातनांना।।
धर्मार्थ आयु बलिदान करूं सहर्ष।
'संभाजि, बाजी, शिवबा' रविवत् आदर्श।।७।।

कशासाठि आणि मरावें कसें मी ?।
विचारूं स्वतःला असा प्रश्न नेहमी।।
लढूं पांग फेडावया धर्मभूचे।
अम्ही मार्ग चालूं सईच्या सुताचे।।८।।

(सर्व श्लोक म्हणून झाल्यानंतर 'शंभूराजे' या पुस्तकातील तीन पृष्ठे प्रत्येक दिवशी वाचून दाखवावीत.)

१. जन्म व बालपण

त्या वेळी शिवाजीमहाराज छत्रपती झालेले नव्हते. ते सार्वभौम राजे नव्हते. तसे ते जहागीरदारच होते; पण कुणाचीही सत्ता आपल्यावर चालवून घेत नव्हते. आदिलशाही, कुतुबशाही, मोगल इ. सारे त्यांना वठणीवर आणायला टपले होते. एका सरदाराचा बंडखोर मुलगा एवढीच त्यांची प्रतिमा होती; पण कुणालाच आवरेना असा हा बंडखोर!

उभा महाराष्ट्र त्यांच्या पराक्रमाने दिङ्मूढ झाला होता. एका नवविवाहित तरुणीवर अत्याचार करणाऱ्या रांझ्याच्या गुजर पाटलाचे हातपाय याच शिवबांनी तोडले होते. तोरणा, सिंहगड इत्यादी अनेक किल्ले त्यांनी स्वराज्यात आणले होते. रायरीच्या चंद्रराव मोरेचा बिमोड यांनीच केला होता. कल्याण-भिवंडी ते रायरीपर्यंतचा मुलुख यांनीच काबीज केला होता. यामुळे महाराष्ट्रात शिवाजी-राजांच्या नांवाचा दबदबा निर्माण झाला होता.

इकडे मे १६५७ मध्ये पुरंदर गडावर सईबाईंना प्रसूतिवेदना सुरू झाल्या होत्या. त्यांना या पूर्वी तीन मुलीच झाल्या होत्या. सखूबाई, राणूबाई आणि अंबिकाबाई; या खेपेला पुत्र व्हावा ही सर्वांची कामना होती. सारा शिवपरिवार पुत्र व्हावा यासाठी आसुसलेला होता. साऱ्यांची प्रार्थना जणू त्या जगदंबेने ऐकली आणि १४ मे १६५७, शालिवाहन शके १५७९, ज्येष्ठ शुद्ध द्वादशीला सकाळी १० वाजण्याचे सुमारास पुरंदरावर पुत्रजन्माची गोड वार्ता पसरली. भोसल्यांच्या वंशवेलीला अंकूर फुटला. नातवाला पाहून जिजाऊसाहेब अत्यंत प्रमुदित झाल्या. नातू म्हणजे दुधावरची साय - नाजुक प्रकृतीच्या सईबाईसाहेब बाळंतपणातून सुखरूप बाहेर पडल्या. गोरेपान, गुटगुटीत, अत्यंत लोभस, तेजस्वी डोळे, भरपूर जावळ, असे ते वजनदार बाळ साऱ्या पुरंदरचा जीव की प्राण बनले. सारी कामे बाजूला ठेवून शिवाजीराजे पुत्राचे मुख पाहण्यासाठी पुरंदरकडे झेपावले. श्रीशिवशंभूची कृपा म्हणून बाळाचे नाव शंभूराजे अर्थात संभाजी असे ठेवले. कदाचित जिजाऊसाहेबांच्या थोरल्या दिवंगत पुत्राची स्मृती म्हणूनही हे नांव ठेवले असेल!

श्रीरामांना तीन माता होत्या. कौसल्या, सुमित्रा आणि कैकेयी. शंभूबाळाला अनेक माता लाभल्या. सईबाई, सोयराबाई, पुतळाबाई, सगुणाबाई इ. या सर्वजणी

शंभूबाळाचे खूपच लाड करीत. त्यांची सख्खी आई कोणती हे कळणे कठीण जाई.

सईबाई हेब प्रकृतीने अगदीच नाजुक होत्या. बाळ मात्र भलताच दणदणीत. आईकडून बाळाचे पोट भरेना. बाळासाठी दाई ठेवणे आवश्यक होते. दूधआई मिळण्यासाठी शोध सुरू झाला. नसरापूरजवळील कापूरवहाळ गांवच्या गाडे पाटलाची पत्नी धाराई ही सुद्धा नुकतीच प्रसूत झालेली होती. आऊसाहेबांनी धाराईला आवतन धाडले व धाराई लगबगीने आपल्या बाळासह पुरंदरला आली. धाराईच शंभूबाळाची दूधआई झाली. महाराजांनी २६ होनांचे वार्षिक मानधन तिला दिले.

शंभूबाळ वर्षाचे झाले, तेव्हां स्वराज्यात चाळीस किल्ल्यांवर महाराजांची सत्ता होती. महाराजांनी औरंगजेबाचे प्रदेश जिंकणे, घोडे, शस्त्रास्त्रे, खजिना, रसद लुटणे इ. प्रकार दणक्यात चालविले होते. विजापूरकरांना त्यांनी पुरते पजवले होते.

विजापूरकरांनी शिवरायांना कायमचे नष्ट करण्यासाठी अफजलखानाला पाठविला; पण महाराजांनी प्रतापगडावर ११ नोव्हेंबर १६५९ ला त्याचा वध केला. अफजलखानासारख्या मातब्बर सरदाराची वाताहत झाल्याने महाराजांची सर्व शाह्यांनी धास्तीच घेतली. त्या वेळी शंभूराजे केवळ अडीच वर्षांचे होते; पण या भीमपराक्रमाने उभा महाराष्ट्र हादरलेला त्यांनी पाहिला.

दुर्दैवाने, यापूर्वी फक्त दोनच महिने (५ सप्टेंबर १६५९) शंभूबाळाच्या मातोश्री सईबाई देवाघरी गेल्या होत्या. त्या दिवशी भाद्रपद वद्य चतुर्दशी होती. यानंतर प्रतापगड-पन्हाळ-विशाळगड असे करीत कांही महिन्यांनी शंभूराजे आणि जिजाऊसाहेब यांना घेऊन महाराज आता राजगडास आले होते.

शंभूबाळ आपल्या बालपणात महाराजांच्या पराक्रमाच्या अनेक गोष्टी ऐकत होते. अफजलखानाचा वध, सुरतेची बेसुरत, सिद्दी जोहरच्या वेढ्यातून सुटका, शाहिस्तेखानाची बोटे तोडली इत्यादी साऱ्या गोष्टी ऐकतांना शंभूबाळांना खूप चेव चढत असे. शरीर अत्यंत डौलदार होते. मल्लखांब, जोर, बैठका, सूर्यनमस्कार इत्यादी व्यायाम चालूच होते. भालाफेक, दांडपट्टा, घोडदौड हेही शिक्षण चालूच होते. उमाजी पंडित आणि केशव पंडित संस्कृत भाषा, साहित्य, राजनीती, काव्य, रामायण-महाभारताचे बाळकडू देत होते. दिसामासांनी शंभूराजे आठ वर्षांचे झाले.

२. राजकीय शिक्षणाचे बाळकडू

शाहिस्तेखानासारखा मातब्बर सरदार आणि प्रत्यक्ष औरंगजेबाचा मामा शिवाजीमहाराजांकडून बोटे तुटून पराभूत होऊन परत आला, त्यामुळे संतापलेल्या औरंगजेबाने शिवबांविरुद्ध अनेक हिकमती चालविल्या होत्या; पण यश म्हणून येईना. अखेर बादशहाने मातब्बर रजपूत सरदार मिर्झा राजा जयसिंग यांच्याबरोबर सुमारे तीन लक्ष फौज देऊन शिवरायांची नामोनिशाणी मागे राहणार नाही अशी योजना करून त्यांना पाठविले. असे म्हणतात की, कोटीचंडीचे प्रचंड अनुष्ठान करून हा देवीभक्त दुसऱ्या एका देवीभक्ताचा नाश करायला निघाला होता.

ही विशाल सेना मजल-दरमजल करीत पुरंदरच्या पायथ्याशी येऊन पोहोचली. तेथे त्यांची छावणी पडली. शिवरायांना पेचात धरून त्यांनी मध्यरात्री त्यांना बोलणी करण्यासाठी छावणीत बोलावले. सारे डावपेच लक्षात घेऊन महाराज सावधपणे छावणीत उपस्थित झाले. पुरंदरचा सुप्रसिद्ध तह याच ठिकाणी झाला.

तहानुसार महाराजांना तेवीस किल्ले तात्काळ मोगलांच्या स्वाधीन करायचे होते. ते प्रत्यक्ष त्यांच्या हाती पडेपर्यंत शंभूराजे ओलीस म्हणून त्यांच्या छावणीत ठेवायचे होते. त्यानुसार शंभूराजे आणि त्यांच्यासोबत सरनौबत नेताजी पालकर काही घोडदळ व पायदळ यांच्यासह १८ जून १६६५ रोजी डेरेदाखल झाले. त्यांची छावणीत स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. आठ वर्षांचे शंभूराजे बादशाहाचे 'शाही मेहमान' झाले. त्यांची सुटका लवकर व्हावी म्हणून दोन दिवसांतच महाराजांनी किल्ले त्यांच्या स्वाधीन केले. किल्ले ताब्यात मिळताच शंभूराजे आणि सरनौबत यांची मुक्तता करण्यात आली. तथापि त्याच तहानुसार शंभूराजे यांनी पंचहजारी मनसबदार म्हणून नेमणूक स्वीकारण्याचे ठरले.

ती मनसबदारी शंभूराजांच्या नांवे बहाल करणारे शाही फर्मान २२ सप्टेंबर १६६५ रोजी मिर्झा राजे यांच्या छावणीत येऊन धडकले. ते स्वीकारण्यासाठी शंभूराजांना स्वतःला येणे आवश्यक होते. इतकेच नाही, तर ते फर्मान स्वीकारण्याची काही शाही पद्धत होती. बक्षी जानीबेग याने शाही पद्धत शंभूराजांना समजावून दिली. त्यानुसार शाही फर्मानाचा स्वीकार शंभूराजांनी केला. शंभूराजांवर मिर्झा

राजे निहायत खूष झाले आणि त्यांनी एक सालंकृत हत्ती आणि जरीचा पोशाख त्यांना भेट दिला. तीर्थरूपांच्या राजकारणानुसार शंभूराजांचे सारे काही चालू होते.

तहाच्या पुढील अटींनुसार शिवाजी महाराजांनी शंभूराजांसह बादशहा औरंगजेब यांच्या भेटीसाठी आग्र्यास जाण्याचेही ठरले होते. औरंगजेबासारख्या पाताळयंत्री, विश्वासघातकी, धर्मवेड्या बादशहाच्या राजधानीत शिरून सहीसलामत परत येणे म्हणजे मगरीच्या कराल दाढेतून सुटका करून घेणे होय, हे महाराज जाणत होते. महाराष्ट्रापासून शेकडो मैल दूर, जिथली भाषा, समाज, संस्कृती, सारे काही वेगळे, तेथे जावयाचे म्हणजे हे धर्मसंकटच होते. तरीही जगदंबेवर भार टाकून निघण्याचा महाराजांनी निश्चय केला.

५ मार्च १६६६, फाल्गुन शुद्ध ९, शके १५८७ या सुमुहूर्तावर मातोश्री जिजाऊसाहेबांच्या पाया पडून, स्वराज्याचा कारभार त्यांच्या हाती सोपवून सातशे घोडेस्वार आणि चार हजार पायदळ बरोबर घेऊन, दोन पालख्यांत दोघे बसून आग्र्याकडे निघाले. सामानाचे उंट, बैल, वंजारी व छावण्यांचे साहित्य असा लवाजमा आग्र्याकडे जाण्यासाठी निघाला. नऊ वर्षांचे शंभूराजे हे सारे पाहत होते, अनुभवित होते. सदुसष्ट दिवसांचा प्रदीर्घ प्रवास! मजल-दरमजल करीत, क्वचित विश्रांती घेत घेत हा सारा लवाजमा ११ मे १६६६ रोजी आग्र्याच्या सीमेवर पोहोचला. ११ मे हा औरंगजेबाचा ५० वा जन्मदिवस होता. आपल्या पित्याला, शहाजहान बादशहाला तुरुंगात टाकून औरंगजेब बादशहा झाला होता. तो नुकताच आग्र्याला मृत्यू पावला होता, म्हणून बादशहाने आपला वाढदिवसाचा दरबार आग्र्यात भरविण्याचे ठरविले होते. शाही वैभवाचा झगमगाट त्याला जगाला दाखवायचा होता. सर्व मांडलिक राजे, सरदार, दरकदार, मोठे मोठे अधिकारी त्याने दरबारात आमंत्रित केले होते. याच दरबारात शिवाजी महाराजांना शंभूराजे यांचेसह उपस्थित राहणे आवश्यक करण्यात आले होते.

महाराजांचा भव्य लवाजमा पाहण्यासाठी वाटेत सर्वत्रच खूप गर्दी होत असे. त्या शिस्तबद्ध मिरवणुकीत दोन पालख्या हा मुख्य आकर्षणाचा विषय होता. एकीत होते शिवाजीराजे तर दुसरीत शंभूराजे! दोन्ही अपूर्व देखणी, तेजस्वी व्यक्तिमत्त्वे! सारा लवाजमा त्या रात्री आग्र्याच्या सीमेवर थांबला.

दि.१२ मे १६६६ ला सकाळी लवकरच दरबारात जाण्याची सर्व सिद्धता झाली. रामसिंगचा मुन्सी गिरधरलाल महाराजांच्या मुक्कामी आला आणि त्याने दरबारात वेळेवर पोचण्यासाठी पालखीतून न येता घोड्यावर स्वार होऊन निघण्याची सूचना

केली. सारा लवाजमा बाजूला ठेवून महाराज व शंभूराजे घोड्यावर स्वार झाले. रस्त्यावरील गर्दीतून मार्ग काढीत दोघेही दरबाराकडे निघाले. बरोबर गिरीधारीलाल होताच. महाराजांना सामान्य स्वाराप्रमाणे लगबगीने घोड्यावरून जावे लागले.

दरबाराचे वैभव, सर्वत्र हिरवे झेंडे, नौबत, कर्णे, शिंगे यांचा गजर, उत्तमोत्तम कपडे घातलेले दरबाराकडे जाणारे मानकरी, ऐश्वर्याने भरलेला बाजार, सारेच शंभूराजांना चकित करीत होते.

दुपारी साडेबारा-एक वाजण्याचा सुमार असावा. आग्र्यातील भयानक उन्हाळा भाजून काढीत होता. धूळ प्रचंड उडत होती. अपमानाचा अंगार मनाला जाळीत होता. महाराष्ट्राचा सिंह आग्र्याच्या भर रस्त्यातून घोड्यावरून चालला होता. त्याची तिथल्या उष्ट्या अन्नावर पोसलेल्या बोकडांना तमा नव्हती.

दिवान-ई-आम आणि दिवान-ई-खासचे दोन्ही दरबार संपवून बादशहाचा शाही दरबार घुसलखान्यात भरला होता. समोर उंच आसनावर बादशाह लोडाला टेकून बसलेला, त्याच्यापुढे शहाजादे आणि वजीर! आणि त्यानंतर वेगवेगळ्या एकामागे एका ओळीत आपापल्या अधिकारानुसार आदबीने उभे राहिलेले सरदार!

दरबारात प्रवेश करताच महाराजांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. एका सामान्य पंचहजारी सरदारापेक्षा महाराजांना तेथे वेगळे स्थान नव्हते. महाराजांच्या हातून मार खाऊन पळालेले सरदारही महाराजांच्यापुढे उभे होते. दरबारातील रिवाजाप्रमाणे महाराजांनी नजरनिसारचे द्रव्य बादशहापुढे अर्पण केले. तसे शंभूराजांनी सुद्धा केले; पण त्यांच्याकडे कुणीच लक्ष दिले नाही. हेतुपूर्वक त्याची उपेक्षा चालली हाती. मानाचा विडा महाराजांना देण्यात आला; पण मानाची वस्त्रे त्यांना वगळून बाकीच्यांना देण्यात आली.

पदोपदी होणाऱ्या अपमानामुळे महाराजांच्या मनातील ज्वालामुकी उफाळून निघाला. आतापर्यंत राखलेला संयम महाराजांनी झुगारून दिला. आपली फसवणूक झाली असून, हेतुपूर्वक आपला इथे बोलावून अपमान करण्यात आला आहे, हे लक्षात घेऊन महाराज ताडताड निघाले आणि मागच्या एका खांबाजवळ जमिनीवर बसले. बादशहा हादरला. त्याने रामसिंगाला सांगितले की, शिवाजीची समजूत काढ; पण तो जवळ येताच महाराज कडाडले, 'तू मला ओळखतोस, तुझा बाप मला ओळखतो, तुझ्या बादशहालासुद्धा मी कोण आहे हे माहीत आहे, मला रांगेत उभे करावे असा का मी माणूस आहे?' हे सर्व त्या दरबाराला विलक्षण होते. बादशहाच्या सूचनेवरून समजूत घालण्यासाठी आकीलखान, मुखलिसखान इत्यादी

हस्तक मानाची वस्त्रे घेऊन महाराजांच्या जवळ आले. महाराज पुन्हा गरजले, ''चाहे मेरा सिर काटकर ले जाओ! मैं बादशहाजी की हजुरी नहीं चाहता!''

शेवटी रामसिंगाने बादशहाच्या आज्ञेनुसार महाराजांना त्यांच्या मुक्कामाच्या सराईत नेले. आज शंभूराजांना शिवरायांच्या स्वाभिमानाचा आणि निर्भयतेचा प्रत्यय आला. लाळघोट्या सरदार-दरकदारांपेक्षा आपली स्वाभिमानी जातकुळी कशी अगदी वेगळी आहे हे शंभूराजांना जाणवले. नव्हे , नव्हे- आज त्यांना स्वाभिमानाचा आणि निर्भयतेचा आपल्या तीर्थरूपांकडून वस्तुपाठ मिळाला.

सायंकाळी महाराजांना भेटून रामसिंगाने समजूत घालण्याचा प्रयत्न केला आणि दुसऱ्या दिवशी दरबारात येण्यास सुचविले. महाराजांनी शंभूराजांना पाठविले; पण स्वतः पुनः दरबारात गेले नाहीत. बादशहाने शंभूराजांचा सन्मान केला. रत्नजडित कट्यार आणि मोत्यांचा कंठा त्यांना भेट म्हणून दिला. मानाची वस्त्रे दिली. शंभूराजे रोज सकाळ-संध्याकाळ दरबारात जात. महाराज येत नाहीत याचा बादशहाला मनातून राग होता. अखेर दि. २५ मे १६६६ रोजी बादशहाने शिवाजी महाराजांना नजरकैदेत ठेवले. एक हजार सैनिकांसह फौलादखान त्यांच्यावर नजर ठेवून होता.

❋❋❋

अभिप्राय क्र.१

डॉ. जयसिंगराव पवार, एम.ए., पीएच.डी.
'शिवतेज' १०८ सानेगुरुजी वसाहत,
राधानगरी रोड, कोल्हापूर ४१६ ०१२, महाराष्ट्र राज्य
फोन - २२७६४२ दि. ३०-११-१९९३

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून महाराष्ट्रात चैतन्याचे एक नवे युग सुरू केले; पण त्यांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजी महाराजांनी औरंगजेब बादशहासारख्या महाबलाढ्य शत्रूशी सतत ९ वर्षे निकराचा लढा देऊन या हिंदवी स्वराज्याचे रक्षण केले. शिवराय हे हिंदी स्वराज्याचे 'संस्थापक', तर 'शंभूराजे' स्वराज्याचे 'संरक्षक' बनले. अशा पराक्रमी शंभूराजांची जनमानसातील विकृत प्रतिमा पुसून त्या ठिकाणी तेजस्वी प्रतिमा उभी करण्याचे महत्कार्य प्रा.शेवडे यांनी अंगिकारले आहे. प्रस्तुत पुस्तिका हा अशा कार्याचाच एक भाग असून, तिच्या माध्यमातून शंभूराजांच्या पराक्रमाचे व तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन ते महाराष्ट्रातील लाखो घरांत घडवीत आहेत, त्यांच्या या उपक्रमास हार्दिक शुभेच्छा!

डॉ.जयसिंगराव पवार
कोल्हापूर

३. आगऱ्याहून सुटका

नजरकैदेत मुख्यतः महाराज होते. महाराजांच्या सेवकांना, शंभूराजांना व अन्य मंडळींना बाहेर जाण्यास बंदी नव्हती. महाराजांनी आपली संपूर्ण सेना व लवाजमा राजगडाकडे परत पाठवला. मोजकी मंडळी जवळ ठेवली होती. येथून सटकण्याचा योग्य मार्ग महाराज पाहात होते. इतक्यात कल्पना सुचली. तो श्रावण महिना होता. श्रीकृष्णजन्माचा मोठा उत्सव उत्तरेकडे होत असतो. त्यानिमित्त महाराजांकडून बादशहाच्या परवानगीने रोज मिठाईचे पेटारे फकीर, बैरागी इत्यादींना वाटण्यासाठी बाहेर पडू लागले. १७ ऑगस्ट १६६६ ला शुक्रवार होता. बादशहा व सर्व अधिकारी जुम्मा मशिदीत नमाज पढण्यासाठी गेले. ती वेळ साधून महाराज शंभूराजांसह पेटाऱ्यात बसून युक्तीने बाहेर पडले. हिरोजी फर्जंद महाराजांच्या जागी झोपून राहिला होता, त्यामुळे महाराज बाहेर पडल्याचे कुणालाच कळले नाही.

कवी कलश आणि कायस्थ सक्सेना हे दोन उत्तरभारतीय पुरुष महाराजांनी आपल्या सेवेत ठेवले होते. ते त्याच परिसरातील असल्यामुळे उत्तम माहितगार होते. गावाबाहेर तीन कोसांवर पेटारे आले. तेथे घोडे सिद्ध ठेवण्यात आले होते. त्यांवर स्वार होऊन शंभूराजांसह महाराज मथुरेकडे निघाले. कवी कलश, कायस्थ सक्सेना, निराजीपंत, दत्ताजीपंत, बाजी जेधे इ. मंडळीही मथुरेस आली. मोरोपंत पेशव्यांची बहिण मथुरेस काशीपंतांना दिली होती. तेथे सर्व मंडळी थडकली. शंभूराजांना काशीपंतांकडे ठेवून महाराज, निराजीपंत इ. सह बैरागी वेषात राजगडास सुखरूप परतले.

इकडे महाराजांचे उर्वरित सेवकवर्ग, हिरोजी फर्जंद,मदारी मेहतर, त्र्यंबकपंत, रघुनाथपंत इत्यादी मंडळींना आग्र्याहून सुखरूप बाहेर काढण्याचे काम कवी कलश आणि कायस्थ सक्सेना करणार होते. त्यासाठी नियोजित गुप्त जागी ते वाट पहात बसले; पण महाराजांना मार्गी लावून परत येईपर्यंत महाराज पळून गेल्याची बातमी आग्र्यात पसरली. शहराची नाकेबंदी करण्यात आली आणि कसून शोध करण्यात आला, तेव्हां वरील सर्व मंडळी सापडली. त्यांचा खूप छळ करण्यात आला; पण कुणीही तोंड उघडले नाही आणि शिवाजी महाराजांबद्दल काही सांगितले नाही. महाराजांची मुक्तता होऊन ते सुखरूप राजगडावर आल्यामुळे राजगड आनंदाने

डोलत होता; पण महाराजांनी शंभूराजांचे वाटेत निधन झाल्याची कंडी पिकवून दिली. त्यांचे और्ध्वदेहिक सुद्धा केले. त्यामुळे ही बातमी आग्र्याला पोचून शंभूराजांचा शोध कुणी घेतला नाही आणि नसता ससेमिरा त्यांच्यामागे लागला नाही.

महाराजांनी राजगडावर परत येताच मथुरेला दूत पाठविले आणि शंभूराजांना घेऊन दक्षिणेस येण्याची काशीपंतांना सूचना केली.

नऊ वर्षांच्या शंभूराजांना बरोबर घेऊन कृष्णाजीपंत, लक्ष्मीबाई आणि त्रिमलपंत पिंगळे दक्षिणेस यायला निघाले. वाटेत शंभूराजे हे आपलेच पुत्र आहेत असे त्यांनी त्यांना वागविले. मराठ्याचा मुलगा या ब्राह्मण कुटुंबात कसा असे कुणालाही वाटू दिले नाही. शिवाय मथुरेच्या वास्तव्यात कृष्णाजीपंतांनी संस्कृत स्तोत्रे, तसेच संस्कृत व्याकरणही त्यांच्याकडून घोकून घेतले होते. शंभूराजांना तेंव्हापासून संस्कृत भाषेच्या अभ्यासाची गोडी लागली होती. त्यामुळेच पुढे ते संस्कृत भाषेत काव्यसुद्धा करू शकले. मथुरेतल्या वास्तव्यातही त्या ब्राह्मण कुटुंबात ते ब्राह्मणमुलाप्रमाणे सांभाळले गेले.

दोन महिने पायी प्रवास, मजल-दरमजल करीत, २० नोव्हेंबर १६६६ ला ही मंडळी राजगडावर येऊन पोहोचली. शंभूराजे सुखरूप परत आलेले पाहून त्यांच्या सापत्न मातांना आणि विशेष तर त्यांच्या आजीला, जिजाऊसाहेबांना आनंदाचे भरते आले. शिवरायांच्या धीट कल्पकतेचा सर्वांनाच प्रत्यय आला. सारा राजगड आनंदाने नाचू लागला.

शंभूराजांच्या जीवनातील हा आठ महिन्यांचा कालखंड त्यांना खूप काही शिकवून गेला. त्यापैकी पांच महिने तर ते प्रत्यक्ष महाराजांच्या सहवासात राहून राजकीय तालीम घेत होते. महाराजांचे शौर्य, धैर्य, कल्पकता, वैभव, वैराग्य, राजकारण, गनिमी कावा, स्वकीय-परकीय, श्रेष्ठ-कनिष्ठांशी वागणुकीची रीत, हे लाखमोलाचे शिक्षण शंभूराजांना या अवधीत मिळाले. त्याचबरोबर सामान्य मध्यमवर्गीयांचे जीवन, साधेपणा, धर्मनिष्ठा, आचारशुद्धता, पापभीरुता, ज्ञानलालसा इ. गोष्टीही त्यांना सानुभव शिकायला मिळाल्या.

अर्थात त्यामुळे नऊ वर्षांचा बालक विचाराने व अनुभवाने प्रौढ बनला.

४. कार्यानुभव

शिवरायांच्या सुटकेमुळे अवघा महाराष्ट्र आनंदित झाला होता; पण दिल्लीश्वर मात्र संतापाने बेभान झाला. जे जे हाती सापडले त्यांचा त्याने अतोनात छळ केला. राखेचे तोबरे दिले. चाबकाने पाठी फोडून काढल्या. नेताजी पालकरला 'महंमद कुलीखान' म्हणून जगणे भाग पडले. महाराजांनी काळवेळ ओळखून यशस्वी माघार घ्यायचे ठरविले. त्यांनी बादशहाला क्षमायाचनेचे पत्र धाडले. शहाजादा मोअज्जमने त्यावर आपली शिफारस लिहिली. 'सिवा आता पश्चाताप पावला आहे.'

पूर्वी तहात ठरलेली मनसबदारी संभाजीला पुन: देण्यात यावी.बादशहाने हे मान्य केले. त्यानुसार शंभूराजांनी औरंगाबादेस बादशाही छावणीत सेवेस रुजू होणे, त्याला सुभेदारी देणे इ. गोष्टी मोअज्जमला कळवण्यात आल्या. हे वृत्त राजगडावर कळविण्यात आले. ९ ऑक्टोबर १६६७ या दिवशी भाऊबीज होती. शंभूराजे दहा-साडेदहा वर्षाचे. महाराजांनी त्यांना औरंगाबादेसाठी निरोप दिला. सोबत प्रतापराव गुजर, आनंदराव, निराजीपंत, प्रल्हादपंत इ. खास मंडळी आणि १०,००० सैन्य दिले. १८ दिवसांनी शंभूराजे औरंगाबादेस पोचले. शहाजाद्याने सन्मानपूर्वक त्यांचे स्वागत केले. हत्ती, घोडे, वस्त्रे, अलंकार इ. प्रदान केले. तसेच १५ लक्ष होनांचा वऱ्हाडचा मुलुख जहागीर म्हणून दिला. शंभूराजे आता मोंगली मनसबदार आणि वऱ्हाडचे जहागिरदार झाले. शंभूराजांबरोबर गेलेल्या अधिकारी व्यक्तींचाही शहाजाद्याने वस्त्रालंकार देऊन सत्कार केला. ५ नोव्हेंबर १६६७ ला औरंगाबादहून निघून शंभूराजे राजगडास आले. त्यानंतर ते शहाजाद्याकडे वारंवार जात-येत असत. २ ऑगस्ट १६६८ पासून प्रतापराव गुजर आणि निराजी राहूजी हे आपल्या १०,००० सैन्यानिशी औरंगाबादेत शहाजाद्यापाशी राहात. संभाजीराजांकडे खानदेश-वऱ्हाडची सुभेदारी असताना त्या प्रदेशांच्या बंदोबस्तासाठी शिवाजी महाराज नेहमी कमी-अधिक सैन्य पाठवित असत. प्रतापराव व आनंदराव शंभूराजांना घेऊन स्वारीवर जात.अशाप्रकारे प्रत्यक्ष युद्धाचेही शिक्षण शंभूराजांना मिळत होते. शिवाय राजकारणी डावपेचही शिकावयास मिळतच होते.शंभूराजे मोगलांचे पंचहजारी मनसबदार होते, तरी याच काळात महाराजांच्या मराठा सैन्याने जव्हार, रामनगर, दमणपर्यंतचा मुलुख स्वराज्याला जोडला.दरम्यान महाराजांच्या इच्छेनुसार

''शाहजाद्यांची व शंभूराजांची खूपच दोस्ती जमली. ते एकमेकांशी वारंवार खलबते करू लागले. ही गट्टी इतकी जमली, की त्यांचेकडून एकमेकांत गुप्त असे काहीच राहत नसे'' असे ॲबे कॅरे म्हणतो. शहजादा मोअज्जम (तथा शहाअलम) औरंगजेबाकडून खूप त्रस्त झाला होता. म्हणूनच तो या दूर प्रदेशात येऊन राहिला होता. औरंगजेब त्याच्यावर अविश्वास दर्शवित असे. त्याच्याजवळ भरपूर सैन्य होते व त्यातील अनेक अधिकारी त्याच्या बाजूचे असून, प्रसंगी औरंगजेबाविरूद्ध बंडही करू शकतील असे होते. असा सर्व मजकूर शंभूराजांनी आपल्या वडिलांना कळविला. शिवाजीराजांनी या संधीचा फायदा करून घेतला आणि क्रमाक्रमाने आपले सर्व गेलेले किल्ले परत मिळविण्यास आरंभ केला. हे करीत असतां मोअज्जम त्यांना विशेष प्रतिकार करीत नसे. पुढे डिसेंबर १६६९ मध्ये हे संधान तुटले आणि प्रतापराव गुजर व आनंदराव राजगडाकडे आपल्या सेनेसह परत आले. पुढे १ मे १६७० पर्यंत महाराजांनी आपले प्रदेश पुनश्च मिळविण्याचे उद्योग जोमाने चालू ठेवले होते. अशाप्रकारे शंभूराजांना राजकारणाचा कार्यानुभव उत्तमप्रकारे प्राप्त झाला.

अभिप्राय क्र. २

शिवकथाकार विजय देशमुख
श्रीव्यंकटेश, ८० जयप्रकाश नगर,
खामला, नागपूर ४४० ०२५ / फोन २५२५ ०७५

आपण अगत्यपूर्वक पाठविलेले 'शंभूराजे' हे छोटेखानी चरित्र यथासमय मिळाले. एकाच बैठकीत ते वाचून काढले. धर्मवीर छत्रपती संभूराजांच्या चरित्रावरील काजळी प्रभावीरीत्या दूर करण्याचा आपला प्रयत्न निश्चितच यशस्वी झाला आहे. आपली तळमळ लेखनातून पानोपानी लक्षात येते. नामवंतांची अवतरणे व जोडलेली परिशिष्टे पुस्तकाचे ऐतिहासिक मूल्य वाढविणारी आहेत. अशा लेखनाची सध्या नितांत आवश्यकता आहे. नव्हे, हे आज अवश्य भावी ठरणारे धर्मकार्यच आहे. या चरित्राच्या १० हजार प्रती उण्यापुऱ्या महिनाभरातच संपाव्यात यातच आपले यश सामावलेले आहे. आपले मनःपूर्वक अभिनंदन. या पुस्तकाच्या लक्षावधी प्रती महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातच नव्हे, तर जिथेजिथे मराठी माणूस आहे तिथे-तिथे पोचायला हव्यात. धर्मवीर छत्रपती संभाजीमहाराज वास्तवचरित्रप्रसार अभियानाच्या माध्यमातून हे कार्य निश्चितच सिद्धीस जाईल, असा विश्वास वाटतो.

श्री तुळजाभवानी आपल्या अंगीकृत कार्यात उदंड यश देवो ही श्रीचरणी प्रार्थना.

–विजय देशमुख

५. युवराज शंभूराजे

भोसले कुळाला संस्कृत भाषेच्या विद्वानांचा सतत आदर वाटत असे. शहाजी भोसले यांचे पदरी चाळीस संस्कृत पंडित होते असे म्हणतात. शिवाजी महाराजांचे पदरी सुद्धा अनेक पंडितांचा ताफा होता व महाराजांनी त्यांचेकडून संस्कृत ग्रंथ रचवून घेतले होते, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. शंभूराजांसाठी सुद्धा महाराजांनी उमेश पंडित व केशव पंडित यांची नेमणूक करून त्यांना संस्कृतभाषा, साहित्य, राजनीती, धर्मशास्त्र इ. विषयांचे उत्तमप्रकारे शिक्षण दिले. शंभूराजांना १६६८ ते १६७३ या कालखंडात हा अभ्यास करायला पुरेशी सवड मिळाली होती. शिवाय त्यांना त्यात अतिशय रसही उत्पन्न झाला होता. त्या काळच्या पद्धतीप्रमाणे शंभूराजे आता लग्नाच्या वयाचे झाले. दाभोळच्या पिलाजीराव शिर्के यांची कन्या जिऊबाई हिला महाराजांनी आपली सून करून घेण्याचे ठरविले. महाराजांची एक कन्या राजकुंवर ही सुद्धा विवाहयोग्य होती. पिलाजीरावांचाच पुत्र गणोजी हा महाराजांनी जावई म्हणून पसंत केला. दोन्ही लग्ने थाटामाटात पार पडली. चि. जिऊबाई आता सौभाग्यवती येसूबाई झाली. ही मुलगी अतिशय समंजस, धोरणी आणि कर्तबगार होती. शंभूराजांना ही 'प्रिय सखी राज्ञी' म्हणून योग्यच ठरली. राज्याचा विस्तार हळूहळू वाढत होता. राज्यकारभारात शंभूराजे उत्तम तयार व्हावेत ही महाराजांची इच्छा होती, म्हणून तर महाराज त्यांना आग्र्याला घेऊन गेले होते. आता सदरेवर बसून कार्यालयीन कामाचाही अनुभव यावा यासाठी महाराजांनी २६ जानेवारी १६७१ पासून त्यांचेकडे कारभार सोपवला. शंभूराजे त्यावेळी अवघे १४ वर्षांचे होते. कागद, शाई, लेखण्या इत्यादी साहित्य देऊन महाराजांनी एक लेखनिकही दिला. शंभूराजांना सर्वप्रकारचे शिक्षण देण्यात आलेच होते. युद्धकलेत निष्णात होण्यासाठी घोडेस्वारी, भालाफेक, दांडपट्टा, कट्यार, समशेर इत्यादी चालविणे हे सारे ते उत्तम शिकले. १६७२ मध्ये भारतात आलेला अ‍ॅबे कॅरे हा फ्रेंच प्रवासी शंभूराजांबद्दल लिहितो, "हा तरुण युवराज अत्यंत धाडसी आणि पित्याच्या कीर्तीला साजेसा शूर होता. पित्यासोबत तो अनेक मोहिमांवर गेला होता. युद्ध-कलेत अनुभवी सेनापतीच्या हाताखाली त्याला एवढे तरबेज करण्यात आले होते, की भल्याभल्या वयोवृद्ध सेनापतींशी तो बरोबरी करू लागला. अतिशय मजबूत

बांध्याचा हा युवराज तेवढाच स्वरूपवान होता. त्याचे सौंदर्य हा त्याचे सैनिकांना त्याच्याकडे आकर्षित करणारा मोठा गुण ठरला. त्याचे सैनिक त्याला शिवाजी-इतकाच मान देत. एवढेच नव्हे, तर शंभूराजांच्या नेतृत्वाखाली युद्ध करण्यात त्यांना धन्यता वाटे, आपल्या कर्तबगारीचे सारे श्रेय ते या युवराजाला देत. कोणीही कर्तबगारी दाखविली, की शंभूराजे त्याचे कौतुक करीत व त्याला बक्षीस देत. त्यांच्या कर्तव्याचे चीज करीत. ''ज्यांच्यावर हा युवराज स्वारी करणार होता ते त्याचे नांव ऐकताच पळून जात. त्यामुळे या युवराजाला यश आणि कीर्ती मिळविणे सोपे गेले. थोड्याच अवधीत त्याने बराच मुलुख स्वराज्यास जोडला. या युवराजाचे सर्वदूर येवढे नांव आहे, की त्याच्या पित्यानेही त्याचा हेवा करावा.'' याप्रमाणे शंभूराजे एक उत्तम योद्धा व सेनापती बनले. परकीय वकिलांशी बोलणी करण्याचे वेळीही महाराज त्यांना आपल्याबरोबर बसवीत. हुबळी आणि राजापूरच्या ज्या वखारी महाराजांनी लुटल्या होत्या, त्याबद्दल बोलणी करण्याकरिता टॉमस निकल्स हा इंग्रज कंपनीचा वकील रायगडावर २३ मे १६७३ ला आला. शंभूराजांनी त्याचे काम ऐकून घेतले. आपण त्याचे म्हणणे महाराजांना सांगू असे सांगून त्याची बोळवण केली. इतकेच नाही, तर गडावरचा गारठा आपल्याला सहन होणार नाही, तेव्हां रात्री आपण खाली पाचाडला राहावे असा सल्लाही दिला.

❋❋❋

अभिप्राय क्र. ३

श्री.गिरीश दाबके,
साप्ताहिक 'श्री', मुंबई

दि. १८-१२-१९९३

मा. श्री. बेंद्रे, डॉ.गोखले, डॉ.पवार यांचे ग्रंथ अप्रतिमच आहेतच... पण ते फार मोठे आहेत, त्यामुळे सर्वांना ते झेपतील असे नव्हे. सर्व वाचकांना अभ्यासता येईल असे अप्रतिम संभाजीचरित्र मा.सु.ग. शेवडे यांनी लिहिले असून, ते त्यांनी स्वतःच प्रकाशित केले आहे. 'शंभूराजे' या पुस्तकाची किंमत केवळ अत्यल्प असून, १०४ पृष्ठांच्या मर्यादेतच श्री.सु.ग. शेवडे यांनी शंभूराजांच्या तेजस्वी आणि झगमगीत जीवनाचे अत्यंत प्रभावी दर्शन घडविले आहे. इतिहासाचा अभ्यास, आवेश, अभिनिवेश आणि पृष्ठमर्यादा ही चारही सूत्रे श्री.शेवडे यांनी फार परिणामकारकतेने सांभाळली आहेत.

श्री.गिरीश दाबके
साप्ताहिक 'श्री', मुंबई

६. शिवरायांचा राज्याभिषेक

महाराष्ट्र हसत होता. आनंदोल्हासाने खुदखुदत होता. शेकडो वर्षांच्या अंधारातून लखलखित प्रकाशझोत पाहून उत्साहाने नाचत होता. रामदेवराय यादवांचे राज्य बुडवून सर्वत्र हैदोस घालणाऱ्या हिरव्या बावट्यांनी भयभीत केलेला महाराष्ट्र एका अनपेक्षित लाभाने प्रफुल्लित झाला होता! साडेतीनशे वर्षे सातत्याने हिंस्र आक्रमकांच्या नंग्या नाचाने उद्ध्वस्त झालेला महाराष्ट्र! हजारो माता-भगिनींच्या किंकाळ्यांनी निनादलेला महाराष्ट्र! सहस्रावधी अश्राप बालकांच्या राक्षसी संहाराने भयकंपित झालेला महाराष्ट्र! लक्षावधी युवकांच्या कत्तलींनी रक्ताळलेला महाराष्ट्र! आक्रोश करणाऱ्या वृद्ध स्त्री-पुरुषांनाही उन्मत्त आक्रमकांच्या समशेरींनी सपासप कापून टाकला गेलेला महाराष्ट्र! गावागावांतून नित्यच शत्रूंनी पेटवून बेचिराख झालेल्या घरांनी भेसूर दिसणारा महाराष्ट्र! मूर्तिपूजकांचा संहार हेच महान देवप्रिय महत्कार्य मानणाऱ्या जात्यंध उन्मत्तांच्या तांडवाची रंगभूमी बनलेला महाराष्ट्र! सुंदर शिल्पांनी कलाकौशल्याचे संग्रहालय एकेकाळी असलेला, पण आता मात्र साडेतीनशे वर्षे राक्षसांच्या सर्वविनाशक वृत्तीने भग्न मूर्तींचा आणि भग्न मंदिरांचा सडा पडलेला दुःखी महाराष्ट्र! सारे जग इस्लामच्या पंजाखाली आणण्याच्या वेडाने झपाटलेल्या अमानुष संहारकांच्या विजयी आरोळ्यांनी दणाणून निघालेला महाराष्ट्र! तोच तो! तोच महाराष्ट्र साडेतीनशे वर्षांच्या सतत वाहणाऱ्या अश्रूंना पुसून टाकून आज एका आनंदमय घटनेने खुदखुदून हसत होता!

महाराष्ट्राला आज स्वतःचा राजा मिळाला होता. होय, स्वतःचा! अगदी खुद्द स्वतःचा! महाराष्ट्र भूमीत जन्मलेला- वाढलेला! महाराष्ट्राची दुःखे ओळखणारा, जाणणारा, अनुभवणारा! ती दुःखे दूर करणे हेच जीवनाचे ध्येय ठरवणारा! सत्ताधाऱ्यांची इमानेइतबारे सेवा करताना स्वकीयांवरही शस्त्र चालवणाऱ्या इमानदार सेवकांनाही कंठस्नान घालणाऱ्या कृतघ्न सत्ताधाऱ्यांचे उन्मत्त चाळे नीट विचारपूर्वक ओळखणारा! एका इस्लामी सत्तेच्याच एका सरदाराचा एक बंडखोर पुत्र! या हिरव्या सत्ता हिंदुस्थानातून हद्दपार करण्याचे महान स्वप्न उराशी बाळगणारा! आज त्याचाच राज्याभिषेक रायगडावर मंगलवाद्यांच्या मंजुळ सुरात आणि वेदमंत्रांच्या भारदस्त उच्चारात न्हाऊन निघत होता. सप्तसागरांची आणि सप्ततीर्थांची पवित्र जले

छत्रपतींवर अभिसिंचित होत होती आणि यासाठी जमलेले सहस्रावधी भाग्यवान साक्षीदार गोब्राह्मणप्रतिपालक, हिंदवी स्वराज्यसंस्थापक, छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार करीत होते!

महाराजांच्या सत्काराचा भव्य दरबार भरला होता. अष्टप्रधान महाराजांच्या अवतिभवती उभे होते. महाराजांच्या शेजारी विराजमान होत्या, महाराणी सोयराबाई! आणि जवळच्याच आसनावर सणसणीत प्रकृतीचा, टपोऱ्या तेजस्वी डोळ्यांचा, भव्य भालप्रदेश असलेला, भरदार छातीचा, धारदार नाकाचा, जरीची वस्त्रे परिधान केलेला, महाराजांसारखाच मंदिल मस्तकावर बांधलेला, छातीवर टपोऱ्या मोत्यांच्या आणि तेजस्वी रत्नांच्या माळा रुळत असलेला, गोऱ्यापान गोड चेहऱ्याचा, बुद्धिमत्ता, पराक्रम, यौवन, ऐश्वर्याची सारीच तेजे एकत्रित झालेला, सतरा वर्षांचा युवराज सर्वांचे चित्त आकर्षून घेत तलवारीच्या मुठीवर डाव्या हाताची मूठ दाबत बसलेला होता. त्याचे व्यक्तिमत्त्व पाहून आणि शरीराचा भरदारपणा पाहून हा महाराजांचा पुत्र महाराजांपेक्षाही अधिक आकर्षक वाटत होता. शंभूराजांनी सर्वांचेच चित्त आकर्षून घेतले होते. त्यांचा कालच सतरावा वाढदिवस झाला होता- ज्येष्ठ शुद्ध द्वादशी!

मुख्य समारंभ आटोपल्यानंतर रायगडावर सर्वत्रच लोकांची मांदियाळी जमली होती. शंभूराजे अनेकविध लोकांच्या आकर्षणाचा विषय झाले होते. कित्येक सरदार शंभूराजांसारखा जावई मिळाल्याबद्दल पिलाजी शिर्क्यांचा हेवा करीत होते. तेव्हांच्या रिवाजाप्रमाणे त्या वेळी शंभूराजांचे लग्न झाले हाते. दाभोळच्या पिलाजी शिर्क्यांची जिऊ ही कन्या शंभूराजांची धर्मपत्नी येसूबाई झाली होती. जिजाबाईंची ती लाडकी नातसून आणि शिवरायांचीही अतिशय आवडती बुद्धिमान सून होती. शंभूराजे तर तिला 'प्रिय सखी राज्ञी' म्हणत. तरीही तत्कालीन रिवाजाप्रमाणे अनेक स्त्रिया करण्याची पद्धत असल्यामुळे आपणही याला आपला जावई करून घ्यावा असा विचार अनेकांच्या मनात आल्यावाचून राहिला नाही.

काशीचे विद्वान गागाभट्ट यांनी केलेल्या अपूर्व सूचनेनुसार राज्यारोहणाचा समारंभ करण्याचे ठरले होते. महाराज आता सर्वतंत्र स्वतंत्र सार्वभौम छत्रपती सत्ताधीश होणार होते. मुहूर्त होता, ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी १५९६ चा! ६ जून १६७४ हा तो दिवस. रायगडावर हा अपूर्व सोहळा होणार होता. सारा रायगड उपस्थितांच्या वर्दळीने, बाजारांतील गर्दीने, मान्यवरांच्या उपस्थितीने, ऐश्वर्याच्या झगमगाटाने, वेदमंत्रांच्या उद्घोषाने, सुवासिनींच्या लगबगीने, वाद्यांच्या निनादाने आणि भाट-

चारणादींच्या ललकाऱ्यांनी गजबजलेला होता. चौघड्यांच्या आणि वेदमंत्रांच्या निनादात मंगल कलशांतील पवित्र जलाने त्रिवर्गाला अभिर्सिंचन चालूच होते. खास दालनातून सारा सोहळा अन्य स्त्रिया, मुली व जिजाऊसाहेब डोळे भरून पाहत होत्या. विधीच्या आरंभी आणि नंतर महाराजांनी जिजाऊसाहेबांना वंदन केले. माऊलीचा ऊर भरून आला. देवगिरीच्या रामदेवराय यादवानंतर हिंदू राजाचा असा राज्याभिषेक हा पहिलाच होता. इंग्रज कंपनीकडून ऑक्झंडेनने महाराजांचा व युवराजांचा सत्कार केला. इतरही मोठमोठे आहेर महाराजांना या प्रसंगी लाभले.

❋❋❋

अभिप्राय क्र. ४

प्रा.डॉ.सौ.शालिनी मोहोड
प्राध्यापिका - वाघिरे महाविद्यालय,
सासवड, जि. पुणे.

मी आपले पुस्तक संपूर्ण वाचले. मला 'साहित्यातील संभाजीराजे' या विषयावर डॉक्टरेट मिळाली आहे. त्यासाठी मी संभाजीराजांविषयी असलेल्या बहुतेक सर्व पुस्तकांचा (बखर, इतिहास, ऐतिहासिक कागदपत्रे, साहित्य इ) सखोल अभ्यास केला, तेव्हां असे लक्षात आले की, विशेषतः कवी, कादंबरीकार, नाटककार इ. नी संभाजीराजांचा सत्य इतिहास न जाणून घेता केवळ आपली कलाकृती सजविण्यासाठी त्यांच्या आयुष्यात घडलेल्या घटनांना विकृत रूप दिले. त्यातून त्यांनी त्यांच्यावर बरेच आक्षेप घेतलेले दिसले. महाराजांच्या कर्तृत्वाशी त्यांची तुलना करून त्यांचे कर्तृत्व शून्यवत दाखविले, तेव्हां हे सर्व खरे का? हे तपासून पाहण्याची गरज वाटू लागली आणि लक्षात आले की, इतिहास जाणून घेतल्याशिवाय संभाजीराजांच्या जीवनचरित्राला न्याय देता येणार नाही. माझा एम.ए.चा विषय मराठी वाङ्मय असल्याने मला ऐतिहासिक कथा-कादंबरी, नाटकातून संभाजीराजांच्या जीवन-चरित्राचे ऐतिहासिक आणि कलात्मक रूप जाणून घेणे योग्य वाटले. हा माझ्या प्रबंधलेखनाचा मुख्य हेतू होता. त्या दृष्टीने मी संभाजीराजांवर साहित्यिकांनी घेतलेल्या सर्व आक्षेपांचे ऐतिहासिक पत्रांचा आधार घेऊन निराकरण केले आहे.

सत्यासत्यतेचा परामर्श न घेता साहित्यिकांनी संभाजीराजांवर अनेक आक्षेप घेऊन त्यांचे चरित्र विकृत बनविले. त्यांना कलंकित केले. त्यांच्यावरील हा कलंक पूर्णपणे पुसून टाकण्याचे काम आपल्या पुस्तकाने होणार आहे हे निश्चितच. आपल्या अपेक्षेप्रमाणे ह्या पुस्तकाच्या लाख प्रती निघाव्यात अशी हार्दिक शुभेच्छा!

–सौ.शालिनी मोहोड

७. गृहकलह

राज्यारोहण समारंभ उत्तमप्रकारे पार पडल्यानंतर स्वराज्याचे व्यवस्थापन पद्धतशीर ठरवून देणे अगत्याचे होते. शिवाय स्वराज्याची राजधानी रायगड येथे एक परिपूर्ण व दर्जेदार बाजारपेठ असणे व तेथे सारे काही उपलब्ध होणे हेही आवश्यक होते. अष्टप्रधान मंडळातील प्रधानांची कामे व त्यांची कार्यालये तशीच त्यांची निवासस्थाने, रायगडाच्या राजवाड्यांची अंगे व उपांगे सारे घडविणे हे महत्त्वाचे कार्य होते. रायगडावर ठिकठिकाणचे कारागीर आणून तेथील भव्य प्रासाद महाराजांनी बांधून घेतला. रायगडाला स्वप्नांत सुद्धा जे दिसले नव्हते ते महाराजांनी वास्तवात उतरविले. या सर्व उद्योगात जवळजवळ दीड वर्ष गेले. महाराज जातीने सारी कामे पाहत होते. आदिलशहा, कुतुबशहा, मोगल इत्यादी बादशहांच्या भव्य राजधान्या महाराजांनी पाहिल्या होत्या. तेवढी श्रीमंती स्वराज्याजवळ नव्हती. तथापि स्वराज्याच्या छत्रपतींना साजेसे वैभव अत्यंत आवश्यक होते. यामुळे या सर्व रचनेत महाराजांनी प्रचंड खर्च केला. तो भरून काढण्यासाठी बाहेरून द्रव्य मिळविणे आवश्यक होते. त्यातच जिजाऊसाहेबांचे निधन, नेसरीच्या लढाईत प्रतापराव गुजरांचा मृत्यू, महाराजांची एक पत्नी काशीबाईसाहेब यांचे निधन, अशा महत्त्वपूर्ण दुःखदायक घटना घडल्या. अर्थात अशा गोष्टींनी खचून जाणारे महाराज नव्हते.

महाराजांनी शंभूराजांचे उपनयन गुरुवार दि. ४ फेब्रुवारी १६७५ ला करून घेतले व नंतर त्यांच्यावर अधिकाधिक जबाबदाऱ्या टाकायला सुरुवात केली.

शंभूराजांनी एका दाव्याचा निकाल दि. १३ मार्च १६७५ रोजी दिला. तो होता, गोपाळसेठ या व्यापाऱ्याच्या अधिकारांबाबतचा! ४ मे १६७५ ची शंभूराजांची पुण्याच्या राघो भास्कंर सरहवालदार आणि जुन्नरच्या राघो बल्लाळ सुभेदाराला पाठविलेली पत्रे त्यांच्या कार्यकर्तृत्वाची साक्ष देत आहेत.

सॅम्युअल ऑस्टिन हा ७ सप्टेंबर १६७५ ला रायगडावर महाराजांना भेटायला आला होता, तेव्हां शंभूराजे महाराजांबरोबर बसले होते अशी त्याने केलेली नोंद उपलब्ध आहे. नोव्हेंबर १६७५ मध्ये महाराज साताऱ्याला आले असताना अचानक आजारी पडले. सुमारे दोन महिने महाराज आजारी होते. या काळात एका इंग्रज

अधिकाऱ्याने लिहिलेल्या पत्रात 'महाराजांचा मृत्यू झाला आणि तो शंभूराजांनी केलेल्या विषप्रयोगाने झाला,' असे लिहिले. 'शंभूराजे गडावरून रात्री-बेरात्री खाली उतरत आणि कोणा मंत्र्याच्या कन्येशी त्यांचा प्रेमसंबंध होता आणि महाराजांनी रागाने याबद्दल शंभूराजांना कडेलोट करून ठार मारण्याची आज्ञा दिली आणि त्याबद्दल रागावून म्हणे त्यांनी विषप्रयोग केला' असे ही दंतकथा म्हणते.

त्यानंतरच्या इंग्रजांच्या पत्राने हा विषप्रयोग शंभूराजांनी केला नसून, एका न्हाव्याने केला होता असा खुलासा केला आणि नंतर पुनः महाराज बरे असून कामे पूर्वीप्रमाणेच पाहात आहेत असेही कळविले आहे. (अशा या इंग्रजांच्याच नंतरच्या पत्रातून खोट्या ठरलेल्या बिनबुडाच्या आरोपांपासून शंभूराजांच्या चारित्र्यहननाला प्रारंभ झाला असे म्हणायला हरकत नाही. याच भाकडकथेतील ब्राह्मणकन्येला गोदावरी असेही नांव पुढे बहाल करण्यात आले.) राज्यारोहणानंतर सोयराबाईच्या मनातही मंथरेने प्रवेश केला. शंभूराजे युवराज म्हणून जाहीर झाल्याने, आपल्या पुत्राला- राजारामाला- काहीच मिळणार नाही या कल्पनेने त्यांना ग्रासले. शंभूराजांचे वाढते व्यक्तिमत्त्व प्रधानमंडळालाही टोचत होते. शंभूराजे त्यांना अन्याय्य दिसणाऱ्या प्रत्येक प्रकरणात लक्ष घालून रयतेला न्याय मिळवून देत. गरीब रयतेला कधीकधी करमाफी करवीत. राज्यकारभार चालवायला पैसा लागतो. अशाप्रकारे ज्याला-त्याला सारा माफ करायला सुरुवात केली, तर लोक दुष्काळाचा कांगावा करतील आणि सारामाफी मिळवतील, मग राज्य कसे चालावे? असा सुरनीस अण्णाजी दत्तो यांचा प्रश्न असे. या साऱ्या गोष्टींमुळे शंभूराजांच्या विरुद्ध सोयराबाई, अण्णाजी दत्तो, मोरोपंत पेशवे, हिरोजी फर्जंद, बाळाजी आवजी अशा मातब्बर मंडळींचा एक गट तयार झाला. त्यांनी महाराजांचे कान फुंकायला आरंभ केला. महाराज हलक्या कानाचे नव्हते. त्यांनी या गोष्टींना महत्त्व दिले नाही; पण पूर्ण विचार करून मार्ग काढला. महाराजांपुढे त्यावेळी तीन मोठ्या समस्या होत्या. १) खजिना रिता होता, कर्ज बहुत झाले होते. पैसे आणून भरणे आवश्यक होते. २) महाराजांना कायमचे नेस्तनाबूत करण्याच्या हेतूने औरंगजेबाची सुमारे पांच लाख सेना विजापूर ते औरंगाबाद या परिसरात जमा झाली होती व शहाजादा मोअज्जम या मोहिमेवर होता. या आक्रमणाला थोपवून धरणे आवश्यक होते. ३) गृह-कलह निवारण करणे अगत्याचे होते.

महाराजांनी एक नामी युक्ती योजली. महाराज स्वतः प्रचंड फौजफाटा घेऊन रायगडाहून निघाले. त्याच वेळी महाराजांनी शंभूराजांना पन्हाळगडावर राहून

बादशाही फौजांवर नजर ठेवणे आणि युक्ती-प्रयुक्तीने महाराज परत येईपर्यंत थोपवून धरणे ही कामगिरी सोपविली. शंभूराजे रायगडापासून बाजूला काढल्यामुळे स्वाभाविक । रायगडावर आता कलहाची भीती राहिली नाही. 'स्वराज्याची महाराजांचे प्रतिनिधी म्हणून सर्व व्यवस्था सरकारकुनांवर सोपविली व शंभूराजांना दूर पाठविले म्हणून ते कष्टी झाले' असा अर्थ अनेकांनी लावला आहे; परंतु महाराजांनी त्यांना पन्हाळा, प्रभावली आणि शृंगारपूर या सुभ्याचे सरसुभेदार म्हणून पाठविले होते. शंभूराजांनी या वेळी आपले शिक्के व मुद्रा वापरण्यास आरंभ केला होता. एकप्रकारे रायगडच पन्हाळ्यावर आला होता. पन्हाळगड हाच जणू स्वराज्याची राजधानी झाला होता. या काळात मिळालेल्या सवडीचा शंभूराजांनी उत्तम उपयोग करून 'बुधभूषण' हा राजनीतीवरील संस्कृत काव्यग्रंथ व अन्य काही हिंदी काव्ये लिहिली. त्यांचा संस्कृत साहित्याचा व्यासंग चालूच होता. कवी कलश त्यांच्याबरोबर होताच. तोही उत्तम योद्धा, मुत्सद्दी व संस्कृत विद्वान, तसेच हजरजबाबी कवी होती. शंभूराजांना जो जो महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाने दूर दूर लोटले तो तो त्यांनी कवी कलशाला जवळ केले. तो 'परदेशी' असल्यामुळे व शंभूराजांच्या विश्वासातला असल्यामुळे अन्य प्रधानांच्या मत्सराचा विषय बनला. शंभूराजे कधी पन्हाळ्याला तर कधी सासुरवाडीत- शृंगारपूरला असे राहत. तेथून मोगली आक्रमणावर ते बारीक नजर ठेवून होते आणि त्यांचा राजकारणी पत्रव्यवहारही चालूच होता. त्यावेळी दिलेरखानाची छावणी बहाद्दूरगडावर होती.

बादशाही फौजांचे हल्ले लवकरच स्वराज्यावर व्हायचे होते, हे कळल्याने शंभूराजांनी दिलेरखानाशी पत्रव्यवहार- सामील होण्याच्या भाषेत- चालू ठेवला. त्यासाठी त्यांनी आपल्या वडिलांच्यात व आपल्यात दुरावा निर्माण होऊन ते सावत्र-आईच्या आधीन आहेत अशी विधाने करून दिलेरखानाच्या मनात जवळिकीची व विश्वासाची भावना उत्पन्न केली. तसेच आपण मोगलाईत सामील होऊन, सह्याद्री जिंकायची इच्छा धरून आहोत असेही भासविले. यामुळे दिलेरखानाने त्यांना सरळ मोगलाईत सामील होण्याचे आमंत्रण दिले आणि आपण त्यांना बादशहाकडून मोठी मनसब मिळवून देऊ असे आश्वासन दिले. याला उत्तर म्हणून शंभूराजांनी, तूर्त वडील आपल्यावर भार टाकून बाहेर गेले आहेत, ते येईपर्यंत आपल्याला थांबणे भाग आहे असे कळवून त्याला आणखी थोपवून धरले.

८. सिंहाचा छावा लांडग्याच्या कळपात

दक्षिणदिग्विजय करून प्रचंड धन, संपत्ती व प्रदेश मिळवून महाराज परत आले, ते प्रथम पन्हाळगडावर आले. सोपविलेल्या कामगिरीबाबत शंभूराजांशी बोलणी करून, सारा विषय समजून घेऊन, महाराजांनी शंभूराजांना शाबासकी दिली आणि ते ११ मे १६७८ ला परत रायगडावर आले.

(आपल्या मानवी पराक्रमात ईश्वरी साह्यही आवश्यक आहे हे जाणून शंभूराजांनी काही शाक्तपंथीय उपासनाही सुरू केली होती. त्या विषयींची दीक्षाही त्यांनी घेतली होती. यालाच कलषाभिषेक म्हणतात; पण यापेक्षा ते त्या मार्गात फारच वाहून गेले होते असे जे दाखविले जाते, त्याला काही आधार नाही. याच पंथामुळे त्यांना मद्यप्राशनाची सवय लागल्याचा बाऊ काही दुष्ट मंडळींनी केला आहे; **परंतु त्यांनी कधीही मद्य प्राशन केल्याचा कोणताही पुरावा इतिहासा-जवळ नाही**. तसेच कोणाही परस्त्रीच्या नादी ते लागले असल्याचा कोणताही विश्वासार्ह पुरावा उपलब्ध नाही. महाराज परत आल्यावर राज्यव्यवस्थेच्या कामाला लागले. आलेली सर्व संपत्ती कोशांत जमा झाली. रायगडाचे आपल्या अनुपस्थितीतील सारे वृत्त जाणून घेतले. या दोन वर्षांत शंभूराजे रायगडाकडे फिरकलेही नव्हते, तरीही त्यांच्याविषयी खोट्यानाट्या कागाळ्या महाराजांच्या कानावर घालण्यात आल्या. महाराजांना बाहेरील आक्रमण थोपविणे आणि आतील धुसफुस शांत करणे या दोन्ही आघाड्यांवर लक्ष देणे भाग होते. महाराज १० सप्टेंबर १६७८ ला पन्हाळ्यास आले. महान राजकारणी मुत्सद्दी असलेल्या धूर्त महाराजांनी शंभूराजांना सज्जनगडावर समर्थांना भेटावयास जाण्याची आज्ञा केली. त्याच वेळी त्यांच्या गुप्तपणे दिलेरखानाला सामील होऊन त्यांच्या सेनेची, योजनेची व युद्धसाहित्याची आतली माहिती काढण्याची कामगिरी सोपविली. आपण त्यांच्यावर नाराज असल्याचे लोकांना वरकरणी भासविले. समर्थ स्वतः गडावर नव्हते हे महाराजांना काय ठाऊक नव्हते?

शंभूराजांनी हे नाटक उत्तम वठविले. ते ऑक्टोबर १६७८ अखेर त्यांची दुसरी पत्नी (जाधव घराण्यातील) सौ. दुर्गाबाई व आपली बहिण राणूबाई यांचेसह सज्जन-गडावर आले. महिनाभर तेथे मुक्काम केला. त्या दरम्यान पुढील कार्यक्रम पक्का

केला आणि १३ डिसेंबर १६७८ ला त्यांनी माहुली येथे पर्वणीनिमित्त स्नान करण्याचे कारण दाखवून सज्जनगड सोडला.

दुगाबाई, राणूबाई आणि निवडक मंडळींसह ते माहुलीस आले. तीर्थस्नानादिक आटोपल्यावर गुप्तपणे ठरल्याप्रमाणे दिलेरखानाने त्यांना आणण्यासाठी पाठविलेल्या सुमारे ४००० स्वारांसह ते सरळ दिलेरखानाच्या पेडगांव येथील छावणीत हजर झाले. नाना प्रयत्न करूनही जे हाती लागणे शक्य नाही ते शंभूराजे आपल्या पायाने मोगली छावणीत हजर झाल्याने दिलेरखानाला विलक्षण आनंद झाला. त्याने शंभूराजांसाठी खास मागवून घेतलेले सप्तहजारी फर्मान त्यांना देऊन त्यांचा भव्य सत्कार केला.

❋❋❋

अभिप्राय क्र.५

श्री. गोपाळ नीळकंठ दांडेकर

शंभरावर पुस्तकांचे मराठीतील मान्यवर लेखक

तुमचे पुस्तक चांगले झाले आहे. एक अगदी वेगळा विषय! तुमची लेखणीही या पुस्तकास साजेशी आहे. इति.

अप्पा दांडेकर.

अभिप्राय क्र.६

श्री.निनाद गंगाधर बेडेकर

१) जेसीसकडून Outstanding Young Person म्हणून सन्मानित. २) शिवराजभूषण, शिवबावनी इ.शंभरावर ऐतिहासिक लेखांचे लेखक, ३) नोकरी-जन.मॅनेजर,मार्केटिंग

११०५/१४ स्वानंद, फ्लॅट नं.५ गुलशन सोसायटी, हरेकृष्णमंदिर रस्ता, मॉडेल कॉलनी, पुणे ४११ ०१६ दूरध्वनी २३३३६७७८

आपले 'शंभूराजे' पुस्तक मिळाले. साध्या, सोप्या, रसाळ, मधाळ भाषेत शिवपुत्राचे चरित्र आपण यात कथन केले आहे. संभाजी हे इतिहासातील वादग्रस्त व्यक्तिमत्त्व आहे. संभाजीमहाराजांना पूर्णपणे दोषमुक्त करण्यासाठी आपण काही धाडसी विधानेही केली आहेत. उदा.संभाजी दिलेरखानाकडे गेला तो शिवरायांच्या संगनमताने! तो मुद्दा पटवून देण्यासाठी केलेला खटाटोप स्पृहणीयच!

अल्पदरात कल्पकल्पविचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा उपक्रम स्तुत्य आहे. पुस्तक देखणे आणि नेटके झाले आहे. तसेच अभियानाचा विचार हाही गौरवास्पदच आहे. दहा हजारांची ही आवृत्ती शंभूप्रेमी रसिक मोठ्या आवडीने स्वीकारतील यात शंकाच नाही. आपल्या अभियानास शुभेच्छा!

निनाद बेडेकर

९. पुनरागमन

शंभूराजे मोगलांकडे गेले याचे अनेक अर्थ व त्यावर अनेक तर्ककुतर्क सुरू झाले. त्याचा फायदा रायगडावरील त्यांच्या विरोधकांनी उठविला तर आश्चर्य वाटायला नको. अंतरंग महाराज जाणून होते म्हणून बरे!

शंभूराजांच्या सहकार्याने विजापूरची आदिलशाही बुडविण्याचे दिलेरखानाने ठरविले. त्यामुळे भयभीत होऊन गेलेल्या आदिलशहाच्या वजिराने महाराजांकडे मदतीसाठी धाव घेतली. महाराजांनी मोगली सेनांवर वेगवेगळ्या बाजूंनी छापे घालायला सुरुवात केली. त्याला प्रत्युत्तर म्हणून दिलेरखानाने महाराजांच्या गडांवर हल्ले करायला आरंभ केला. फिरंगोजी नरसाळ्याच्या ताब्यातील भूपाळगडावर २ एप्रिल १६७८ रोजी दिलेरखानाने हल्ला केला. (या हल्ल्यात हजारो मराठ्यांची कत्तल झाली व शेकडो मराठ्यांचे हात तोडण्यात आले असे काही बखरकारांनी लिहिले असून, शंभूराजे महाराजांविरुद्ध खरोखरच झाले होते, या मूळ कल्पनेमुळे त्यांनी हे अत्याचार शंभूराजांच्या माथी मारले आहेत; परंतु प्रत्यक्ष त्या मोहिमेत मोगलांच्या सेनेबरोबर गेलेला भीमसेन सक्सेना मात्र, शंभूराजे त्या मोहिमेत होते असे लिहीत नाही.) अखेर भूपाळगड मोगलांच्या हाती गेला.

मार्गातील मुलुख लुटीतच दिलेरखान तिकोट्यास आला. त्याच्या अत्याचारांना भिऊन शेकडो स्त्रियांनी विहिरीत उड्या घेतल्या. जे बाहेरून दिसत नव्हते ते आतून शंभूमहाराजांना स्पष्ट दिसू लागले. स्त्रियांवरील अत्याचार, त्यांच्या जीवघेण्या किंकाळ्या, तान्हुल्यांचे आक्रोश, वृद्धांचे हाल आणि हजारो निरपराध स्त्री-पुरुषांच्या अमानुष कत्तली ही मुसलमानी युद्धाची रीत होती. गांवेच्या गांवे बेचिराख करून जाळून टाकली जात. शेकडो तरुणींवर वासनासक्त लांडग्यांनी तुटून पडावे आणि त्यांना पळवून आपल्या भोगदासी बनवाव्यात हा तर मुसलमानी आक्रमकांच्या राक्षसी संस्कृतीचा जणू धर्मच होता.

दिलेरखान तिकोट्याहून अथणीस आला. सैन्याला लूटमार करायला फर्मावले. प्रचंड संख्येने पुरुष कैद केले. स्त्री-पुरुषांच्या किंकाळ्यांनी सारे आकाश दुमदुमून निघाले. सर्व कैद्यांची सर्रास कत्तल -कत्तले आम- करण्याची दिलेरखानाने आज्ञा दिली. आता मात्र शंभूराजांचा क्रोध अनावर झाला. त्यांनी सरळ तलवार उपसली

आणि ते दिलेरखानावर धाऊन गेले. "हे काय चालले आहे ? निरपराध माणसांच्या कत्तली कसल्या करता ? अरे, माणसं आहांत तुम्ही की सैतान ?" संतप्त शंभूराजांपुढे दिलेरखानाला मनगटे चावत गप्प बसणे भाग होते. आता तो शंभूराजांचा काटा काढण्याच्या योजना आखू लागला.

पण, लवकरच योग्य संधी साधून शंभूराजांनी मोगली चाकरीला रामराम ठोकला. या दुष्ट राक्षसांना नामशेष करणे हेच आता आपले जीवितकार्य असा निश्चय करून ते १ डिसेंबर १६७९ ला बाहेर पडले आणि तडक पन्हाळ्याला परतले. महाराजांना हे वृत्त कळताच तेही पन्हाळ्याला निघून आले. त्यांनी १३ जानेवारी १६८० ला शंभूराजांचे स्वागत केले. महाराज म्हणाले, "लेकरा, मला सोडू नकोस ! औरंगजेबाशी आपला दावा, तुजला दगा करायचा होता; पण श्रीने कृपा करून सोडून आणला. थोर कार्य जाहले." महाराजांना शंभूराजे सुखरूप परत आले हे पाहून खूपच आनंद झाला, त्यांनीही आवश्यक ती सर्व माहिती जमा केली होती आणि मुसलमानी क्रौर्य पाहिले होते. हाच महाराजांच्या मनातला हेतू होता.

महाराजांनी योजिलेले नाटक उत्तमप्रकारे पार पाडले होते. शंभूराजांना महाराजांनीच पाठविले होते असे कुणालाच कळले नाही. शिवाय व्यंकोजीला 'चिरंजीव राजश्री शंभूराजे मोगलाईत गेले होते, त्यासही कळों आले की, ये पातशाहीत... आपले मनोगतानुसार चालणार नाही... ऐसे जाणोन... आले. त्यांची-आमची भेट झाली... घरोब्याचे रीतीने जैसे समाधान करू ये तैसे केले." असे पत्र लिहून शंभूराजे स्वतःच रुसून गेले होते हा समाजातील गैरसमज महाराजांनी राजकीय हेतूने पक्का करून ठेवला. (शिवरायांचे राजकारण हिमनगासारखे होते. त्याचे वर दिसणारे टोक -जे खालचा आकार किती प्रचंड आहे हे कळू देत नाही- त्याप्रमाणेच महाराजांचे राजकारणी धोरण असे. आग्र्याहून परतल्यावर शंभूराजे मृत्यू पावल्याची कंडी त्यांनीच पिकवली होती. सुरतेच्या लुटीच्यावेळी गणदेवीला जात असल्याचा बहाणा त्यांनीच केला होते. यालाच राजकारण म्हणतात.)

राजारामाच्या लग्नात विघ्न नको, म्हणून शंभूराजांना आपणच मोगलांकडे पाठविले होते हे, ते लग्न झाल्यावर महाराज सर्वांना जाहीरपणे सांगणार असावेत. तथापि अर्ध्यावरती डाव मोडला आणि शंभूराजांची खरी हकीकत अप्रकटच राहिली.

१०. तेजोनिधी मावळला

एकदा शंभूराजांशी बोलताना महाराजांनी सहज एक विचार शंभूराजांसमोर मांडला. कर्नाटकाचे जिंकलेले राज्य शंभूराजांना देणे आणि रायगडापासून वरचे महाराष्ट्रातील प्रदेश व किल्ले राजारामास देणे. महाराजांनी शंभूराजांच्या मनाचा अंदाज घेतला. स्वराज्याचे तुकडे करणे शंभूराजांना मान्य झाले नाही. गृहकलह स्वराज्याला बाधक होऊ नये अशी त्यांची भावना होती. त्यांनी नम्रपणे सांगितले, "आपणांस साहेबांच्या पायाची जोड आहे. आपण दूधभात खाऊन साहेबांच्या पायाचे चिंतन करून राहू."

थोड्याच दिवसांत महाराजांवर मृत्यू घाला घालील असे कोणाला ठाऊक होते ? महाराजांचे वय तर अवघे पन्नास वर्षे होते. दक्षिणदिग्विजय करून, अफाट पराक्रम करून महाराज आलेले होते, ते आरोग्याने उत्तम होते.

महाराजांनी दिलेरखानाची टांगती तलवार लक्षात घेऊन शंभूराजांना पन्हाळ्यावरच ठेऊन रायगडास प्रयाण केले. जाताना धाकटा पुत्र राजाराम याचे लग्न करून येतो, मग राज्यकारभाराचा विचार करू. 'तू वडील पुत्र आहेस, सर्वप्रकारे भरवसा तुमचा.' असे त्यांनी सांगून निरोप घेतला. शंभूराजे पुनः आपली सुभेदारी पूर्ववत सांभाळू लागले.

दि. १५ मार्च १६८० रोजी राजारामाचा विवाह संपन्न झाला. प्रतापराव गुजर नेसरीच्या लढाईत मारले गेले होते. त्यांची कन्या जानकीबाई हिच्याशी राजारामाचा विवाह ठरल्याप्रमाणे झाला. यावेळी शंभूराजे जालना येथील स्वारीवर होते.

दुर्दैवाने आठ दिवसांनीच महाराजांची प्रकृती एकाएकी बिघडली. खूपच बिघडली. मोठमोठ्या वैद्यांचे उपचार निरर्थक ठरले आणि छत्रपती शिवाजीमहाराज ३ एप्रिल १६८० रोजी भर दुपारी निजधामाला गेले. तेजोनिधी मावळला. महाराज जातील अशी कुणाला कल्पनाही नव्हती.

दुसऱ्याच दिवशी शंभूराजांकडे महाराजांच्या निधनाचे वृत्त अनौपचारिक मार्गाने आले; पण रायगडावरील मुखंडांनी मात्र शंभूराजांना बोलावून घेतले नाही. त्यांच्या अनुपस्थितीतच कैलासवासी महाराजांचा अंत्यविधी पार पाडण्यात आला. शंभूराजे त्यावेळी तेवीस वर्षांचे होते आणि राजाराम दहाच वर्षांचा!

महाराज मृत्यू पावले त्यावेळी महाराजांच्या खास जबाबदार सेवकांपैकी बरेचजण गडावर नव्हते. पंतप्रधान मोरोपंत पिंगळे मुल्हेरला तर अण्णाजी दत्तो सुरनीस चौलला, सरनौबत हंबीरराव मोहिते कऱ्हाडला! महाराजांजवळ मृत्यूसमयी बाळाजी आवजी चिटणीस, प्रल्हाद निराजी, रामचंद्रपंत अमात्य, राहूजी सोमनाथ ही ज्येष्ठ मंडळी आणि सोयराबाई, सगुणाबाई, पुतळाबाई या राण्या उपस्थित होत्या. वस्तुतः युवराजांच्या मंचकारोहणाशिवाय महाराजांचा अग्निसंस्कार शास्त्रानुसार होऊ शकत नव्हता. तसे शक्यच नसेल तर श्राद्धदिवसानंतर सहा दिवसांत तो करावा असा मार्ग सापडला. कनिष्ठ पुत्र राजारामाच्या हातून महाराजांना अग्निसंस्कार करण्यात आला. रायगडाचे महाद्वार सुरक्षिततेच्या दृष्टीने बंद करण्यात आले. महाराजांच्या मृत्यूची वार्ता गुप्त ठेवण्यात आली. महाराजांच्या मृत्यूनंतर सहाव्या दिवशी अण्णाजीपंत सुरनीस आणि १४ व्या दिवशी मोरोपंत गडावर येऊन पोहोचले. सर्वांनी विचारविनिमय करून अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तावर, २१ एप्रिल १६८० या दिवशी राजारामाचा मंचकारोहणाचा विधी उरकला.

शंभूराजांना सर्व हकीकत सांगून त्यांची समजूत घालावी व त्यांनी मान्यता न दिल्यास त्यांना अटक करून रायगडावर आणावे असा धूर्त विचार करून, अण्णाजीपंत आणि मोरोपंत पन्हाळ्याकडे निवडक सैनिकांसह रवाना झाले. जाताना कराड येथून हंबीररावांना बरोबर घेऊन ते पुढे निघाले. हंबीरराव मोहिते हे सोयराबाईसाहेबांचे सख्खे भाऊ होते; पण ही कारस्थाने हंबीररावांना मान्य नव्हती. त्यांचा शंभूराजांनाच पाठिंबा होता.

शंभूराजे व्यसनी?

"जीवनाच्या अंतिम क्षणी शरीरावर व मनावर भयंकर आघात होत असतानासुद्धा स्थितप्रज्ञाच्या आत्मिक बलाने तो संकटांशी मुकाबला करू शकला याचे कोडे संभाजी-राजाच्या व्यक्तित्त्वाच्या अध्यात्मवादी शक्तीच्या आविष्काराने सुटू शकते. व्यसनाधीन माणूस एवढ्या प्रचंड आत्मिक बलाने उभा राहूच शकत नाही. कारण व्यसन हे केवळ शरीरच नव्हे, तर मनही दुबळे बनवीत असते."

– डॉ. जयसिंगराव पवार

(छ.संभाजी स्मारक ग्रंथातून)

११. छत्रपती संभाजी महाराज

शंभूराजांना महाराजांच्या निधनाचे वृत्त दुसऱ्याच दिवशी कळले; पण त्यांना रायगडावरील वातावरणाची कल्पना असल्यामुळे विवाद्यता निर्माण करण्याऐवजी त्यांनी पन्हाळ्यावरच महाराजांचे श्राद्धविधी उरकले. शंभूराजांना महाराजांच्या आजाराचे वृत्तही न कळविणाऱ्या कारस्थानी लोकांबद्दल जनसामान्यांत तिरस्कार उत्पन्न झाला आणि शंभूराजांकडेच लोकमानस झुकू लागले. ठिकठिकाणाहून अनेक नेते आपापल्या फौजा घेऊन पन्हाळ्याकडे जाऊ लागले. पन्हाळाच जणू राजधानी बनली. 'शिलेस म्हणतील जन सिंहासन। रघुकुलशेखर वरी बैसता।' ही उक्ती सार्थ असल्याचे या प्रसंगाचा विचार करताना पटते. शंभूराजांना अटक करण्याचे मनसुबे रचणाऱ्यांचा डाव उधळला गेला. हंबीररावांनी अण्णाजीपंत, मोरोपंत, प्रल्हादपंत इत्यादींनाच अटक केली आणि शंभूराजांना प्रचंड सेनेसह, असंख्य पाठीराख्यांसह आणि या अटक केलेल्या श्रेष्ठींसह मोठ्या लवाजम्याने १८ जून १६८० ला रायगडावर आणले. येताना कराड, सातारामार्गे शंभूराजे प्रतापगडावर आले. तेथील भवानीमातेचे दर्शन घेऊनच पुढे ते रायगडावर आले.

सर्वत्र शंभूराजांचे स्वागत झाले. कोणत्याही प्रकारे त्यांना विरोध झाला नाही. कटकऱ्यांना कोणाचाच पाठिंबा नव्हता. त्यांनासुद्धा झाल्या प्रकाराची लज्जा वाटली असावी. श्रीरामांनी वनवासातून आल्यावर प्रथम कैकेयीचे दर्शन घेतले त्याप्रमाणेच शंभूराजांनी मातुश्री सोयराबाई व अन्य मातांना वंदन केले. ज्या पंतांना अटक करून आणले होते त्यांना आपल्या घरीच नजरकैदेत ठेवले.

रायगडावर शंभूराजांनी पुनः शास्त्रानुसार विधिपूर्वक महाराजांची उत्तरक्रिया केली. क्रियेच्या दहाव्या दिवशी -दि. २७ जून १६८० रोजी- श्रीमती पुतळाबाई सती गेल्या. श्रावण शु. पंचमी, मंगळवार दि. २० जुलै १६८० रोजी शंभूराजांचे मंचकारोहण पार पडले. मग सर्व श्रेष्ठ सहकाऱ्यांशी सल्लामसलत करून शंभूराजे यांनी प्रधानांना नजरकैदेतून मुक्त केले. इतकेच नव्हे, तर सर्वांना पुनश्च आपापल्या स्थानांवर रुजू करून घेतले. मोरोपंत मात्र या काळात आजारी झाले आणि ऑक्टोबर १६८० मध्ये निवर्तले. झाल्यागेल्या गोष्टी विसरून शंभूराजांनी राज्यकारभाराला प्रारंभ केला. ऑक्टोबर १६८० च्या सुमारास त्यांचे अष्टप्रधान मंडळ जाहीर झाले.

मोरोपंतांच्या जागी त्यांचे चिरंजीव निळोपंत पेशवे झाले. अण्णाजी दत्तो अमात्य झाले. आबाजी सोनदेव सचिवपदावर आरूढ झाले. जनार्दनपंत हेणमंतेच डबीर राहिले. मोरेश्वर पंडितराव हेच पुढेही पंडितराव राहिले. दत्ताजीपंत वाकेनिवीस मृत्यू पावले होते. त्यांच्या जागी त्यांचे चिरंजीव रामचंद्र दत्तो हे वाकेनिवीस झाले. न्यायाधीशपदी प्रल्हाद निराजीच पुनः नेमले गेले. बाळाजी आवजी चिटणीस हेच पुढेही चिटणीस राहिले. आठपैकी सहा मंत्री तेच राहिले आणि दोघे मृत्यू पावल्याने त्यांचेजागी त्यांचे पुत्र नेमले. शंभूराजांनी अत्यंत विचारीपणाने राज्यकारभारात स्थैर्य आणण्याची ही अपूर्व योजना केली. आपल्याविरुद्ध कट करणाऱ्यांचा सुद्धा राग धरला नाही. सर्वांना त्यांनी स्वराज्याचे काम एकदिलाने करण्याबद्दल बजावले. सरसेनापती हंबीरराव मोहिते शंभूराजांचे उजवे हात होते.

हंबीरराव मोहित्यांनी औरंगजेबाची चांगलीच फजिती करावयाचे ठरविले. औरंगजेबाचा बऱ्हाणपूर हा सुभा अत्यंत सधन म्हणून ओळखला जाई. तेथील हिंदूंवर बादशहाने जिझिया कर लावला. या करवसुलीसाठी काकरखानाची खास नेमणूक करण्यात आली होती. त्याने गरीब हिंदूंचा अनोतान छळ आरंभला. हंबीररावांनी वीस हजार सैनिक घेऊन अनपेक्षितपणे बऱ्हाणपूरवर हल्ला चढविला. या शहरात किल्ल्याच्या सभोवार अठरा पुरे होते. त्यातील बहादूरपुऱ्यात जडजवाहिर, सोने-नाणे, रत्ने, उंची कपडे इत्यादी मुबलक प्रमाणात होते. जमिनी खालीही खूप संपत्ती दडविली होती. सारा बहादूरपुरा लुटून तेथील चीजवस्तू मराठ्यांनी हस्तगत केली. इतकेच नव्हे, तर जमिनीखालचे द्रव्यही खोदून काढले. त्यानंतर तीन दिवस इतरही सतरा पुरे पार लुटून-धुवून नेले. लूट झाल्यावर अनेक ठिकाणी आगी लावल्या आणि जिझिया कराचा वचपा घेतला.

भयग्रस्त आणि संतप्त लोकांनी आणि मुल्ला - मोलवींनी बादशहाला सारा वृत्तांत कळविला आणि साह्य करण्याची विनंती केली. सारे बऱ्हाणपूर शहर पार उद्ध्वस्त झाले होते. मात्र शहराच्या तटांतून मराठ्यांना आत प्रवेश करता आला नाही. हा महान विजय मिळाल्यावरच शंभूराजांनी १६ जानेवारी १६८१, माघ शुद्ध सप्तमी, शके १६०२ रोजी राज्याभिषेक करवून घेतला.

१२. शंभूराजांचा राज्याभिषेक

छत्रपती शिवरायांच्या मृत्यूच्यावेळी- ३ एप्रिल १६८० ला शंभूराजे जालना भागांतील मोहीम आटोपून परत येत होते. ते पन्हाळ्यावर येताच त्यांना ही दुर्दैवी हकीकत कळली. रायगडावरील वातावरणाची उत्तम कल्पना असल्याने आणि प्रत्यक्ष त्यांच्यापासून हे वृत्त लपविण्याचे कारस्थान लक्षात आल्याने त्यांनी पन्हाळ्यातून सर्वत्र आज्ञापत्रे धाडली. राजापूरची धान्याची कोठारे पन्हाळ्याकडे आणविली. सरदार, सुभेदार व अन्य रायगडविरहित सर्व ठिकाणच्या अधिकाऱ्यांना पन्हाळ्यास बोलावून घेतले आणि तेथूनच कारभार चालविला. तेथेही त्यांना अटक करण्याचे अविचारी कारस्थान उघडकीस आल्यावर मात्र ते संबंधितांना १८ जून १६८० ला अटक करून, बरोबर घेऊन रायगडास आले. त्याच दिवशी अस्थिदर्शन झाल्याने तोच पहिला दिवस मानून कैलासवासी तीर्थरूपांचा शास्त्रशुद्ध अंत्यविधी त्यांनी त्या दिवसापासून सुरू केला. २७ जूनला दहावा दिवस होता. त्याच दिवशी पुतळाबाईंनी आपला सती जाण्याचा निश्चय पूर्ण करून अग्निप्रवेश केला. नंतर ललितापंचमीच्या सुमुहूर्तावर, २० जुलै १६८० रोजी शंभूराजांनी मंचकारोहणविधी करून घेतला.

तथापि यापूर्वीच मंचकारोहणविधी राजारामास करण्यात आलेला होता. तो ज्येष्ठ पुत्र नसल्याने अवैधच ठरत होता. शिवाय मंचकारोहण झालेले दोघे राजे होऊ शकणार कसे ? म्हणून यथाकाळी ऐन्द्रयाभिषेक किंवा राज्याभिषेक करण्याचे ठरले; पण राज्यव्यवस्थेच्या धामधुमीत कर्तव्यावर भर देऊन समारंभ लांबणीवर टाकण्यात आला. शिवाय विष्णुसुप्तीचा काळ संपल्यावर- म्हणजे संक्रांतीनंतर हा कार्यक्रम यथासांग करावा असा विधिज्ञांचा सल्ला पडला. त्यानुसार रविवार दि.१६ जानेवारी १६८१, माघ शुद्ध सप्तमी हा दिवस मुक्रर करण्यात आला.

राज्याभिषेकविधीपूर्वी करावयाचे प्रायश्चित्तविधी, तुलादानविधी इत्यादी ३० डिसेंबर १६८० रोजी पार पाडण्यात आले. त्यानंतर शुभमुहूर्तावर शंभूराजे प्रताप-गडावर जाऊन श्रीकुलस्वामिनीचे पूजन करून आले. दि.१४, १५, १६ जानेवारी हे तीन दिवस अन्य सर्व विधी यथावकाश झाले व मुख्य राज्याभिषेकविधी व समारंभ दि. १६ रोजी झाला. नव्या स्वराज्याच्या स्थापनेच्या निमित्ताने शिवरायांचा जो

राज्याभिषेक रायगडावर झाला होता, त्याची सर अर्थातच या राज्याभिषेकाला नसली, तरी हाही कार्यक्रम एकूण भव्य असाच झाला. निवडक पण भरपूर मंडळींच्या उपस्थितीत हा कार्यक्रम रायगडावर झाला. मात्र सामान्य जेवणावळी पाचाडला झाल्या. दानधर्म भरपूर करण्यात आला. शंभूराजे छत्रपती झाले.

शंभूराजांबद्दल मुंबईकर इंग्रजांचे एक पत्र म्हणते, "संभाजीराजे सध्या रायगडावर आहेत. आपल्या धाकट्या भावाला त्याने पूर्ण ममतेने वागविले आणि वागवीत आहेत. राज्यात सर्वत्र चांगलीच शांतता निर्माण झाली आहे. संभाजी राजा म्हणून सर्वत्र जाहीर केले आहे. संभाजीराजांजवळ सध्या २०,००० सैन्य जमले असून, त्यासह तो काय हालचाली करणार आहे ते अद्याप समजले नाही. परंतु सर्व सांगतात की, संभाजी मोठा धूर्त व शहाणा आहे." दुसऱ्या एका पत्रात सुरतकर इंग्रज लिहितात, 'संभाजी आपल्या बापाच्या जागी काहीही भानगड न होता राज्यावर आला. संभाजीच्या सध्याच्या वर्तणुकीवरून तो त्याच्या बापाचा स्वभाव व प्रवृत्ती यांहून निराळा आहे. त्याचा कारभार अधिक सुसंस्कृत किंवा दयाळू व नेमस्त असा आहे. (much more moderate and humane government.)

या राज्याभिषेक समारंभाचेवेळी काही अपशकून झाल्याचे उल्लेख बखरकारांनी केले आहेत.

१. सबंध दिवस आकाश अभ्राच्छादित असल्याने सूर्यदर्शन झाले नाही.

२. शंभूराजांचा रथ मोडला.

३. दानधर्माच्या गर्दीत ब्राह्मण चिरडून मृत्यू पावले, इत्यादी.

शंभूराजांच्या जीवनातील अंतिम शोकांतिका ठाऊक असल्यामुळे बखरकाराने पाल्हाळिकपणे व पुराणिकी थाटात भवितव्य आधीच ध्वनित करणारे अपशकून काल्पनिकपणे घुसडून दिले आहेत. जानेवारीत रायगडावर सूर्यदर्शन न होणे कसे शक्य आहे ? शिवाय अशा विधीत सूर्यदर्शनाचे महत्त्व तरी काय ? दुसऱ्या गोष्टीसुद्धा अशाच असत्य आहेत. असो. एकूण अशाप्रकारे शंभूराजे स्वराज्याचे छत्रपती झाले.

१३. घरभेद्यांची कारस्थाने

शंभूराजांनी राज्याभिषेकाच्यावेळी सर्व जुने अपराध क्षम्य करून अष्टप्रधानांच्या नेमणुका केल्या. ज्यांनी शिवरायांच्या मृत्यूनंतर पन्हाळ्यात अटक करण्याचे यत्न केले त्यांना सुद्धा पूर्वीप्रमाणेच सन्मान्य पदे दिली. शंभूराजांनी या वेळी दाखविलेली क्षमाशीलता व दाखविलेला मनाचा मोठेपणा याला इतिहासात तोड नाही.

एवढे झाल्यावर खरे तर राज्य सुरळीत चालायला हरकत नव्हती, तथापि सोयराबाईच्या घरभेदी व अदूरदर्शी कारस्थानांनी पुनः उचल खाल्ली.

त्यावेळी शंभूराजे पन्हाळ्याला गेले होते. औरंगजेबाचा पुत्र अकबर हा औरंगजेबाकडून पळून आला होता आणि त्याने संभाजीमहाराजांचा राजकीय आश्रय घेतला होता. शंभूराजांनी त्याला आश्रय दिला होता. त्याला दिल्लीचा बादशहा होण्याची महत्त्वाकांक्षा होती. शंभूराजांनी अनेक वेळा त्याला मराठी सेना सोबत देऊन उत्तरेकडील भागातून स्वाऱ्या करण्यास प्रेरणा दिली होती; पण तो औरंगजेबी पाताळयंत्री सेनेपुढे टिकाव धरू शकणे अशक्य होते. रायगडाच्या कटकऱ्यांनी एक अफलातून योजना आखली. शंभूराजांचा काटा काढल्याशिवाय राजारामास गादीवर बसता येणार नाही, म्हणून त्यांनी विषाची पुडी बरोबर देऊन दोन खास दूत अकबराकडे पाठविले.

अकबराने या कामात सहकार्य देऊन शंभूराजांना विष घालावे म्हणजे मराठे सर्वशक्तीनिशी त्याच्या पाठीशी उभे राहतील आणि स्वराज्यातील मोठा हिस्सा अकबराला देतील, अशी हमी या पत्रात देण्यात आली होती. अकबराबरोबर रजपुतांच्या उठावातील नेता दुर्गादास राठोड हा होता. त्याच्या सूचनेवरून अकबराने सरळ ते पत्र शंभूराजाकडे रवाना केले. शंभूराजे सावध झाले.

आपल्याला जिवानिशी ठार करू पाहणारे आपलेच लोक आहेत, हे दिसताच संतप्त शंभूराजे यांनी प्रमुख कटकऱ्यांना हत्तीच्या पायी देऊन ठार केले. यात अण्णाजी दत्तो, हिरोजी फर्जंद आणि बाळजी आवजी यांचा मुख्यत: समावेश होता. शिवाय सोयराबाईना त्यांनी ऑगस्ट १६८१ मध्ये कैद केले. पुढे ऑक्टोबर १६८१ मध्ये सोयराबाईनी विष प्राशन करून आत्महत्या केली. अशाप्रकारे एका मोठ्या दुष्ट कारस्थानाचा पुरा बिमोड झाला. वास्तविक सत्ताग्रहण केल्यावर पूर्वघटना विसरून

शंभूराजांनी सर्वांना नव्या राजवटीत सन्मानाने सामावून घेतले होते आणि सोयराबाईंनाही सन्मानाने वागविले होते. सईबाईच्या मागे सोयराबाईंनीही शंभूराजांवर पोटच्या मुलाप्रमाणे प्रेम केले होते. युवराज म्हणून शंभूराजांचे नांव घोषित झाले तेव्हां त्या त्यांच्या जवळच बसल्या होत्या. त्यावेळी राजाराम चार वर्षांचा होता. शंभूराजांचे राजारामावर अतिशय प्रेम होते.

पण कोणी मंथरा सोयराबाईंना फितवायला कारण झाली, की त्यांनाच कलीने ग्रासले कोण जाणे! स्वपुत्रप्रेमाने त्या अंध झाल्या होत्या. आपल्या महाराणीपदाच्या जोरावर काही सरकारकुनांनाही त्या आपल्याबरोबर नाचवीत होत्या. त्यांच्या सख्ख्या भावाचे, सरसेनापती हंबीरराव मोहित्यांचे सहकार्य त्यांना लाभले नाही. इतकेच नव्हे, तर त्यांच्या स्वामीनिष्ठेबद्दल सोयराबाईंना खात्री होती. तरीही 'विनाशकाले विपरीत बुद्धि' असे म्हणतात तेच खरे. स्वराज्याच्या सम्राटाला भडाग्नी देण्याच्या महापापाबद्दल याच लोकांत त्यांना स्वहस्ते मृत्यूची शिक्षा भोगावी लागली.

या साऱ्या प्रकरणात बाळाजी आवजीसारखा निष्ठावंत चिटणीस मात्र स्वामीनिष्ठेपायी अकारण भरडला गेला. ही गोष्ट येसूबाईंनी शंभूराजांच्या नजरेस आणून देताच त्यांना अतोनात दुःख झाले. महाभारतात कौरवांपैकी एक विकर्ण, याला ठार मारल्यावर भीमसेनाला असेच दुःख झाले होते.

काही लेखकांनी सोयराबाईंना कटप्रमुख म्हणून दोष न देता सरकारकुनांना दिला आहे; पण त्या ठाम असत्या तर असला कट कोणीच करू शकले नसते. या उलट काही पुरावे सोयराबाईंनी महाराजांवर विषप्रयोग केला असे दाखवित असून, साऱ्या कटाच्या सूत्रधार त्याच होत्या हे पटवून देत आहेत. अर्थात सत्य एक परमेश्वरच जाणे!

❋❋❋

१४. समर्थांचे पत्र

सज्जनगडाचे लक्ष रायगडाकडे होतेच. गृहकलहाचा हा स्फोट साऱ्या महाराष्ट्राला दुःखदायकच होता. शिवरायांच्या निधनानंतर स्वकीयांचे एवढे विकोपाला गेलेले हेवेदावे समर्थांना अस्वस्थ करीत होते. अशा बिकट प्रसंगात शंभूराजांना प्रेरणा देणे समर्थांना आवश्यक वाटले. एक उत्कृष्ट मार्गदर्शनपर पत्र म्हणून या पत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

अखंड सावधान असावे। दुश्चित कदापि नसावे।
तजवीज करीत बैसावे। एकांतस्थळी।।
काही उग्रस्थिती सोडावी। काही सौम्यता धरावी।
चिंता पराची लागावी। अंतर्यामी।।
मागील अपराध क्षमावे । कारभारी हाती घ्यावे।
सुखी करूनि सोडावे। कामाकडे।।
पाटांतील तुंब निघेना। तरी मग प्रवाह चालेना।
तैसे जनांच्या मना। कळले पाहिजे।।
जनाचा प्रवाह चालला। म्हणजे कार्यभाग आटोपला।
जन ठायी ठायी तुंबला। म्हणजे खोटे।।
श्रेष्ठी जे जे मेळविले। त्यासाठी भांडत बैसले।
मग जाणावे फावले। गनिमासी।।
ऐसे सहसा करू नये। दोघे भांडता तिसऱ्यासी जय।
धीर धरूनि महत्कार्य। समजूनि करावे।।
आधीच पडली धास्ती। म्हणजे कारभार होय नास्ती।
या कारणे समस्ती। बुद्धी शोधावी।।
राजी राखता जग। मग कार्यभागाची लगबग।
ऐसा जाणोनी सांग। समाधान राखावे।।
सकळ लोक एक करावे। गनिमा निपटून काढावे।
येणे करिता कीर्ती धावे। दिगंतरी।।
आधी गाजवावे तडाखे। तरी मग भूमंडळ धाके।

ऐसे न करिता धक्के। राज्यासी होती ।।
समय प्रसंग ओळखावा। राग निपटून काढावा।
आला तरी कळो न द्यावा। जनामध्ये ।।
राज्यामध्ये सकळ लोक। सलगी देऊनि करावे सेवक।
लोकांचे मनामध्ये धाक। उपजोचि नये ।।
बहुत लोक मेळवावे। एक विचारे भरावे।
कष्ट करोनि घसरावे। म्लेंच्छांवरी ।।
आहे तितुके जतन करावे। पुढे अधिक मेळवावे।
महाराष्ट्र राज्य करावे। जिकडे तिकडे ।।
लोकी हिंमत धरावी। शर्थीची तरवार करावी।
चढती वाढती पदवी। पावाल तेणे ।।
शिवरायाचे आठवावे रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप।
शिवरायाचा आठवावा साक्षेप। या भूमंडळी ।।
शिवरायाचे कैसे बोलणे। शिवरायाचे कैसे चालणे।
शिवरायाचे सलगी देणे। कैसे असे ।।
सकळ सुखाचा त्याग। करोनि साधिजे तो योग।
राज्यसाधनाची लगबग। कैसी केली ।।
त्याहून करावे विशेष। तरीच म्हणवावे पुरुष।
याउपरी आता विशेष। काय लिहावे ।।
शिवरायासी आठवावे। जीवित तृष्णवत् मानावे।
इहलोकी परलोकी उरावे। किर्तीरूपे ।।
निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू।
अखंड स्थितीचा निर्धारू ।। श्रीमंत योगी ।।

या पत्रावरून शंभूराजांनी उग्रता धारण केली होती. त्यांनी कारभाऱ्यांना अकारण शासन केले, दोघांच्या भांडणात तिसऱ्याचाच जय होतो म्हणून शंभूराजांनी भांडू नये, ते सावध नव्हते असे समर्थांना म्हणायचे होते, असे नव्हे, तर शंभूराजांनी गांभीर्याने पुढे कसे वागावे याचे उत्तम मार्गदर्शन यात आहे. यात दोषारोपाचे हेतू नसून वैचारिक दिग्दर्शन आहे. असेच मार्गदर्शन त्यांनी शिवरायांनाही केले होते.

समर्थ्यांचे पत्र शंभूराजांनी मस्तकी धरले. आबासाहेबांप्रमाणेच समर्थांचे आपणाकडेही लक्ष आहे या विचाराने त्यांचे नेत्र अश्रूंनी भरून आले. पत्र पुनःपुन्हा

वाचून शंभूराजांनी आपल्या मनाशी काही निश्चय केला. अश्रू पुसून ते गंभीर बनले. अंतर्मुख बनले. समर्थांचे पत्र डिसेंबर १६८१ चे आहे. शंभूराजांच्या हाती ते जानेवारी १६८२ च्या आरंभी पडले. समर्थांना भेटण्यासाठी त्यांचा जीव अधीर झाला. राज्याभिषेक होऊन जेमतेम एक वर्ष होत हेते. सर्व कामे मार्गी लावून शंभूराजे समर्थभेटीस निघणार तोच दुर्दैवी वृत्त हाती आले. माघ वद्य नवमी, शके १६०३, २२ जानेवारी १६८२ रोजी समर्थांनी 'श्रीराम' असा शब्द उच्चारून इहलोकाचा निरोप घेतला. शंभूराजांनी समर्थांच्या उत्तरकार्यासाठी विपुल द्रव्य देऊन रामचंद्रपंत अमात्य यांस सज्जनगडावर पाठविले. दीड महिन्यानंतर स्वतः जाऊन समाधीचे दर्शन घेतले. त्या ठिकाणी मोठे मंदिर बांधून मठाच्या खर्चासाठी सर्व व्यवस्था केली. शंभूराजांच्या मनांत समर्थांबद्दल नितांत आदर होता.

अभिप्राय क्र.७

शाहीर योगेश,

अध्यक्ष, धर्मवीर छ.संभाजी महाराज प्रतिष्ठान,पोस्टल कॉलनी, वाकड, पुणे २७

आपण अगदी मुद्देसूद व परिणामकारक चरित्र लिहून संभाजीराजांचे वास्तवरूप समाजापुढे ठेवले व ते सुद्धा अगदी कमी किमतीत याबद्दल मला खूपच आनंद होत आहे. माझा अभिप्राय म्हणजे, आपल्या 'शंभूराजे! आम्हांला सामर्थ्य द्या' या प्रकरणातील आपण जो परिणाम अपेक्षित धरला आहे तोच आहे. आपण शंभूराजे पुस्तकांत संक्षिप्त स्वरूपात खूप काही लिहिले. अभ्यासकांनी इतिहास पडताळून पाहिल्यास 'शंभूराजे' चरित्राबद्दल कोणाचेही दुमत होणार नाही. औरंगजेबाच्या दरबारातील खाफीखान याने संभाजी राजाबद्दल ''सत्तेची नशा चढलेला राजा'' असे वर्णन केले, तर ग्रँड डफ याने Intoxicated with the wine of Folly & Pride असे त्याचे इंग्रजी भाषांतर केले व आम्ही त्या नशेचा अर्थ 'मद्यपी' असा केला व संभाजीराजांना रंगेल राजा असे समजून त्यांची विकृत प्रतिमा समाजात उभी केली.

संभाजीराजांनी देशासाठी व धर्मासाठी बलिदान केले याबाबत आता कुणाचेच दुमत नाही, ऐन तारुण्यात -वयाच्या केवळ ३२व्या वर्षी धर्माबद्दल एवढा जाज्वल्य अभिमान बाळगणारा हा शिवपुत्र स्वतः संस्कृत पंडित होता हे किती जणांना माहीत आहे? वयाच्या १५व्या वर्षी संभाजीराजांनी 'बुधभूषण' हा संस्कृत ग्रंथ लिहिला. त्याची हस्तलिखित प्रत इटलीत नुकतीच सापडली आहे.'' ''धर्मकल्पलता'' या धर्मशास्त्रावरील ग्रंथाची रचना त्यांनी केशव पंडितांकडून करवून घेतली. २४ ते ३२ व्या वयात सव्वाशेच्यावर लढाया केल्या व एकदाही पराभव न स्वीकारलेला हा जगातील एकमेव युवा राजा होता असे म्हटले तर चूक ठरणार नाही. आपल्या पुस्तकाच्या लाखो प्रती निघाव्यात ही इच्छा!

–शाहीर योगेश

१५. काटेरी मुकुट

शंभूराजांच्या हाती स्वराज्याची सूत्रे आली त्या वेळची परिस्थिती मोठी विलक्षण होती. शिवशाहीला समाप्त करण्याच्या इराद्याने मोगल दक्षिणेत येऊन ठाकला होता. आदिलशाही आणि कुतुबशाही सत्तासुद्धा मोगली आक्रमणाच्या भयाने त्रस्त झालेल्या असल्यामुळे शिवकालीन मैत्रीचे संबंध चालू ठेवण्यास असमर्थ होत्या. जंजिऱ्याच्या सिद्धीला नामशेष करण्याचे छत्रपती शिवरायांचे स्वप्न अपुरेच राहिले होते. उलट, स्वतः महाराजच निधन पावल्याने आणि मोगलांशी त्याचे संबंध जवळिकीचे निर्माण झाल्यामुळे त्याला जरब बसविणे हे एक प्राप्त कर्तव्य ठरले होते. पोर्तुगीज आणि सिद्धी हे दोन्ही जलचर समानशील असून मराठ्यांचे समान शत्रू होते. म्हणून त्यांची स्वराज्याविरुद्ध गट्टी होती. मराठ्यांच्या शिवकालीन नवनिर्मित आरमाराच्या आक्रमणाच्या भीतीपायी मुंबईकर इंग्रज आणि सिद्धी यांना आर्थिक व लष्करी साह्य करून मराठ्यांविरुद्ध कारवाई करण्याचे उपद्व्याप पोर्तुगीज सत्तेकडून नेहमी केले जात. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठी राज्य आपण सहज गिळून टाकू अशा समजुतीने औरंगजेबाने चहुबाजूंनी मराठेशाहीला चेपण्याचे निकराने प्रयत्न सुरू केले होते.

आणि दुर्दैवाने स्वराज्यातील स्वकीयांचे मनोमन ऐक्य नव्हते. शंभूराजे दिलेरखानाकडे सुमारे वर्षभर राहून महाराजांच्या निधनापूर्वी केवळ चार महिनेच आधी परत आले होते. महाराजांची ही राजकीय चाल सामान्य माणसांना आकलन होण्यापलीकडील असल्याने शंभूराजांबद्दल पूर्ण विश्वास ठेवण्यास जनसामान्यांचे मन भीत होते. शिवाय शिवरायांचे मातब्बर हस्तकच त्यांच्याविरुद्ध कट-कारस्थाने करून, त्यांना डावलून राजारामाला गादीवर आणण्यासाठी खटपट करीत होते. बहुसंख्य सरदार-मनसबदार शंभूराजांच्या बाजूचे असले, तरी काहीजण भयगंडाने मोगलांना सामील होऊ लागले होते. एका अलौकिक व्यक्तीच्या जागेवर आरूढ होणे तसे सोपे नसते. त्यामुळे ३ एप्रिल १६८० रोजी शिवरायांचे निधन झाले तरी संभाजीराजांच्या राज्यारोहण समारंभास १६ जानेवारी १६८१ हा दिवस उजाडावा लागला. शंभूराजांनी कट करणाऱ्यांना पूर्ण माफी देऊन पुनः अष्टप्रधानातील त्यांच्या-त्यांच्या पदांवर व इतरांना त्यांच्या मूळ पदांवर पुनः प्रस्थापित केले व

राज्यकारभार सुरू केला, तरीही त्यांच्याविरुद्ध असलेल्या सरकारकुनांनी पुनः उचल खाल्ली होती आणि त्यांच्या प्रवृत्तीचा कठोरपणे बीमोड करण्यासाठी ऑगस्ट १६८१ पर्यंतचा काळ जावा लागला.

तथापि म्हणून घरचा बंदोबस्त करीपर्यंत ते स्वस्थ मात्र बसले नव्हते. सरसेनापती हंबीरराव मोहित्यांनी बऱ्हाणपूरची मोहीम फत्ते करून प्रचंड लूट जमा करून आणली. औरंगजेबाची भारी लाडकी नगरी बऱ्हाणपूर, 'विश्वसुंदरीच्या गालावरील तीळ' असे जिला औरंगजेब म्हणत असे, ती ही नगरी, मराठ्यांनी होंती का नव्हती करून टाकून जणू बादशहाची दाढीच खेचली होती. यामुळे औरंगजेब संतप्त झाला आणि त्याचवेळी शंभूराजांचा राज्याभिषेक समारंभ पार पडला.

याच सुमारास राजस्थानात मारवाड व उदयपूरचे सर्व रजपूत एक होऊन त्यांनी अघोषित धर्मयुद्ध पुकारले. औरंगजेबाचा पुत्र अकबर याला त्यांनी बादशहा म्हणून मान्यता दिली आणि त्यानेही १ जानेवारी १६८१ रोजी राज्याभिषेक करून घेऊन दुर्गादासच्या प्रचंड रजपूत सेनेसह औरंगजेबालाच अटक करण्यासाठी अजमेरकडे प्रयाण केले. औरंगजेब हादरला, पण त्याचे दैव बलवत्तर. अकबराचे आक्रमण फारच धीम्या गतीने झाले. १२० मैल जायला त्याला १५ दिवस लागले. तोवर औरंगजेबाला भरपूर वेळ मिळाला. त्याने शहाजादा आज्जमला अजमेरला बोलावून घेतले व शिवाय अन्य मार्गानेही प्रचंड सेना जमविली. शिवाय त्याने एक खोटेच पत्र अकबराच्या नावाने तयार करून रजपुतांच्या हाती पडेल असे केले. या पत्रात 'उद्या सकाळी एकीकडून तू व दुसरीकडून मी असे दोघे दोन बाजूंनी या काफर रजपुतांना खलास करू.' असे म्हणून रजपुतांविरुद्ध उत्तम सापळा रचल्याबद्दल त्याचे अभिनंदन केले. हे पत्र खरे वाटून रजपूत गोंधळले आणि ६०-७० हजार जमा केलेले कडवे रजपूत पळून गेले.

अशा परिस्थितीत पळून जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते, तेव्हां दुर्गादास राठोड आणि शहाजादा अकबर छत्रपती शंभूराजांकडे आश्रयाला आले. त्यांनी शंभूराजांना पत्र लिहिले. त्यात म्हटले होते की, 'परमेश्वरकृपेने मला राज्य मिळाले तर नाव माझे व राज्य तुमचे राहील. आलमगीर हा तुमचा व माझा शत्रू आहे हे लक्षात घ्या. त्यामुळे आपण दोघांनी मिळून आपले उद्दिष्ट साध्य होईल असे करण्याचा निश्चय करू.' पुनः मे १६८१ मध्ये त्याने दुसरे पत्र पाठविले व साहाय्याची याचना केली. शहाजादा अकबराला आश्रय देणे म्हणजे चूड दाखवून वाघाला अंगावर

घेण्यासारखेच होते. तरी शंभूराजांनी 'समानशीले व्यसनेषु सख्यम्।' या न्यायाने त्याला आश्रय दिला आणि सुधागडच्या पायथ्याशी पालीजवळ त्याला ३०० पायदळ संरक्षणार्थ देऊन राहण्याची व्यवस्था केली. त्याचेजवळही ४०० स्वार व २५० उंट होते. त्याच्या तेथील वास्तव्याने त्या गावाला पातशहापूर हे नांव प्राप्त झाले. अकबरावर विश्वास कसा ठेवावा हा प्रश्न होता; पण याच वेळी अकबराच्या साह्याने शंभूराजांना विषप्रयोग करायची दुष्ट बुद्धी रायगडाच्या कटकऱ्यांत उत्पन्न झाली. त्यांनी सोबत विष देऊन अकबराकडे दूत रवाना केले व त्याला एक पत्रही दिले आणि त्यालाही आपल्या कटांत सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला. अकबराने ते पत्र सरळ शंभूराजांकडे धाडले, त्यामुळे तो कट उधळला गेला. शंभूराजांना अकबराबद्दल विश्वास वाटू लागला व त्यांनी १३ नोव्हेंबर १६८१ रोजी पातशहापुरात भेट घेऊन अकबराला बादशहा म्हणून मान्यता दिली.

योगायोग असा, की त्याच दिवशी बादशहा औरंगजेब बऱ्हाणपुरात येऊन पोहोचला. शहाजाद्यांच्या बंडखोरीला मराठशाहीने मान्यता दिली तशीच उत्तरेच्या राजांनी दिली तर आपली धडगत नाही हे तो जाणून होता. म्हणून त्याने आता एक उद्दिष्ट -शहाजादा अकबर आणि हिंदवी स्वराज्य यांचे संपूर्ण पारिपत्य करणे - असे ठरवून धडक कार्यक्रम हाती घेतला. आशियातील सर्वांत मोठे साम्राज्य एका अगदी छोट्या स्वराज्याला नेस्तनाबूत करण्याकरता सात लक्ष सेनेचा महासागर घेऊन त्यावर तुटून पडण्यास सज्ज झाले होते. २४ वर्षे वयाच्या शंभूराजांना, राजकारणात पंचेचाळीस वर्षे घालविलेला बादशहा समाप्त करायला निघाला. आज्जम, मोअज्जम, रणमस्तखान, कोकल्ताश, हसन अलीखान यांसारखे बडे बडे मातब्बर अनुभवी पंचवीस सेनानी आपल्या सेनासागरासह स्वराज्य बुडवायला सिद्ध झाले.

अभिप्राय क्र.८

श्री.मु.गो.गुळवणी

इतिहास संशोधक, पन्हाळा, कोल्हापूर

आपले 'शंभूराजे' पुस्तक आवडले. शंभूराजांवरील अन्याय दूर होणे आवश्यक. ते आपण धडाडीने मांडलेत. संभाजीला न्याय दिलात. लोकांसमोर पराक्रमी संभाजी आणलात. त्याबद्दल अभिनंदन.

सोपी भाषा, इतिहासास धरून स्पष्टपणे मांडलेले विचार, पूर्वीच्या चरित्रांनी मलिन झालेली प्रतिमा पुसण्याचा केलेला उचित प्रयत्न अभिनंदनीय आहे.

-मु. गो. गुळवणी

१६. मानवता विरुद्ध जिहाद

एकीकडे वैदिक धर्माचा अभिमानी, हैंदवी स्वराज्याचा रक्षक शंभूराजा! दुसरीकडे कडवा धर्मांध औरंगजेब! जो वैदिक धर्म, सर्वधर्मसमभाव शिकवतो, 'जे जे देखिजे भूत, ते ते मानिजे भगवंत!' हा ज्याचा उपदेश! - 'कोणाही जीवांचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे।' हा ज्याचा सिद्धान्तः, 'पराविया नारी रखुमाई समान' ही ज्याची प्रवृत्ती, सहस्रावधी वर्षांची प्राचीन आणि परिपूर्ण अशी ज्याची संस्कृती! तो वैदिक हिंदू धर्म हा शंभूराजांचा प्राण! शिवशाहीच्याही आधीपासून अनेक मुसलमान या देशात राहात होते. शिवरायांच्या सैन्यातही अनेक मुसलमान होते; पण आपले मुसलमानपण कधी धोक्यात येईल असे त्यांना वाटले नाही. पण मुसलमानी राजांच्या सेवेतील व रयतेतील लोकांना आपला धर्म हाच आपला गुन्हा मानला जाऊन केव्हां काय आपत्ती ओढवेल याचा भरवसा वाटत नसे. एकीकडे उदारमतवादी सहिष्णु हिंदू व दुसरीकडे धार्मिकदृष्ट्या अत्यंत धर्मांध, असहिष्णु, उग्र व दुष्ट प्रवृत्तीची मोगल सत्ता!

पंचवीस-तीस रणझुंझार सेनाधिपतींच्या हाताखाली तीन लक्ष घोडदळ आणि चार लक्ष पायदळ, शेकडो हत्ती, सामानासाठी हजारो उंट, अनेक बेलदार, वंजारी, कामगार असा हा महा सेनासागर घेऊन औरंगजेब स्वतः महाराष्ट्राला नेस्तनाबूत करायला महाराष्ट्रात उतरला. स्वराज्याची अवस्था कठीण होती. जेमतेम ३०-४० हजार सैन्य, भरवसा ठेवण्यासारखे हंबीरराव मोहिते, कवी कलश, प्रल्हाद निराजी, केसो त्रिमल, निळोपंत पेशवे यांच्यासारखे दहा-बारा सेनानायक! शंभूराजांनी कठोर शिक्षा केल्यामुळे दुखावली गेलेली कित्येक घराणी. छोटेसे राज्य! त्याचा थोडासा वसूल! या सामुग्रीनिशी तोंड देण्याची जबाबदारी होती शंभूराजांवर!

औरंगजेबाने या महामोहिमेला 'जिहाद' म्हटले आहे. २१ नोव्हेंबर १६८१ रोजी बऱ्हाणपूर येथील अब्दुल लतीफच्या दर्ग्यास भेट देऊन औरंगजेबाने 'इस्लाम'च्या शत्रूंचा नाश करण्यासाठी आपणांस बळ मिळावे म्हणून त्याला प्रार्थना केली. "ही मोहीम काढण्यात माझा हेतू केवळ जिहाद करणे हाच आहे. या सेवेने अल्ला व पैगंबर प्रसन्न होवोत." असे त्याने जाहीर केले. मराठी साम्राज्याचा संपूर्ण नाश आणि 'काफर बच्चा संभाजीला ठार मारणे' हे लक्ष्य ठरवूनच औरंगजेबाची

व्यूहरचना आखली जात होती. त्याने सर्व बाजूंनी स्वराज्याची कोंडी करायचे ठरविले. जंजिऱ्याच्या सिद्दीला त्याने हाती धरले. पोर्तुगीजांशी बोलणी सुरू केली. आदिलशाही-कुतुबशाहीला जरब बसविली आणि आपल्या सेनेने स्वराज्याला सर्व बाजूंनी वेढून टाकले.

औरंगजेबाची फूस मिळाल्यामुळे जंजिऱ्याचा सिद्दी चांगलाच चेकाळला. मूळ आफ्रिकेतील अबिसीनियामधून आलेले हे हबशी लोक जंजिऱ्याचे व कोकणपट्टीतल्या सध्याच्या रायगड जिल्ह्यातल्या, रोह्याची खाडी, माणगांव तालुका, बाणकोटची खाडी, महाडच्या आसपासचा प्रदेश, दंडाराजपुरी या भागाचे सत्ताधारी बनले होते. शिवरायांनाही त्यांचे पक्के पारिपत्य करता आले नव्हते. हबशीच्या जहागिरीला हबसाण म्हणत! जसे बागलांचे बागलाण, फिरग्यांचे फिरंगाण, शिर्क्यांचे शिरकाण! या हबशांनी या कोकणपट्टीवर धुमाकूळ घातला होता. तरण्याताठ्या हिंदू स्त्रियांना तर बाहेर तोंड काढायला नको अशी अवस्था होती. दिवसाढवळ्या सारी कुळागारे स्त्रियांच्या आक्रोशांनी आणि किंकाळ्यांनी भरून जायची. स्त्रियांना पळवून तारवावर नेऊन, त्यांच्यावर अनेक नरपशूंनी बलात्कार करून ते त्यांना समुद्रात ढकलून द्यायचे. लोकांच्या तोंडात गोमांस घालून, त्यांचे नाक-कान कापून त्यांना खुशाल दर्यात लोटून द्यायचे. घराघरात शिरून हवी तशी लूटमार करावी आणि दिसतील त्या आबाल वृद्धांना कापून काढावे हा त्यांचा खाक्या होता. औरंगजेबाकडून फूस मिळाल्यामुळे सिद्दी शेफारला. त्याने नागोठाणे, आपटे, नागाव इत्यादी भागांत धाडी घालायला प्रारंभ केला. कित्येक गांवे जाळून भस्मसात केली. शंभूराजांना हे वृत्त कळताच संतापलेले शंभूराजे वीस हजार घोडेस्वार व तोफखाना बरोबर घेऊन निघाले. दंडाराजपुरीचा कोट त्यांनी तोफा डागून उद्ध्वस्त करून टाकला. जंजिऱ्यावर तोफांचा मारा सुरू केला. इतकेच नव्हे, तर रामाच्या सेतूप्रमाणे त्यांनी राजपुरीपासून जंजिऱ्यापर्यंत सेतू बांधण्यास प्रारंभ केला. धडाधड दगडधोंडे दर्यात पडू लागले. उसळणाऱ्या सागरात सेतू बांधणे सोपे नव्हते; पण हे काम वेगाने सुरू झाले. सिद्दी अल्लाची करुणा भाकू लागला.

याचवेळी औरंगजेबाचे पस्तीस हजार सैन्य कोकणात उतरले. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी विसाजी रघुनाथ आणि दादाजी रघुनाथ यांच्यावर वेढ्याचे काम सोपवून शंभूराजे कल्याण-भिवंडी भागाकडे धावून गेले. शेकडो मोगल कापून काढले. त्यांचा सरदार हसनअली खान जखमी झाला आणि शेवटी पळून गेला. मे १६८२ साली कल्याणवर भगवा झेंडा फडकला. शंभूराजांनी मोगल सैन्याचे खासेच पारिपत्य

केले. या यशाने महाराष्ट्र आनंदित झाला. औरंगजेबाच्या छातीत धडकी भरली. सिद्दीवरील या उपरोक्त स्वारीत शंभूराजांना अंतिम यश लाभले नाही हे जरी खरे, तरी सिद्दीला नमविण्यात ते इतके यशस्वी झाले, की त्यानंतर त्यांच्या कारकीर्दीत त्याने कधीच डोके वर काढले नाही.

औरंगजेब स्वतः २२ मार्च १६८२ रोजी औरंगाबादेस आला. तत्पूर्वी मे १६८१ मध्ये मराठ्यांनी औरंगाबाद लुटून फस्त केले होते आणि तेथील लोकांत जबरदस्त दहशत उत्पन्न केली होती. महाराष्ट्रावर विजय मिळवायचा तर ठिकठिकाणचे किल्ले काबीज केले पाहिजेत असा विचार करून औरंगजेबाने शहाबुद्दिन फिरोजजंग याला नाशिकजवळील रामसेजचा किल्ला जिंकण्याकरता पाठविले. किल्यावर फक्त पांच-सहाशे मराठे होते ३०-४० हजार फौजा आणि मातब्बर ५-६ सरदार घेऊन शहाबुद्दिन एप्रिल १६८२ मध्ये रामसेजवर चालून आला. त्याने रामसेजला वेढा घातला; पण मराठी गनिमीकाव्याने त्याला वेढा घालतानाच बेजार केले.

महिना होऊन गेला तरी किल्ला हाती लागेना. उलट शंभूराजांनी धाडलेले ५-७ हजार मराठी सैन्य, मानजी मोरे आणि रूपाजी भोसले यांच्या नेतृत्वाखाली शहाबुद्दिनच्या सेनेवर अचानक तुटून पडले. हजारो मोगल सैनिक कापले गेले. शेकडो घोडे पळविले गेले. प्रचंड लूट मिळाली आणि थोड्या सेनेसमोरून शहाबुद्दिन कसाबसा निसटला. पुनः काही दिवसांत त्याने रामसेजवर हल्ला केला; पण वरून होणाऱ्या दगडमाऱ्यामुळे त्याचे काही चालले नाही. तो जुन्नरकडे पळून गेला. त्यानंतर औरंगजेबाने बहादूरखानला अधिक कुमक देऊन रामसेजकडे पाठविला. त्याने अनेक युक्त्या-प्रयुक्त्या करून प्रयत्नांची शर्थ केली; पण मराठ्यांनी त्याचा काही पाड लागू दिला नाही. अखेर रोज ऐकू येणाऱ्या पराभवांनी संतापलेल्या बादशहाने बहादूरखानास परत बोलावून घेतले. रामसेजच्या पराभवाने वैतागलेल्या बादशहाने आपल्या डोक्यावरची पगडी जमिनीवर आपटली आणि त्या काफर बच्चा शंभूराजास पकडल्याशिवाय किंवा ठार मारल्याशिवाय पगडी घालणार नाही अशी प्रतिज्ञा ३० जुलै १६८२ ला केली. पांच वर्षे धडपड करूनही रामसेजसारखा छोटा किल्ला औरंगजेबाच्या हाती लागला नाही. त्र्यंबकगडावरील केसो त्रिमल हे रामसेजला सर्वप्रकारे मदत करीत होते, म्हणून त्र्यंबकगडावर मुजफरखानाला बादशहाने पाठविले; परंतु तीही मोहीम यशस्वी होईना. उलट, मराठ्यांच्या सैन्याच्या तुकड्या वऱ्हाडात मलकापूर, वाशिम, मेहेकर, कारंजा, देऊळगांवराजा, जालना इत्यादी भागांत घुसून चौथाई वसूल करू लागल्या. खुद्द औरंगजेबाच्या परिसरातच

हा धुमाकूळ चालू होता. इकडे कोकणची हसनअलीखानाची पहिली मोहिम अयशस्वी झाली होती. बादशहाने रणमस्तखानाला तिकडे धाडला. रणमस्तखानाच्या साहाय्याला, हरिसिंग राठोड, पद्मसिंग, बहादूरखान वगैरे मंडळी पाठविण्यात आली होती. टिटवाळ्याजवळ घनघोर लढाई झाली. खासे शंभूराजे या मोहिमेचे नेतृत्व करीत होते. पद्मसिंग ठार झाला. हरिसिंग कैद झाला. अन्य पांच-पंचवीस सरदार जखमी झाले. मराठ्यांनी रणमस्तखानाला घाटाच्या पायथ्याशी घेरून कोंडीत पकडला. बादशहाने त्याच्या मदतीसाठी रुदुल्लाखानाला पाठविले. तोही घाटात कोंडला गेला. त्याची रसद तोडली. अखेर रुदुल्लाखान एप्रिल १६८३ मध्ये माघारी फिरला.

❋❋❋

अभिप्राय क्र. ९

डॉ. विठ्ठल त्र्यंबक गुणे,

एम.ए., पी.एच्.डी.

माजी १) इतिहास संशोधन अधिकारी, प्रथमश्रेणी, विदेश मंत्रालय, नवी दिल्ली, २) हेग-मधील आंतरराष्ट्रीय न्यायालयांत भारत सरकारचे इतिहासतज्ज्ञ, ३) संचालक, गोवा, दमण, दीव प्रदेश पुराभिलेखागार व पुरातन संग्रहालय, भारत सरकार, पणजी गोवा.

पत्ता : ४१-६६९ लोकमान्यनगर, पुणे ४११ ०३० दि. ६-११-१९९३

आपण 'शंभूराजे' हे छोटेखानी पुस्तक लिहून फार मोठी मराठ्यांच्या इतिहासाची सेवा केली आहे. शाळा-कॉलेजांतून महाराष्ट्राचाच काय पण भारताचाही इतिहास न शिकविण्याकडेच सांप्रतच्या सत्ताधाऱ्यांचा व विश्वविद्यालयीन विद्वानांचा कल आहे.

आपण 'शंभूराजे' यांचे पुस्तक नवीन पिढीस वाचावेसे वाटेल अशाप्रकारे थोडक्यात शास्त्रशुद्ध व मुद्देसूद लिहिले आहे. सांप्रतच्या या महान परंपरा असलेल्या देशाच्या अवनतीच्या काळात तरुणांना यापासून प्रेरणा मिळेलच यात शंका नाही.

सदैव लोभ असावा.

आपण मुद्दाम माझ्याकडे हे प्रकाशन पाठविले त्याबद्दल आपला आभारी आहे. अशाच-प्रकारे महाराणी लक्ष्मीबाई चरित्र आपण लिहावे असे आपणांस सुचवावेसे वाटते. धन्यवाद!

—डॉ. वि. त्र्यं. गुणे

१७. यवनाधमाला कारागृहात टाकू या

हिंदवी स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी शंभूराजांनी एक पत्र मिर्झा राजे जयसिंगाचा पुत्र रामसिंग यास पाठविले. ते मूळ संस्कृत भाषेत असून, त्यावरून शंभूराजांचे उद्दिष्ट व वैचारिक भूमिका स्पष्ट होते.

''तुमचे पत्र मिळाले, मी बादशहास विरोध न करता त्याचे सार्वभौमत्व मान्य करावे असे पत्रात तुम्ही सुचविले आहे. तुमचा मुलगा कृष्णसिंग याने सुलतान अकबराबरोबर कारस्थान केले म्हणून त्याचा कसा सर्वनाश झाला ते तुम्ही जाणताच!

राजकीय परिस्थितीचा पूर्ण विचार करून तुम्ही पुनः लिहिले की, '' तुम्ही आपल्या राज्यात सुलतान अकबर यास आश्रय दिलात ही फार चांगली गोष्ट झाली. तुम्ही जे काही धोरण अंमलात आणीत आहात ते मला मान्य आहे. आपण सगळे हिंदू आहोत म्हणून या परिस्थितीत जे काही करणे योग्य आहे असे तुम्हास वाटेल ते करण्यास मी तयार आहे.''

हा जर तुमचा उद्देश असेल, तर या कामात तुम्हीच पुढाकार घेतला पाहिजे. त्या यवनाधमाला सांप्रत असे वाटू लागले आहे, की आम्ही हिंदू म्हणजे सत्वशून्य झालो आहोत. आम्हाला धर्माचा काहीच अभिमान राहिला नाही. बादशहाची ही वागणूक यापुढे आम्हाला सहन होणे शक्य नाही. आम्ही क्षत्रिय आहोत. आमच्या क्षात्रधर्माला कमीपणा आणणारी कोणतीही गोष्ट आम्ही मान्य करणार नाही.

वेद श्रुति-स्मृति यांनी धर्म आणि जाती यांच्यासंबंधी कर्तव्ये नेमून दिली आहेत. त्यांची पायमल्ली झालेली आम्हाला सहन होणार नाही. राजे म्हणून प्रजापालनाचा धर्म आम्ही टाकू शकत नाही. या दुष्ट यवनाशी युद्ध करण्यात आम्ही आमची संपत्ती, आमचा देश, आमचे दुर्ग, सारांश सर्व काही पणास लावण्यास तयार आहोत. या दृढ उद्देशानेच गेली काही वर्षे अकबर आणि दुर्गादास यांना आमच्या देशात आश्रय दिला आहे. आम्ही यवनाधिपतीच्या अनेक सेनानायकांचा वध केला. कित्येकांना कारागृहात टाकले. काहींना खंडणी घेऊन तर काहींना दयाबुद्धीने सोडून दिले. काहींनी लाच भरून आपली सुटका करून घेतली. अशा रीतीने बादशहाचे सेनानायक कुचकामाचे ठरले.

आता अशी वेळ आली, की त्या यवनाधमाला(औरंगजेबाला) पकडून कारागृहात घालणे शक्य होईल, मग आपल्याला देवतांची पुनः स्थापना करून धर्मकार्ये निर्विघ्नपणे पार पडतील, अशी व्यवस्था करता येईल. हे सगळे लवकर करण्याचे आम्ही ठरविले आहे, याची आपण खात्री बाळगावी.

पण आपल्यामानाने आम्ही अल्पवयी व अननुभवी आहोत. आपल्या धर्माभिमानाच्या आणि शौर्याच्या अनेक गोष्टी आम्ही ऐकल्या आहेत. आपण सांप्रत सप्तांग राज्यसंपन्न आहात. आपण या वेळी धैर्य आणि साहस दाखवून या यवनाची शक्ती नष्ट करण्याच्या कामी आम्हास मदत केलीत तर आपण काय करू शकणार नाही? या गोष्टीचा आम्ही विचार करतो तेव्हां आपण अशा प्रसंगी धर्माभिमान सोडून गप्प बसून राहिला या गोष्टीचे आम्हाला नवल वाटले.

आणखी एक गोष्ट, दुर्जनसिंह हाडा हा कशा प्रकारचा मनुष्य आहे हे आपणा दोघांनाही माहीत आहे. त्याच्यापाशी किती संपत्ती होती हेही आपणास माहीत आहे; पण त्याने आपल्या संपत्तीवर पाणी सोडले आणि आमच्या सूचनेस अनुसरून, शौर्य गाजवून धामधूम उडवून दिली. तुम्ही तिकडच्या भागात असल्यामुळे तुम्हाला हे सर्व माहीत असेलच. इकडे आम्ही अकबर आणि दुर्गादास यांना गुजराथेस पाठविण्याच्या विचारात आहोत. यावेळी आपणही जे काही आवश्यक आहे ते धैर्यपूर्वक करावे.

पठाणाधिपती (इराणचा शहा) अब्बास याने आपण अकबराला मदत करू असे लिहिले आहे; पण आपण या बाबतीत यवनांची मदत घ्यावी आणि यशाचे श्रेय त्यांना मिळवून द्यावे हे मला अनुचित वाटते. आपले तीर्थरूप (जयसिंह) यांनी यवनाधमाला दिल्लीश्वर करून त्यांचे श्रेय संपादिलेच ना! त्याप्रमाणे आपणही अकबराला मदत करून यशाचे धनी व्हावे. यवनाच्या मदतीने अकबराला राजपद लाभले, तर त्यांना प्राधान्य मिळेल. ही गोष्ट होऊ देऊ नये. आपण उभयतांनी एक होऊन अकबराला गादीवर बसविले तर धर्मरक्षणाचे कार्य होईल आणि आपल्या कार्याने महाराज जयसिंहाच्या वंशाला शोभा येईल.''

या पत्राने शंभूराजांच्या मनातील आग व भव्य स्वप्न स्पष्ट होते. तसेच गुलामगिरीलाच चटावलेल्या व भयगंडाने ग्रासलेल्या राजपुतांवर त्याचा काही परिणाम झाला नाही हेही ध्यानात येते.

१८. झंझावती रणझुंजार शंभूराजे

असे म्हणतात, की शंभूराजांनी आपल्या पावणेनऊ वर्षांच्या कारकीर्दीत सुमारे सव्वाशे छोट्या-मोठ्या लढाया केल्या. अनेक भागांत त्यांनी जबरदस्त आक्रमक धोरण अवलंबिले. शत्रुपक्षाचा जास्तीत जास्त विध्वंस करणे, रसद तोडणे, पाण्यात विष कालवून शत्रुसेनेची हानी करणे आणि अनेक सेना एकाच वेळी अनेक ठिकाणी लढविणे हे त्यांचे युद्धतंत्र होते. मोगल हे महाबलाढ्य शत्रु, पोर्तुगीज हे पाताळयंत्री व गोव्यात बद्धमूळ झालेले वैरी, सिद्दी हा औरंगजेब व पोर्तुगीज या उभयतांच्या सहकार्याने व समुद्रात शक्तिमान असलेला दुष्मन आणि काही स्वार्थांध, भयगंडित स्वकीय या साऱ्यांशी त्यांना एकसमयावच्छेदेकरून सामना करावा लागला. याशिवाय इंग्रजांसारखे धूर्त कोल्हे कधी सिद्धी तर कधी पोर्तुगीज, कधी मोगल तर कधी मराठे यांच्याशी संगनमत करून स्वार्थ साधत होते. शंभूराजे हे सर्व उत्तम-प्रकारे जाणून होते व त्यानुसारच आपल्या युद्धयोजना आखीत होते.

आपले सैन्य मोगलांच्या मानाने खूपच कमी! हे लक्षात घेऊन त्यांनी खच्चीकरणाची युद्धनीती (Strategy of Attrition) अवलंबिली. शक्य तेथे आक्रमण व प्रसंगच पडल्यास बचाव असे दुहेरी सूत्र या युद्धनीतीचे असते. शिवाय शत्रूच्या युद्धयोजना उधळून लावणे, त्याची रसद व दळणवळण तोडून टाकणे आणि त्याची उपस्थिती खिळखिळी करून टाकणे हीही या युद्धनीतीची अंगे आहेत.

शत्रूने एका भागात हल्ला चढविला असता त्याच्या दुसऱ्या ठिकाणांवर हल्ले करणे आणि शत्रूचे चित्त विचलित करून सोडणे. नाशिकजवळच्या अहिवंत गडांवर हल्ले होताच बऱ्हाणपूर व सुरत येथे हल्ले करून मराठी सेनेने मोंगलांना जर्जर केले. तसेच औरंगाबादच्या शाही छावण्यांवरही अकस्मात हल्ला केला. रामसेजच्या किल्ल्यावर हल्ला होताच संगमनेर येथे हल्ला चढविला. कल्याण-भिवंडीवर हल्ला झाला असताना सिन्नरकडे धुमाकूळ घातला. अहमदनगरच्या किल्ल्यावर हल्ले चालू असतानाच सोलापूर भागात पंढरपूर, टेंभुर्णी, सांगोला इत्यादी मोंगली ठाण्यांवर हल्ले करण्याची आज्ञा शंभूराजांनी दिली.

छोट्या-छोट्या तुकड्या बनवून एकाच वेळी वेगवेगळ्या ठिकाणांवर हल्ले करून शत्रूला बेजार करणे हा दुसरा प्रकार. पुण्याजवळ जुन्नर, साताऱ्याजवळ

रहिमतपूर, कल्याणजवळ शहापूर, इत्यादी ठिकाणी असे हल्ले करून धान्य व शस्त्रास्त्रे यांची पुष्कळ लूट केली. शत्रुसेनेसाठी जाणारी रसद दळणवळण मार्गावर दबा धरून, अकस्मात हल्ले करून पळविणे किंवा नष्ट करणे हा प्रकार अनेक वेळा केलेला दिसून येतो. सुरतेहून कल्याण-भिवंडीकडे निघालेली मोगली रसद तारापूर-वसई व नंतर पारसिक भागांतून हल्ले करून अडविली व कल्याण-भिवंडीकडील मोगलांची पंचाईत करून टाकली. याशिवाय शंभूराजांनी दक्षिणेकडे तर जबरदस्त मुसंडी मारली होती. १६८१ अखेर हरजीराजे महाडिक यांना कर्नाटकांतील मुलुखावर ताबा मिळविण्यासाठी पाठविले. म्हैसूरचा राजा चिक्कदेवराय याने मोगलांशी संधान साधून कर्नाटकातला बराच मुलुख आपल्या घशात घातला होता. त्याचा बंदोबस्त करणे आवश्यक होते. शंभूराजांनी त्यासाठी गोवळकोंड्याच्या कुतुबशहाशी लष्करी करार केला. एकेरीच्या नायकाशी मैत्रीचे संबंध जोडले आणि स्वतः शंभूराजे २० हजार घोडदळ घेऊन म्हैसूरच्या दिशेने निघाले. सातारा, मिरज, हुबळी, धारवाडमार्गे चिकमंगळूरच्या ठाण्यावर जाऊन तेथे ताबा मिळविला. पुढे चिक्कदेवरायाशी लढाई करून चित्रदुर्ग येथे आपला सैनिकी तळ निर्माण केला. (नोव्हेंबर १६८२)

तेथून ते आपल्या सेनेसह मदुरेकडे रवाना झाले. चित्रदुर्गाहून टुमकूर, चिक्कबाळापूर, धर्मपुरी या मार्गाने त्रिचनापल्लीपर्यंत जाऊन त्यांनी त्रिचनापल्लीचा ताबा घेतला. त्यानंतर मद्रासच्या दक्षिणेस असलेल्या मायावरम् पोर्टोनोव्हो या किनारपट्टीवर आपला अधिकार प्रस्थापित केला. नंतर चिक्कदेवरायाशी तह करून, खंडणी कबूल करून घेऊन शंभूराजे रायगडाकडे परतले. इकडे औरंगजेबाने तर शंभूराजांना नेस्तनाबूत करण्याचा विडा उचलला होता; पण घडावे कसे? अनेक आघाड्यांवर प्रचंड सेना पाठवूनही त्याला यश दिसत नव्हते.

बादशहाचा मुलगा शहाजादा आज्जम याच्यावर त्याची मोठी भिस्त होती. प्रचंड सेना घेऊन तो पन्हाळा भागात दबा धरून बसला होता. किलिचखान, फिरोजखान, राव अनुपसिंह, अनिरुद्धसिंह हाडा, हसन अलीखान इत्यादी बडे-बडे सरदार त्याच्या सेनेत होते. शहाजाद्याची चाल लक्षात घेऊन शंभूराजांनी हंबीररावांना १५,००० घोडेस्वार आणि ५००० पदाती यांचेसह त्याचा परामर्ष घेण्यास पाठविले.

हंबीररावांनी चिवटपणे झुंज दिली. सहस्रावधी मोगल कापले गेले. शेकड्यांनी मराठेही कामी आले. उभय पक्षांना काही काळ थांबणे भाग होते. बादशहाकडून आज्जमची व त्याच्या सरदारांची कानउघाडणी होतच होती. आज्जमने पुनः एकदा

जोरदार आघाडी उघडली. त्याची बेगम जहांजेब बानू ही दाराशुको ह्याची लेक होती. तिने स्वतः हत्तीवर बसून सेनेला उत्तेजन देण्यास आरंभ केला; पण म्हणण्यासारखे यश लाभले नाही. अखेर आज्जमने कोल्हापूरवर निकराचा हल्ला चढविला. त्याला हंबीररावांनी अपूर्व सामर्थ्याने तोंड दिले. मोगलांची विलक्षण धावपळ उडाली. शहाजाद्याला थेट सीमापार पळवून लावला, तेव्हां हंबीरराव थांबले. औरंगजेब या साऱ्या प्रकाराने संतप्त झाला १६८३ च्या मे महिन्यात त्याने आपल्या सर्व ज्येष्ठ-श्रेष्ठ सेनापतींना बोलावून दिल्लीला परत जाण्याचा इरादा सांगितला. सर्वजण भयग्रस्त होते. शंभूराजांनी सर्वांची झोप उडविली होती. अखेर सर्वांना पुन्हा जोरदार प्रेरणा देऊन बादशहाने दिल्लीचा विचार सोडून दिला व सर्वांना वेगवेगळ्या आघाड्यांवर पाठवून दिले.

महिनाभरातच बादशहाला, न मिळणाऱ्या यशामुळे आपल्याच सेनानींचा संशय येऊ लागला. त्याने शहाजादा आज्जम आणि दिलेरखान यांना औरंगाबादेस बोलावून घेतले. दिलेरखानाला कैद व शहाजाद्याला नजरकैद करण्यात आले. शहाज़ादाही संतप्त झाला; पण करतो काय ? अखेर बादशहाने चांगलीच तंबी देऊन व त्याची समजूत घालून त्याला पुनः युद्धावर धाडला. दिलेरखानाने मात्र घोर नैराश्याने २० सप्टेंबर १६८३ या दिवशी आत्महत्या केली.

❋❋❋

अभिप्राय क्र. १०

शिवस्मरणी तत्पर, प्रा. प्र. के. घाणेकर
१०५ नारायण पेठ, पुणे ४११ ०३०

आपण अगत्यपूर्वक अभिप्रायार्थ पाठविलेले 'शंभूराजे' हे पुस्तक मिळाले. आभारी आहे. अलीकडेच कर्ण - संभाजी - दुसरा बाजीराव आदी कलंकितांना चरित्रनायक बनवून त्यांचा उदोउदो करण्याची जी वृत्ती बळावली आहे, त्याच पठडीतील आपले हे पुस्तक आहे, असे माझे स्पष्ट मत आहे.

इतिहासविषय रोखठोक पुराव्यांवर बेतलेला असतो आणि आपण तर हे पुरावेही न मानता तुमच्या मनातील संभाजीची तरफदारी करणाऱ्या गोष्टी रचून दाखविता, हे मला तरी इतिहासाचा एक विद्यार्थी म्हणून अजिबात पटलेले नाही. आपण अभिप्राय मागितलात म्हणून मी तो पाठवित आहे. आपले वय, आपला अनुभव, आपला अधिकार मी मानतो; पण 'शंभूराजे' या पुस्तकापुरते माझे झालेले मत मी आपणांस कळवित आहे.

—प्रा. प्र. के. घाणेकर

१९. पोर्तुगीजांना दबवले

त्या काळात पोर्तुगीजांचा गोवा या दक्षिणेकडील प्रदेशाप्रमाणेच उत्तरेकडील चेऊल, वसई, तारापूर इत्यादी भागांतही दबदबा होता. त्यांच्याजवळ प्रशिक्षित सैन्य, आरमार आणि भरपूर संपत्ती होती. शंभूराजे सत्तेवर येताच त्यांनी गोव्यात आपला वकील धाडला व मैत्रीचा संबंध जोडला. त्यानंतर १६८२ मध्ये त्यांनी डिचोली येथे दारुगोळ्याचा कारखाना उभारला. त्यासाठी तोफा, गंधक सोरा वगैरे साहित्य कर्नाटक व मलबारहून समुद्रमार्गे आणायची व्यवस्था केली होती. त्यास पोर्तुगीजांनी अडथळा करू नये अशी विनंती शंभूराजांकडून करण्यात आली होती आणि पोर्तुगीजांनी ती मान्य केली. पोर्जुगीजांना न रुचणारे आपले अधिकारी शंभुराजांनी मैत्रीखातर बदललेही होते.

औरंगजेबाच्या स्वराज्यावरील सर्वंकष युद्धाचा एक भाग म्हणजे मराठ्यांविरुद्ध अन्य सर्वांचे सहकार्य घेणे हा होता. या दृष्टीने मोगलांचा वकील शेख महंमद २० जानेवारी १६८३ रोजी एक पत्र घेऊन गोव्यात आला. त्या पत्रात बादशहाने शंभूराजांविरुद्ध पुकारलेल्या युद्धाला साह्य म्हणून पोर्तुगीजांनीही शंभूराजांविरुद्ध युद्ध पुकारावे, आपल्या प्रदेशातून मोगली सैन्यास धान्य खरेदी करू द्यावे, सुरतेहून मुंबईस जाणाऱ्या आरमारास (वसई भागात) पोर्तुगीजांनी उपद्रव देऊ नये, या सूचना होत्या. शंभूराजांची युद्ध पुकारण्याची अट सोडून बाकी सर्व गोष्टी पोर्तुगीजांनी मान्य केल्या. तथापि मोगलांच्या इतर मागण्याही ठोकरणे त्यांना शक्य नव्हते. त्यामुळे त्यांनी शंभूराजांशी वरकरणी मैत्रीचे नाटक चालू ठेवले. औरंगजेबाने वरील आशयाची पत्रे इंग्रजांना आणि वेंगुर्ल्याच्या डच वखारवाल्यांनाही धाडली होती.

औरंगजेबाकडून सदरहू पत्रे आल्याने शंभूराजांनी आपणाशी काही कायम-स्वरूपी तह करावे असे पोर्तुगीजांनी त्यांना कळविले; परंतु तसा काही तह होण्या-पूर्वीच त्यांनी मोगल सैन्यास आपल्या उत्तरकोकणातील प्रदेशातून जाण्यास परवानगी दिली. कल्याणजवळ पारसिक किल्ला बांधला. यामुळे संतप्त होऊन मराठ्यांनी त्यांची उत्तरकोकणातील गावे लुटली. पोर्तुगीजांचा सिद्दी आणि मोगल यांच्याकडे असलेला कल पाहून शंभूराजांनी १६८३च्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात १०,००० स्वार व २ हजार पायदळ उत्तरकोकणातील वसई, तारापूर, दमण वगैरे

बाजूला पाठवून दिले आणि पुरती दाणादाण उडविली. चौलच्या किल्ल्याला मराठ्यांनी वेढा घातला. पोर्तुगीजांची पक्की घाबरगुंडी उडाली. त्यांनी शहास प्रतिशह म्हणून गोव्यात मराठ्यांच्या ताब्यातील फोंडा किल्ल्यावर १ नोव्हेंबर १६८३ ला हल्ला केला. नऊ दिवस हल्ला चालू होता. त्या वेळी पावसाळा नसतानासुद्धा विपुल पाऊस पडला आणि खूपच थंडीही पडली.

फोंड्याचा किल्ला खूपच भक्कम होता. त्याची तटबंदी बारा फूट रुंदीची होती. शिवाय अनेक बुरुज होते. अखेर किल्ल्याच्या तटाला खिंडार पाडून पोर्तुगीज सैन्य आत शिरले तो मोठा भक्कम लाकडी दरवाजा लागला. तो तोडण्याचा प्रयत्न झाला पण तो खूपच भक्कम होता. शिवाय आत मराठ्यांचे सहाशे बंदुकधारी होते. त्यांनी खिंडारातच पोर्तुगीज सेनेशी झुंज दिली. १० नोव्हेंबरला मराठ्यांकडे आणखी कुमक आली. त्यात आठशे ताज्या दमाचे घोडेस्वार व सहाशे पायदळ होते. स्वतः शंभूराजे जातीने या लढाईत सामील झाले होते. इकडे फोंड्याहून अखेर ११ नोव्हेंबर १६८३ ला पोर्तुगीजांनी माघार घेतली. स्वतः विजरेई कौंट द आल्व्हारो हा लाजिरवाणे अपयश घेऊन ११ नोव्हेंबर १६८३ला कसाबसा माघारी फिरला. उत्तरफिरंगणातील लढा निळोपंत पेशवे यांजकडे त्यांनी सोपवून दिला होता. त्याने दमण ते चौल-पर्यंतचा पोर्तुगीज अंमलातील प्रदेश नोव्हेंबर १६८३ पर्यंत काबीज केला.

गोव्यातील फोंडा प्रकरण संपल्यावर शंभूराजे परत रायगडाला जातील अशी विजरेईची समजूत होती; पण शंभूराजे उलट अधिकच आत गोव्यात शिरू लागले.

२४ नोव्हेंबर १६८३ ला विजरेई आल्व्हारोने एक सभा गोव्याच्या किल्ल्यावरील सभागृहात बोलावून युद्धनिधीस मदत करण्याचे आवाहन केले. त्याच दिवशी शंभूराजांचे सैन्य स्टिफन ऊर्फ जुवे बेटात शिरले. नदीला ओहोटी असताना खाडीतून चालतही जुवे बेटावर जाता येई. मराठा सेनेने जुवे बेट सहज जिंकले. हे वृत्त कळताच विजरेई आल्व्हारो मोठी सेना घेऊन जुवे बेट जिंकण्यासाठी धावून आला; पण आतून व बाहेरून विजरेईवर जबरदस्त मारा सुरू झाला. विजरेई आल्व्हारो अखेर पळून गेला. पुष्कळजण पोहतपोहत पलीकडे गेले. विजरेईचा पाठलाग फक्त चार घोडेस्वारांनी केला. पोर्तुगीज सैनिक खाडीतून पोहत असताना त्यातील अनेकजण चिखलात रुतले. त्यातले बरेचजण कापले गेले. गोव्यावर विजरेई कसाबसा गोळी लागूनही पळाला. त्याचा घोडासुद्धा मागे राहिला. तो मराठ्यांच्या हाती लागला. ही शोकांतिका बघण्यासाठी खाडीच्या दोन्ही तीरांवर खूप लोक जमले होते. विजरेईचा पाठलाग खुद्द शंभूराजे इतके बेभानपणे करीत होते, की

त्याच्या पाठून त्यांनी आपला घोडा नदीत घातला. खंडो बल्लाळाने प्रसंगावधान राखून त्याचा लगाम ओढून धरला नसता तर....

घाबरगुंडी उडालेला विजरेई इतका गर्भगळित झाला, की त्याने गोव्याच्या चर्चमधील सेंट झेवियर याचे शव बाहेर काढून त्याची प्रार्थना केली. एका कागदावर सारे गोव्याचे राज्य सेंट झेविअरला अर्पण केल्याचे लिहून दिले आणि त्याने गोव्याचे रक्षण करावे असे त्याला साकडे घातले. आता मांडवीचे विशाल पात्र ओलांडले, की पलीकडेच गोव्याचे पोर्तुगीज राज्य! ही परकी कीड कायमची नेस्तनाबूत करायची शिवरायांची अपूर्ण इच्छा पूर्ण करण्याचा विचार करून शंभूराजे गोव्यावर हल्ला करण्याची तयारी करू लागले. इतक्यात शहाजादा मोअज्जम सुमारे साठ हजार सैन्य घेऊन कोकणात चालून येत असल्याचे वृत्त आले. त्याच्या या प्रचंड सेनेशी प्रत्यक्ष सामना देणे कठीण आहे, हे लक्षात घेऊन तो येण्यापूर्वी जमेल तेवढा पोर्तुगीज प्रदेश व संपत्ती लुटावी असा विचार करून ११ डिसेंबर १६८३ रोजी मराठ्यांनी साष्टी प्रांतात एक हजार घोडे व तीन हजार पायदळासह प्रवेश केला. मडगांवमध्ये शंभूराजांच्या सेनेने १० दिवस धडाका उडविला. अनेक लोक चर्च आणि इगर्जीत लपून होते. अखेर २३ डिसेंबरला ते सर्व शरण आले. त्यानंतर मराठी सैन्याने भरपूर लुटालूट केली. त्यानंतर आसोळणे, कुंकळ्ळी इत्यादी गावांवर हल्ला चढविला. तेथील लोकांनी पोर्तुगीजांना देतो त्याप्रमाणेच कर देण्याचे कबूल केले. साष्टीतील सर्व इगर्जीत व चर्चमध्ये भरपूर धान्य, दारुगोळा, बंदुका इत्यादी साठवून ठेवण्यात आल्या होत्या. धर्मगुरु पळून गेले व सारा खजिना मराठ्यांनी लुटला. पुढे बारदेशातील तीन किल्ले मराठ्यांनी घेतले. तेथून त्यांनी ४६ तोफा नेल्या. शत्रूकडील सैनिकांना अटक केल्यावर त्यांचे पाठीकडे हात बांधून, विवस्त्र करून मराठे त्यांना लाथाबुक्क्यांनी तुडवून काढीत.

"किल्ल्यावरच्या पाद्र्यांचे वरचे झगे काढून घेऊन आणि हात मागे बांधून त्यांची गावातून धिंड काढली... ज्या धर्मगुरुंची संभाजीने धिंड काढली त्यांच्यापाशी धर्म नव्हता आणि गुरुंचे चारित्र्य नव्हते. संभाजीचे पोर्तुगीजांशी युद्ध जितके राजकीय होते तितकेच धार्मिकही होते आणि या धर्मगुरुंनी हिंदूंना बाटविण्याचा, जे बाटण्यास तयार नाहीत त्यांना जिवंत जाळण्याचा आणि पैसा उकळण्याचा सपाटा लावला होता. पोर्तुगीजांच्या वसाहतीचा कारभार राजाच्या किंवा व्यापारी कंपनीच्या हाती नसून, या धर्मगुरुंच्या किंवा फादर्सच्या कंपनीकडे असे आणि या कारभारात आपल्या पायघोळ झग्यांचे खिसे त्यांनी भरपूर भरून घेतले होते. संभाजीच काय पण त्यांच्या

राज्यांतील प्रजाही त्यांच्यावर चिडली होती. सेंट इस्टोव्हहून व्हाईसरॉय पळून येत असतांना व मराठ्यांनी पोर्तुगीजांची लांडगेतोड चालविली असताना हजारो लोक पलीकडच्या तीरावरून ही गंमत पाहात होते; पण एकानेही मदतीसाठी बोट उचलले नाही. कारण इतकी वर्षे पाद्र्यांनी जे पेरले होते ते आता उगवत होते. त्यांची चर्चेस संभाजीने लुटली. कारण ती धनाची आणि धान्याची कोठारे होती. कोणत्याही धर्माबद्दल द्वेष असण्याचे कारण नव्हते. त्याने केले इतकेच, की इतके दिवस कोकराची कातडी पांघरून हिंडणाऱ्या या लांडग्यांचे यथार्थ दर्शन लोकांना घडवून दिले व त्यांच्या खऱ्या स्वरूपाची प्रचिती आणून दिली. नैतिक म्हणा, राजकीय म्हणा, आजपर्यंत पोर्तुगीजांचा व त्यांच्या धर्मगुरुंचा जो थोडाफार दबदबा होता त्याचे या गोव्याच्या स्वारीत संभाजीने सपशेल दिवाळे वाजविले.'' –प्रा. श. श्री. पुराणिक यांच्या 'मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर' (पूर्वार्ध) मधून.

गोव्यात याप्रमाणे धमाल उडवून देऊन राजे २ जानेवारी १६८४ ला रायगडकडे परतले.

***

शुद्धीकरण

गंगाधरपंत कुलकर्णी या नांवाचा एक ब्राह्मण जबरदस्तीने बाटविण्यात आला होता. त्याला मुसलमानी धर्म सोडून हिंदू धर्मात येण्याची तीव्र इच्छा होती. छत्रपती शिवाजी-महाराजांनी बजाजी निंबाळकर आणि नेताजी पालकर यांचे शुद्धीकरण केले. शंभूराजे सुद्धा त्यांच्याच मार्गाने पुढे जात होते. त्यांनी गंगाधरपंतांचे शुद्धीकरण करून त्यांला पुनः हिंदु-धर्मात प्रविष्ट करून घेतले, इतकेच नाही, तर कविकलशाने तर सर्व ब्राह्मणांच्या पंक्तीत त्याला जेवायला बसविले.

धन्य जोडी पिता-पुत्रांची

''जगाच्या इतिहासात स्वराज्यसंस्थापक म्हणून श्री शिवरायांचे नांव अखेर चमकले, तर स्वधर्मप्रतिपालक म्हणून धर्मवीर संभाची महाराजांचे चमकेल. अशी ही पितापुत्रांची जोडी आपल्या अपूर्व कर्तबगारीने कीर्तिपदास चढलेली आहे. संभाजी महाराजांचा धर्माकरता प्राण देण्याचा शेवट श्री. शिवछत्रपतींच्या धर्मशाली पुत्राला शोभण्यासारखा नाही असे कोण म्हणेल? महाराजांनी वडिलांच्या पावलावर पाऊल ठेऊन नऊ वर्षे महाराष्ट्राचे राज्य केले व वडिलांप्रमाणे आपणही कीर्तिपदास चढले.''

–भाऊसाहेब पवार लिखित

२०. मोअज्जमची दाणादाण

शंभूराजांच्या पराक्रमाच्या वार्तांनी बादशहाचे डोके भणभणून गेले होते. टिचभर राज्य अन बोटभर ताकदीचा हा वितभर तरुण आपल्या विस्तृत राज्याला बेजार करू शकतो ही कल्पना त्याला सहन होत नव्हती. शंभूराजांना भारी पडतील असे शे-पन्नास सरदार त्यांच्या हाताशी होते. मराठी सेना क्षणार्धात चिरडून टाकील अशी सात लक्ष सेना त्याच्या नेत्रसंकेतावर नाचत होती. अब्जावधी रुपयांचा खजिना त्याच्या सेवेला भरून वाहत होता. त्याच्या जोरावर तो प्रतिपक्षातील मातब्बर सरदारांना विकत घेऊ शकत होता. तसे त्याने कित्येकजण फोडले सुद्धा! पण सारे उपाय तोकडे पडत होते. उलट शंभूराजांचे अनेक सरदार स्वतःच्या कर्तृत्वावर वेगवेगळे भाग लढवीत होते. या शंभूराजांची दांडगाई पूर्णपणे मोडून टाकणे आणखी एका कारणाने तातडीचे झाले होते. ते कारण म्हणजे शहाजादा अकबर हा त्यांच्या आश्रयाने राहिला होता.

बादशहाने एक योजना आखली. उत्तरेकडून पुणे मार्गाने शहाबुद्दिनखानाने कोकणात उतरायचे व दक्षिणेकडून बेळगांव रामदरामार्गे शहाजादा मोअज्जमने दक्षिणकोकणात उतरायचे! घाटावरील सर्व रस्ते पक्के रोखून धरायचे आणि किनारपट्टीवर पोर्तुगीज आणि सिद्दी यांनी बंदोबस्त ठेवायचा. असे सर्व बाजूने शंभूराजांना कोंडीत धरून पकडायचे, ही ती योजना!

त्यानुसार शहाजादा मोअज्जम यास ४० हजार घोडेस्वार, ६० हजार पायदळ, १९०० हत्ती आणि २०,००० उंट असा लवाजमा देऊन बादशहाने अहमदनगरहून १५ सप्टेंबर १६८३ ला रवाना केले. शहाजाद्याची आणि त्याच्या सरदारांची बादशहाने अत्यंत सन्मानपूर्वक पाठवणी केली.

शहाजादा मजल-दरमजल करीत बेळगांवच्या पश्चिमेस २६ मैलांवरील रामदऱ्याच्या घाटाच्या तोंडाशी आला. खोल खोल दऱ्या, उत्तुंग शिखरे, सर्पांचा सुळसुळाट, जंगलातील हिंस्र श्वापदे यामुळे चार मुक्काम तेथेच झाले.

वाटेत ठिकठिकाणी मराठी टोळ्यांनी त्याच्या सेनेवर हल्ला करून भरपूर उपद्रव दिला. ठिकठिकाणी रसदेच्या वाटा रोखून धरल्या, तर काही ठिकाणी रसद लुटली. काही वेळा पुढे जाऊन लाकुडफाटा, गवत इत्यादींची व्यवस्था करणाऱ्या तुकड्याच

कापून काढल्या. शहाजादा कसाबसा दक्षिणकोकणात उतरला. शंभूराजांनी त्याच्या गोव्यातील आगमनापूर्वीच त्याची प्रचंड हानी केली होती. रसदीच्या १२० गलबतांपैकी गोव्याकडे येतांना काही मराठ्यांनी लुटली, काही बुडवली तर काही गोव्यात आल्यावरही शंभूराजांच्या भयाने पोर्तुगीजांनी पुढे जाऊ दिली नाहीत. त्यातच पाण्यात विष कालविल्याने रोगराई भयंकर माजली. शंभूराजे रायगडाकडे निघून गेले. शहाजादा मोअज्जम या प्रकाराने अत्यंत अस्वस्थ झाला.

मोअज्जमने आपण आल्यामुळे गोवा बचावले असे सांगून पोर्तुगीजांकडून खंडणी मागितली, तसेच गोव्याच्या नद्यांमधून आपली रसद येऊ द्यावी असेही दटाविले.

परंतु मराठ्यांचा दणका नुकताच अनुभवल्यामुळे पोर्तुगीज विजरेईने त्याच्या मागण्या नाकारल्या. तेव्हां संतप्त शहाजाद्याने दक्षिणकोकणातील मालवण, वेंगुर्ला, कुडाळ इत्यादी गावे आणि गोवा भागांतील डिचोली आदि ठिकाणे उद्‌ध्वस्त केली; पण मराठ्यांनी त्याची रसद तोडल्यामुळे आणि अनेक साथीच्या रोगांमुळे शाही-सेनेची अपरंपार हानी झाली.

यावेळी इटालियन प्रवासी मनुची हा शहाजाद्याबरोबर होता. तो लिहितो - 'मोगली सैन्यात रोगाची इतकी भयंकर साथ पसरली की, सात दिवसांत या रोगाने पछाडलेला प्रत्येक मनुष्य मृत्यू पावला. अशा रीतीने सैन्यातील एकतृतियांश माणसे मृत्युमुखी पडली. हा रोग माणसांनाच झाला असे नाही, तर हत्ती, घोडे, उंट इत्यादी जनावरेही त्याला बळी पडली.'

'जनावरांच्या आणि माणसांच्या प्रेतांमुळे हवा प्रदूषित होऊन गेली होती. रस्ता अरुंद-अडचणीचा, त्यामुळे रसदही नीट येईना. यावेळी लष्करात गहू मुबलक होता; पण तो वाहून नेण्यास जनावरे नव्हती. शिपायांना हे ओझे वाहून न्यावे लागल्याने अतिशय हाल झाले.'

मोगलांचा इतिहासकार महंमद हाशिम खाफीखान शंभूराजांबद्दल म्हणतो, 'दुष्ट संभाजी हा धामधूम आणि उच्छाद करण्यात नरकवासी शिवाजीपेक्षा दहा पटीने अधिक तापदायक ठरला.'

मोअज्जमच्या स्वारीबाबत तो लिहितो, 'फौजेत धान्याचा दुष्काळ पडला. महागाई इतकी वाढली, की कधी कधी तीन तीन-चार चार रुपये देऊनही एक शेर गव्हाचे पीठ मिळेनासे झाले. फौजेतील माणसांपैकी जे मृत्यूच्या दाढेतून वाचले, त्यांच्या शरीरात तर अर्धेच प्राण शिल्लक राहिल्याप्रमाणे होते. ते रोड आणि हैराण

झाले होते... एकाही सरदाराच्या तबेल्यात स्वारीयोग्य असा एकही घोडा राहिला नाही. मग बिचाऱ्या शिपायांची काय कथा?'

मोगल सैन्याची ही दुर्दशा बादशहाला कळविण्यात आली. त्याने सुरतेच्या व्यवस्थापकाला आज्ञा केली की 'शक्य तितके धान्य जहाजांत भरून समुद्राच्या मार्गाने शहाजाद्याकडे पाठवावे.'

समुद्रकाठावर ठिकठिकाणी मराठ्यांनी किल्ले बांधून ठेवले होते. सुरतेहून धान्याची जहाजे निघाली, याची बातमी लागताच त्यांनी हल्ले करून ती लुटली. काही जहाजे लुटीतून वाचून निघाली; पण ते धान्य किती पुरणार?... शेवटी शहाजाद्याने परत यावे म्हणून बादशहाने आज्ञा केली. मोंगल फौजा परतत असताना वाटेत मराठ्यांशी सारखे लढत-झगडत... अखेर बादशहापाशी पोचली.' (१८ मे १६८४)

शहाजादा मोअजम आपल्या सेनेसह घाट ओलांडून वर आला. बहुतेक सैन्य पायीच येत होते. बहादूरखानाचा तळ इंडी येथे होता. त्याने शहाजाद्याला सर्व सरंजाम पुरवून पुढे अहमदनगरकडे रवाना केला. तो १८ मे १६८४ ला अहमदनगरला केवळ उरल्यासुरल्या सेनेसह पोचला. या मोहिमेत बादशहाचे कोट्यवधीचे जबरदस्त नुकसान झाले.

❋❋❋

समर्पित जीवन

"व्यक्ती की पुण्याई, व्यक्ती की शक्ती, व्यक्ती का स्वत्व प्रगट होता है अंतिम क्षणों में। संभाजी महाराज समझौता कर सकते थे, पर उन्होंने नहीं किया। अगर वे शरीरसे दुर्बल होते अगर मनके कच्चे होते, जिस तरह के व्यसनों का उनके जीवन में उल्लेख किया जाता है, अगर उस तरह के व्यसन के वे शिकार होते तो अंतिम परीक्षा में विफल हो जाते। लेकिन वे अंतिम परीक्षा में सफल रहे। पिढीयों तक उनके बलिदानसे हमें प्रेरणा मिलेगी। उन्होंने जीवन का क्षण क्षण, शरीरका कण कण स्वतंत्रता के लिये समर्पित किया।"

–अटल बिहारी वाजपेयी

२१. अंतर्गत डोकेदुखी

सर्व बाजूंनी स्वराज्याला घेरून नष्ट करण्याला टपलेला औरंगजेब मनगटे चावत बसला होता; पण तो स्वस्थ राहिला नाही. त्याने फोडाफोडीचे उद्योग आरंभिले. मोंगलाई बळापुढे शंभूराजे कितपत टिकाव धरू शकतील याबद्दल काही मंडळी साशंक होती आणि न्यूनगंडाने त्यांना पछाडले होते. शिवाय काही अपरिपक्व बुद्धीची माणसे अजूनही हेव्यादाव्यांचे राजकारण करीत होती. कान्होजी शिर्के, यशवंतराव दळवी, नागोजी माने, काझी हैदर मुन्शी, एकोजी मल्हार, राव सुभानचंद ही मंडळी मोंगली प्रलोभनांना बळी पडली.

रायगडावरील जुन्या राजकीय मुत्सद्द्यांचा एक गट कवी कलश याचे वाढते प्रस्थ पाहून नाराज झाला; परंतु शंभूराजांचा जुन्या काही मुत्सद्द्यांनी विश्वासघात केला होता. त्यामुळे उरलेल्यांबद्दलही ते साशंक होते. कवी कलश मात्र पूर्ण विश्वासातला व जीवाला जीव देणारा होता. तो राजकारणधुरंधर तर होताच; पण स्वतः योद्धाही होता, तो उत्तरेकडचा कनोजी ब्राह्मण म्हणून रायगडावरील मुरब्बी मंडळींना तो परका वाटे. शंभूराजांनी त्याला कुलयेखत्यारी दिल्याने तर रायगडावर असंतोष उत्पन्न झाला. शंभूराजे गोव्याच्या मोहिमेत असताना उत्तरकोकणातून दक्षिणेकडे सरकू लागलेल्या शहाबुद्दिनशी संधान साधून कवी कलशाचा काटा काढण्याच्या उद्योगाला काही मंडळी लागली असल्याची माहिती शंभूराजांना मिळाली.

बहुधा याच कारणामुळे शंभूराजांनी मानाजी मोरे, वासुदेवपंत, गंगाधरपंत व राहुजी सोमनाथ यांना ३० ऑक्टोबर १६८४ रोजी कैद केले. कवी कलशलाच त्यांनी शहाबुद्दिनच्या बंदोबस्तासाठी पाठविले. पुण्याहून बोरघाटमार्गे शहाबुद्दिन कोकणात उतरला होता. नागोठणे गावी उभय पक्षात घनघोर युद्ध झाले (१४-१-१६८५). अखेर शहाबुद्दिन पळून गेला. कवी कलशाने चांगलाच पराक्रम दाखविला. कवी कलशाबद्दल या लढाईनंतर शहाजादा अकबराने शंभूराजांना १८ जानेवारी १६८५ ला लिहून कळविले की, 'मोगल घाटाखाली उतरून आले. या वेळी कवी कलश यांनी ठाण मांडून झुंज दिली. हे महमुदखान आणि खिदामत परस्तखान यांच्या लिहिण्यावरून कळले, कवी कलश हा आपला उत्कृष्ट एकनिष्ठ

सेवक आहे. कुणाच्या मत्सराने त्याचा नाश होईल असे परमेश्वर न करो. कवी कलशावर आपली कृपा राहावी आणि त्याचे कल्याण करावे हे योग्य होय. आतापर्यंत मोगल परतले असतीलच...'

शंभूराजांनी कवी कलश यास कुलयेखत्यार हे पद डिसेंबर १६८३ मध्ये दिले. त्या वेळी ते उभयतां गोव्याच्या स्वारीवर होते. पोर्तुगीजांशी तह करण्याचा स्वतः-तर्फे पूर्ण अधिकार असा या पदाचा अर्थ असावा; परंतु गोवेकर पोर्तुगीज कवी कलशाचा उल्लेख (The Supreme minister of Samchaji Raje Satrapati) असा त्यानंतरच्या पत्रातूनही करतात. तसेच या तहाचे पालन होत नसल्याची तक्रारही ते कवी कलश यांचेकडे करतात. (१७ जून १६८४ चे पत्र) तसेच एप्रिल १६८४ मध्ये मराठे आणि इंग्रजांत जो तह झाला त्याची बोलणी करण्यासही शंभूराजांचे वतीने कवी कलश आणि एक वकील प्रल्हाद निराजी हेच गेले होते.

त्यानंतर कवी कलश हा कायमचाच कुलयेखत्यार असल्याचे दिसते. त्याचे हे पद काढून घेतल्याचाही पुरावा नाही. शिवाय एक गोष्टही स्पष्टच दिसते, की कवी कलशावर शंभूराजांची मोठी भिस्त होती. शिवरायांच्या मृत्यूनंतरची रायगडावरील बेभरंवशी परिस्थिती, मुत्सद्द्यांचे शंभूराजांविरुद्ध दोन कट, त्यांचे शंभूराजांनी केलेले पारिपत्य, सातत्याने युद्धभूमीवर रहावे लागल्याने राज्यांतर्गत कारभारांत लक्ष देण्यास शंभूराजांना स्वतःला फुरसद न मिळणे व सातत्याने व अत्यंत विश्वासार्हतेने शंभूराजांची काळजी घेणारा एक विद्वान, राजकारणधुरंधर व एकनिष्ठ सेवक कवी कलशाच्या रूपाने मिळाल्यावर त्याच्यावर 'कुलयेख्तियारी' सोपविण्यात काहीच गैर नव्हते. शिवाय 'समानशीले व्यसनेषु सख्यम्।' म्हणतात त्याप्रमाणे संस्कृत साहित्य, काव्यरचना आणि साहित्यिक रसिकता या बाबतीत कवी कलश हा शंभूराजांशी सख्ख्यास इतर मंत्र्यापेक्षा अधिक पात्र होता.

त्यामुळे तो शंभूराजांच्या गळ्यातला ताईत होऊन राहिला होता, याचाच मत्सर रायगडावरील अनेक मातब्बर मंडळींना वाटत होता. आणखी एक गोष्ट अशी, की बादशहाचा पुत्र अकबर यास कवी कलशाच्याच सल्ल्यानुसार शंभूराजांनी आश्रय दिला होता. त्यामुळेच औरंगजेबाचे संकट ओढविले आहे असे काही लोकांना वाटत असे.

२२. आदिलशाही व कुतुबशाही बुडाली

शंभूराजे गादीवर आल्यापासून पांच वर्षे अहोरात्र धडपड करूनही मराठेशाही काही आपण नष्ट करू शकलो नाही याची औरंगजेबाला लज्जा व खंत वाटत होती. त्याचे अनेक सरदार शहाजादेसुद्धा मनोमन नैराश्याने घेरले होते.

अशा वेळी कुठेतरी विजय मिळवून आपल्या योद्ध्यांना प्रेरणा मिळवून द्यावी या हेतूने तसेच मराठ्यांची व त्यांची मैत्री व परस्पर सहकार्य होते त्यामुळे दक्षिणेकडील आदिलशाही आणि कुतुबशाही यांना बुडवायचा विचार बादशहाने केला. शिवाय त्यामुळे राज्यविस्तार तर होईलच; पण मराठ्यांना दक्षिणेत कोणी मित्र शिल्लक राहणार नाही! असा विचार करून बादशहाने शहाजादा आज्जमला पुनः एकदा चुचकारून, प्रेरणा देऊन विजापूरकडे रवाना केले.

आदिलशाहीची कुरापत काढण्याच्या उद्देशाने बादशहाने १८ वर्षांच्या विजापूरच्या सिकंदर आदिलशाहाला पत्र पाठविले. त्यात त्याने १) मोगली सैन्याला लागेल ती रसद पुरवावी, २) शंभूराजांशी लढाई करण्यासाठी ५-६ हजार सेना पाठवावी, ३) शंभूराजांना कोणताही पुरवठा करू नये आणि ४) मोगली फौज आदिलशाही मुलुखातून जाऊ द्यावी, असे कळविले.

सिकंदर आदिलशहा शंभूराजांच्या बाजूचा होता. त्याने उपरोक्त मागण्या फेटाळल्या. त्यामुळे शहाजादा आज्जमच्या नेतृत्वाखाली प्रचंड सेना विजापूरकडे झेपावली. शंभूराजे बादशहाची चाल ओळखून होते. त्यांनी रामचंद्रपंत अमात्यांना पत्र देऊन विजापुरास धाडले व त्याला कुमक पाठविली. त्याप्रमाणे त्यांनी कुतुबशहाला पत्र पाठवले. मराठे, कुतुबशहा व आदिलशहा असे तिघे मिळून मोगलांशी सामना करण्याची योजना आखली व तसा करार केला.

या करारानुसार मेळगिरी पंडिताच्या नेतृत्वाखाली मराठा सेनेची एक तुकडी आदिलशाहीच्या रक्षणार्थ पाठविण्यात आली. सिकंदर आदिलशहा या तुकडीचे स्वागतासाठी स्वतः जोहरापूर दरवाज्यापर्यंत आला. त्यानंतर शंभूराजांनी हंबीरराव मोहिते आणि कवी कलश यांना ३०,००० सैन्यासह पन्हाळ्यावर सिद्ध ठेवले.

आज्जमच्या सेनेने १ एप्रिल १६८५ला विजापूरच्या किल्ल्याला वेढा दिला. हा किल्ला अत्यंत भक्कम व अभेद्य होता. आदिलशाही सेनेने आतून मोगलावर

भडिमार केला. दि. १४ ऑगस्ट १६८५ रोजी विजापूरच्या मदतीकरता कुतुबशहाने आपले सैन्य पाठविले. मराठ्यांच्या तुकड्या क्रमाक्रमाने पन्हाळ्यावरून रवाना होत होत्या. आठ महिने झाले तरी आज्जमला यश मिळेना, डिसेंबर १६८५ मध्ये मराठ्यांचे सरसेनापती हंबीरराव मोठी मराठी सेना घेऊन विजापूरकडे निघाले. त्यांनी सोलापूरहून मोगली सेनेची रसद तोडून टाकली. आज्जमचे सैन्य कोंडीत सापडले. धान्याचा पुरवठा तुटला. माणसे व जनावरे मरू लागली.

बादशहाला ते वृत्त कळताच त्याने आज्जमला परत बोलावले; पण मोअज्जमच्या गोव्याकडील पार्श्वभूमीवर आपण यश मिळवून बादशहाची मर्जी संपादन करायलाच हवी असा आज्जमचा हट्ट होता. तेव्हां बादशहाने फिरोजजंगला भरपूर रसद व प्रचंड सैन्य देऊन आज्जमच्या मदतीला पाठविला.

एक वर्षापेक्षा अधिक काळ झाला तेव्हां बादशहा स्वतः विजापूरकडे निघाला. विजापूरजवळ रसूलपूर येथे त्याने आपली छावणी टाकली. (जुलै १६८६)

अखेर विजापूरकरांचा कारभारी सर्जाखान मोगलांना फितूर झाला. आदिलशाहाला शरणागती पत्करावी लागली. १ सप्टेंबर १६८६ रोजी सिकंदर आदिलशहा खाली मान घालून पिढीजात सल्तनत सोडून राजवाड्यातून बाहेर पडला. दरसाल एक लाख रुपयांचे निवृत्तिवेतन देऊन बादशहाने त्याला नजरकैदेत ठेवले. १९ सप्टेंबर १६८६ रोजी बादशहा औरंगजेब सोन्याच्या मोहरा रस्त्याने उधळीत जामा मशिदीत पोहोचला आणि त्याने अल्लाचे आभार मानले.

आता बादशहाची नजर कुतुबशहाकडे वळली. गोवळकोंड्याला त्यावेळी अब्दुल हसन हा कुतुबशहा होता. मादण्णा आणि आकण्णा हे दोघे भाऊ त्याचे डावे-उजवे हात होते. सर्व राज्यकारभार तेच पहात. शिवरायांनी कुतुबशाहीशी दोस्ती ठेवली होती. बादशहाने शहाजादा मोअज्जम आणि बहादूरखान यांना यापूर्वीच कुतुबशाही नष्ट करण्याच्या इराद्याने गोवळकोंड्यावर जानेवारी १६८६ मध्ये पाठविले होते. १६ मार्च १६८६ रोजी शहाजाद्याचे फितुरांकरवी मादण्णा आणि आकण्णा यांचे खून करून त्यांची प्रेते फरफटत रस्त्यावरून फिरवून दहशत उत्पन्न केली. विजापूरचा पाडाव झाल्यानंतर मोगल प्रचंड सेनेनिशी गोवळकोंड्यावर चालून आले. खासा बादशहा या स्वारीत सहभागी झाला होता. ७ फेब्रुवारी १६८७ रोजी गोवळकोंड्यास वेढा घालण्यात आला.

एक मुसलमान बादशहा दुसरी मुसलमान सल्तनत नष्ट करतो हे इस्लामला मंजूर नाही असे सांगून बादशहाचा मुख्य न्यायाधीश शेख उल इस्लाम याने ही

स्वारी बेकायदेशीर ठरविली. बादशहाने त्याला पदच्युत करून मक्केला पाठवून दिला; पण त्याच्या जागी नवीन नेमलेल्या काजी अब्दुल्लानेही ही स्वारी अन्याय्य ठरविली. तेव्हां त्यालाही गचांडी देऊन बादशहाने एकवेळचा शिवशाहीतला मुन्शी आणि अलीकडेच फितूर होऊन बादशहाकडे आलेला काजी हैदर याला मुख्य न्यायाधीश नेमला. आता खुद्द शहाजादा मोअज्जमलाच कुतुबशाही बुडू नये असे वाटू लागले. त्याने कुतुबशाहीशी गुप्त बोलणी व पत्रव्यवहार केला. तो आज्जमच्या लोकांनी पकडून बादशहाचे हाती दिला. काही बोलणी करण्यासाठी २१ फेब्रुवारी १६८७ ला मोअज्जमला बादशहाने आपणाकडे बोलावून घेऊन, अटक करून कैदेत टाकला. इकडे वेढा चालूच होता. सप्टेंबर १६८७ पर्यंत सात महिने झाले तरी यशाची चिन्हे दिसेनात. इतक्यात बातमी आली की, मराठ्यांच्या आश्रयास गेलेला शहाजादा अकबर पळून इराणात गेला. शंभूराजांनी त्याला सर्वतोपरी साह्य केले होते; पण गगनायेवढ्या महत्त्वाकांक्षा बाळगणारा पण कमकुवत मनाचा हा शहाजादा मराठ्यांच्या साहाय्याचा पुरा फायदा उठवू शकला नव्हता. शंभूराजांनी स्वतः त्याला दिल्लीला नेऊन बादशहा करावे अशी त्याची इच्छा होती; पण स्वतःचे घर पेटले असता दुसऱ्याचे पापड लाटायला कोण जाईल? अकबर पळून गेल्याचे कळल्यावर बादशहा खूपच भडकला. अखेर फितुरीचे शस्त्र वापरून मोगल सैन्याने २१ सप्टेंबर १६८७ रोजी कुतुबशहाचा पाडाव केला.

अभिप्राय क्र.११

श्री.वसंत कानेटकर

'शिवाई' शरणपूर रोड, नासिक ४२२ ००२

फोन - २७३० ९२ दि. १७-११-१९९३

तुमचे पत्र मिळाले, पुस्तकही मिळाले होते. पुस्तकाबद्दल अभिप्राय कळवला नव्हता, कारण त्याबद्दलची माझी मते तुमच्या मतापेक्षा वेगळी आहेत. इतिहासाचार्य शेजवलकर आणि सेतू माधवराव पगडी यांच्याशी ती अधिक जुळती आहेत. आपल्याला आदरणीय वाटणाऱ्या व्यक्तिरेखांसंबंधांत कटू वस्तुस्थितीचा स्वीकारही इतिहासकाराने स्वच्छ मनाने पत्करायला तयार असले पाहिजे. हेच मी तीस वर्षांच्या अभ्यासातून आणि चिंतन, मननातून शिकलो. आपल्या पुस्तकातील वादग्रसत मतावरील माझे विश्लेषण 'शिवशाहीचा शोध' या ग्रंथात ओघाने येणारच आहे. तूर्त पुस्तकाबद्दल आभारी आहे.

—वसंत कानेटकर

२३. चक्रव्यूहातला अभिमन्यू

अनेक युद्धांत स्वतःला झोकून देऊन आणि सर्व बाजूंनी येणाऱ्या आक्रमणांना प्रतिआक्रमणांनी, शौर्याने व युक्तीने सामोरे जाऊन शंभूराजांनी १६८४ अखेर जबरदस्त दबदबा निर्माण केला होता; पण त्यांचे सामर्थ्य व एकूण राज्यच नेस्तनाबूत करायला निघालेला बादशहा औरंगजेब याच्याशी सामना देणे ही विपरीत लढाई होती. तरीही शंभूराजांनी बादशहाला पावणे नऊ वर्षे हैराण केले. ही इतिहासातली अपूर्व गोष्ट आहे. वाघाच्या टोळीशी एकाकीपणे एखाद्या चित्त्याने सामना द्यावा असा हा प्रकार होता. औरंगजेबाजवळची संपत्ती, सामग्री, प्रचंड सेनादल, सामर्थ्यवान सेनानींचा ताफा, हजारो उंट, घोडे, हत्ती, तोफा इत्यादि युद्धसामग्री आणि त्याचवेळी त्याच्या प्रभावाखाली निस्तेज झालेले सिद्दी, पोतुगीज व इंग्रज! हा विचार केला तर त्यांच्याजागी दुसरा कोणी असता तर सरळ लोटांगण घालून मांडलिक झाला असता अशी स्थिती होती. औरंगजेबापुढे आपला टिकाव लागणार नाही व आपण नाहक मरून जाऊ अशा भीतीने शंभूराजांचा चुलत भाऊ अर्जुनजी भोसले, मेव्हणा अचलोजी महाडीक, साल्हेरचा किल्लेदार असोजी कृष्णाजी, तसेच त्रिंबक, रामसेज, हरीशगड, माहुली इत्यादि किल्ल्यांचे किल्लेदार यांनी सरळ मोगलाईपुढे शरणागती पत्करली.

इतकेच नव्हे, तर ज्या राजारामाला सोयराबाई मराठेशाहीच्या गादीवर छत्रपती करणार होत्या तो शिवपुत्र राजारामसुद्धा रायगडावरून पळून औरंगजेबाच्या आश्रयाला जायला निघाला होता. शंभूराजांनी त्याला शिरवळजवळून पकडून परत नेले. (सप्टेंबर १६८५) झाडाला आग लागली की, पक्षी सुद्धा आपली घरटी सोडून सैरभैर होतात तशी ही गत झाली.

आदिलशाही आणि कुतुबशाही नष्ट झाली की, औरंगजेबापुढे आपण एकटेच राहू हे शंभूराजे जाणून होते. त्यांनी तेवढ्याचसाठी दोन्ही शाह्यांना साह्य करून बचावण्याचा प्रयत्न केला. फौजा दिल्या, पैसाही दिला. मोगल सैन्याची पिछाडी लुटून फस्त केली. आपल्या काही फौजा त्यांनी भडोचमार्गे मोगलांच्या प्रदेशात घुसविल्या व मोगल प्रदेश जाळण्यास व लुटण्यास प्रारंभ केला. या फौजा राजस्थानपर्यंत पोचल्या होत्या. त्यामुळे सुमारे पाऊण लक्ष मोगल सैन्य त्या भागात

गुंतून पडले होते. शंभूराजांनी कर्नाटकाची व्यवस्था आपले मेहुणे हरजीराजे महाडीक यांच्यावर सोपविली होती. त्यांनी पराक्रमाने तिकडचा दुप्पटीपेक्षा अधिक प्रदेश स्वराज्यात आणला. शंभूराजांची एकूण सेना सुमारे अडीच लक्षाच्या आसपास होती. लुटीचे तंत्र अवलंबून शंभूराजांनी गोवा, कर्नाटक, तामिळनाडू वगैरे भागांतून भरपूर संपत्ती जमविली होती. १६८७ साली फादर अर्लिन्स शंभूराजांबद्दल लिहितो, "संभाजीराजांनी आपल्या बापाच्या पाऊलावर पाऊल टाकून राज्यकारभार चालविला आहे. हिंदुस्थानातील राजांना लुटून तो सध्या इतका धनधान्यसंपन्न झाला आहे व इतका सामर्थ्यसंपन्न झाला आहे, की त्याने स्वतःला आदिलशहाचा पालक नेमून घेतले आहे."

शंभूराजांच्या मृत्यूनंतर परशुरामपंतांनी एकूण शिलकीचा अंदाज घेतला आहे. या अंदाजात गडोगडी विपुल धान्य, धन व युद्धसामुग्री त्यांनी साठवून ठेवली असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे.

सन १६८६ मध्ये मोगलांनी म्हैसूरकरांच्या मदतीने दक्षिणेकडील कांजीवरमवर चाल केली. कांजीवरम् स्वराज्यात होते. तेथील सरदार गोपाळ तात्याजी यांनी या आक्रमणास तोंड दिले. त्यांच्या मदतीस एक तुकडी विठ्ठल परशुराम यांच्या नेतृत्वाखाली पाठविण्यात आली. या सेनेने मोगली सेनेला कांजीवरम्‌मधून पिटाळून लावले. १६८६ अखेर शंभूराजांनी केशव त्रिंबक आणि संताजी भोसले यांना १६,००० घोडदळासह हरजीराजांच्या साहाय्यासाठी कर्नाटकात पाठविले. या सेनेने मद्रासजवळील अर्काट या जिल्ह्यातील सर्व किल्ले व मुलुख स्वराज्यात आणला. त्याचप्रमाणे चिंगळपुट, कावेरी आणि चेपॉक ही शहरेसुद्धा मराठी मुलुखात सामील केली. तामिळनाडूमध्ये तंजावरच्या ईशान्येस ११३ किलो मीटर्सवर चिदंबरम् हे प्राचीन स्थान आहे. तेथील श्रीनटराजाची मूर्ती मुसलमानी आक्रमकांपासून वाचवण्यासाठी १६४८ मध्ये कुटुमियामलाई येथे आणि तेथून पुढे ४० दिवसांनी मदुराई येथे हलविण्यातआली होती. संभाजीराजांनी ही मूर्ती ३७ वर्षे १० महिने, २० दिवसांनंतर पुनः चिदंबरम्‌मध्ये आणून, मंदिराचे नूतनीकरण करून, सोन्याचा कळस बसवून तेथे एक छोटा सभामंडप बंधला. (हे काम शंभूराजांनीआपले प्रतिनिधी गोपाळ तात्याजी यांच्यामार्फत करविल्याचे अलीकडेच तिरुवारुर येथे सापडलेल्या ताम्रपटांत स्पष्टपणे म्हटले आहे.)

कासीमखान याच्या नेतृत्वाखाली १६८७ च्या अखेरीस एक भलीमोठी फौज बंगलोरवर चालून आली आणि त्यांनी बंगलोर जिंकले. तेथून ती पुढे मराठ्यांच्या

ताब्यातील जिंजीकडे वळली. त्याबरोबर महाडीक यांनी २००० घोडदळ आणि ५००० पायदळ अशा ७००० च्या अनेक चमू बनवून वेगवेगळ्या भागात पाठवून दिल्या. या मराठी सेनांनी फोर्ट सेंट जॉर्ज व कांजीवरमूपासून मद्रासच्या पश्चिम व दक्षिणेकडील भागांतून मोगली सेनांना पार हुसकावून लावले.

❋❋❋

इतिहासाची अक्षम्य विकृती

बेंद्रे यांच्या 'संभाजी' चे तज्ज्ञपणे निरीक्षण करणाऱ्या शेजवलकरांनी कानेटकरांच्या नावाचा निर्देश न करताही त्यांच्या 'रायगडा'ची खालीलप्रमाणे संभावना केली आहे. ''अत्याधुनिक नाटककार मानसशास्त्राचा कापूस पिंजून संभाजीच्या अंतर्मनाचा ठाव घेऊ पहात आहेत. ते तर शुद्ध कल्पनाजाल आहे. ऐतिहासिक शक्यता व सत्यता त्यात कोठे उमटलेली दिसत नाही. नाटकातील मालमसाला भरून ऐतिहासिक व्यक्ती समाजापुढे मांडणे गैर आहे असे आम्हाला वाटते. त्यात बऱ्याच व्यक्तींना अलौकिक गुण चिकटविण्यात येतात व वाईट (खल) माणसाची प्रमाणाबाहेर बदनामी करण्यात येते. नाटकापासून प्रेक्षक काय अपेक्षितात तो त्यांचा प्रश्न; पण इतिहासाची ही अक्षम्य विकृती व हानी आहे असे आम्हाला वाटते.''

–डॉ.भीमराव कुलकर्णी

(छ.संभाजी स्मारक ग्रंथातून)

झंजावाती मोहीम

''स.१६८० ते १६८९ या नऊ वर्षांच्या काळात संभाजी महाराजांनी उत्तरमहाराष्ट्रापासून दक्षिणेत कांजीवरमूपर्यंत ५००० कि.मी.च्या टापूत आपल्या विरोधकांविरुद्ध एक झंझावाती मोहीम केली. ही गोष्ट इतिहास विसरू शकत नाही. संभाजीराजांना 'व्यसनाधीन राजा' ठरविणाऱ्या इतिहासकारांना त्यांनी केलेल्या लष्करी हालचालींचे सविस्तर विश्लेषण आणि मूल्यमापन करता आलेले नाही.

संभाजी महाराजांनी ज्या चौफेर मोहिमा उघडल्या आणि मराठ्यांची सत्ता कायम ठेवली त्यामुळेच पुढे १०० वर्षे या सत्तेला कोणी धक्का लावू शकला नाही.''

–ले.कर्नल डॉ.म.ग. अभ्यंकर

(छ. संभाजी स्मारक ग्रंथातून)

२४. दुर्दैवाचा फेरा

स्वराज्याचा केंद्रबिंदू असलेल्या रायगड या ठिकाणी राहून शंभूराजे सर्व आघाड्या लढवीत होते. मेवाड, बुंदेलखंड, चाकण, नाशिक, चौल, गोवा, पन्हाळा, कोल्हापूर, सावंतवाडी, बेंगलोर, चिंगलपुट, तिरुअनामलाई, जिंजी इत्यादी सर्व वेगवेगळ्या आघाड्यांवर सेनेच्या तुकड्या अविश्रांत झगडत होत्या. त्यांना रसद, मार्गदर्शन व कुमक पाठविणे आणि त्यांचा परामर्ष घेणे हे काम केंद्राकडून चालत होते. विजापूर, गोवळकोंड्याच्या संरक्षणातही स्वराज्याची पुष्कळ शक्ती खर्च झाली. हंबीरराव मोहिते, रूपाजी भोसले, रायाची सामराज, कवी कलश, मल्होजी घोरपडे, संताजी घोरपडे, खंडो बल्लाळ, रामचंद्रपंत अमात्य, निळोपंत पेशवे, विठ्ठल परशुराम, केसो त्रिमल, मेलगिरी पंडित यांच्यासारखे शंभूराजांच्या जीवाला जीव देणारे सेनानी अहोरात्र अखंड स्वराज्यरक्षणासाठी परिश्रम करीत होते.

१६८८ या वर्षाचा आरंभ झाला. मोगलांनी सर्व सीमा आवळायला सुरुवात केली. शंभूराजांचे सर्व गड युद्धास सिद्ध होते. १८ जानेवारी १६८८ च्या एका इंग्रजाच्या पत्रात म्हटले आहे की, ''मोगल सैन्य येणार म्हणून सर्व गडांवर पुष्कळ तोफा जय्यत तयार ठेवल्या आहेत; पण मोगल सैनिक संभाजीराजांविरुद्ध चालून येण्यास धजत नाहीत.''

हे सारे खरे असले तरी शंभूराजांना धक्का बसण्यासारख्या काही घटना याच काळात- म्हणजे १६८७ मध्ये घडल्या. शंभूराजांचे मेहुणे शिवरायांचे जावई, हरजीराजे महाडीक यांनी कर्नाटकात स्वतःलाच महाराज म्हणवून घ्यायला सुरुवात केली आणि त्यांनी रायगडावर वसूल पाठविणे बंद केले.

ऑक्टोबर १६८७ मध्ये वाईवर चालून आलेल्या मोगल फौजेशी झुंज देताना सरसेनापती हंबीरराव मोहिते तोफेचा गोळा लागून मृत्युमुखी पडले. शंभूराजांचा उजवा हात जणू निखळला.

आदिलशाही आणि कुतुबशाहीसारख्या जुन्या आणि मातब्बर सत्ता जिथे कोसळल्या तिथे मोगलांसमोर आता आपला कसा निभाव लागतो अशा भयगंडाने भेदरलेल्या आणि औरंगजेबाच्या भेदनीतीला बळी पडलेल्या कित्येकांनी मराठ्यांचा

पक्ष सोडला आणि मोगलांचा आश्रय घेतला. जो रामसेजचा किल्ला पांच वर्षे लढून मोगलांना मिळाला नाही, तो याच काळात फितुरीने त्यांच्या घशात पडला. साल्हेरचेही तेच झाले.

या साऱ्या घटनांमुळे शंभूराजे सचिंत झाले. तरीही त्यांचे मनोधैर्य कायम होते. त्यांचे ईश्वरनिष्ठ मन त्यांच्या काव्यातून प्रकट होते. शंभूराजांनी बुधभूषण हा संस्कृत व नायिकाभेद, नखशिख आणि सातसतक हे हिंदी काव्यग्रंथ रचले. सातसतक हा त्यांचा काव्यग्रंथ १६८८ मध्येच लिहिलेला दिसतो. यातील रचनांवरून शंभूराजांची मनःस्थिती समजू शकते.

अतिप्रबल घेरे रहै आठो जाम मोही।
दिनबंधु अब क्यों न लागत पुकारी हो॥
सबही संकट नेवाई एक कोर ताके।
तब जानि हो जू जब मो तन निहारिहो॥
ज्यों भाँति हरिनकसिप को विदार्‍यौ उर।
तौन भाँति कब मेरे दुष को विदारिहो॥

(अनेक संकटे रात्रंदिवस मला वेढून राहिली आहेत. मग हे दीनबंधू, तुला कां बरे मी हाक मारणार नाही? जेंव्हा तू या भक्ताच्या शरीराकडे पाहशील तेव्हांच तुला त्याचे साहाय्यास जावेसे वाटेल. तू जसे हिरण्यकश्यपूचे पोट फाडलेस तसेच माझ्या दुःखाचेही विदारण कर.)

संभ कहे सुनि दीन दयाल सो।
मेरी हँसी भए तेरी हँसी है॥

(शंभू म्हणतो, हे दीनदयाळा, माझ्या फजितीत तुझीच फजिती आहे.)

महाराणी येसूबाईचे थोरले बंधू गणोजीराजे शिर्के यांचीही बुद्धी फिरली. त्यांनी पन्हाळगडावर असलेल्या कवी कलशावर आक्रमण केले. शंभूराजांचा हा मेहुणा म्हणून त्याच्याशी युद्ध न करता कवी कलश पळून विशालगडावर गेला. तेथून त्याने शंभूराजांना हा वृत्तांत कळविला. संतापलेले शंभूराजे गणोजीचे पारिपत्य करण्यासाठी स्वतः पन्हाळ्यास आले; पण गणोजी संगमेश्वर भागात शिर्काणात पळून गेला. शिर्काण म्हणजे शिर्क्यांचा प्रदेश. शिर्काणात शिरून, शिर्क्यांचा पुरता बीमोड करून शंभूराजे परत विशाळगडावर आले. तेथील बंदोबस्त पाहून नंतर

कवी कलशासह शंभूराजे आपल्या संपूर्ण सेनेसह संगमेश्वरी आले. तेथून ती सारी सेना परत रायगडास जाणार होती.

तथापि शिर्क्यांचा बंदोबस्त करताना अनेक कुटुंबे उघड्यावर पडली होती. त्यांच्या तक्रारी ऐकून घ्यायच्या होत्या. दोन-तीन वतनांची कामे राहिलेली होती. तीही पुरी करायची होती. समर्थ शिष्य रंगनातस्वामी हेही त्याचवेळी त्या परिसरात असल्यामुळे शंभूराजांच्या भेटीला आले.

शंभूराजांचा मुक्काम संगमेश्वरात कसबा येथील सरदेसाई यांच्या वाड्यात होता. तेथे चार दिवस राहून, सारी कामे आटोपून पुढे निघावे असा विचार करून शंभूराजे संगमेश्वरात राहिले. कामे चालूच होती. इतक्यात शेख निजाम ऊर्फ मुकर्रबखान याने कोल्हापूर गाठल्याचे वृत्त आले. आता तो सैन्य घेऊन कितीही तातडीने आला असता, तरी सुमारे नव्वद मैलांचे अंतर कापायला सैन्यासह त्याला ५ ते ६ दिवस लागले असते.

शंभूराजांनी आपल्या हेरांचे जाळे पन्हाळ्यापासून आंबाघाटमार्गे संगमेश्वरपर्यंत सर्वत्र पसरले. खान ससैन्य निघाल्यावर लवकरच वृत्त येईल अशी तजवीज करून ठेवली. आपल्याबरोबर निवडक तीन-चारशे सैनिक ठेवून बाकी सारी सेना रायगडाकडे पाठवून दिली.

शंभूराजे ३ फेब्रुवारी १६८९ ला रायगडाकडे निघणार होते. एका खटल्याचा निवाडा केला, दुसऱ्याचा करायचा आणि निघायचे. इतक्यात मुकर्रबखान तीन हजार स्वारांसह संगमेश्वरात आल्याचे वृत्त एका हेराने सांगितले. तीन दिवसांत एवढा भाग पादाक्रांत करून येणे अशक्य होते, म्हणून शंभूराजांना ती बातमी खोटीच वाटली. इतकेच नव्हे, तर तेही कुणाचे तरी कुटिल कारस्थान असावे असा संशय त्यांच्या मनात उत्पन्न झाला. मात्र लवकरच वृत्त खरे असल्याचे कळले. कारण शिर्क्यांनी त्याला रानातली चोरवाट दाखवून साह्य केले होते.

शंभूराजांनी एवढ्या सैन्यापुढे आपला टिकाव लागणे कठीण आहे हे जाणून, सर्वांना एकदम शत्रूवर तुटून पडून, त्यांची फळी फोडून बाहेर पडावे व ज्याला जसे जमेल तसे त्याने रायगडावर जावे असा कार्यक्रम आखला. त्याप्रमाणे तासभर घनघोर युद्ध झाले. अनेक मोगल सैनिकांना कापून, फळी फोडून बहुसंख्य मराठे सटकले. कवी कलशाच्या हाताला बाण लागून तो घोड्यावरून कोसळला व पकडला गेला. शंभूराजांनी आपला घोडा मागे वळविला व तेथून वेगाने सटकले. नावाडे बंदरात येऊन त्यांनी होडीतून पळून जाण्याचा प्रयत्न केला; पण ते पकडले गेले. (काहींच्या

मते पळून जाण्याची हुलकावणी देऊन ते परत वाड्यात येऊन लपून बसले व तेथे पकडले गेले.) मुकर्रबखानाचा पुत्र इखलासखान याने शंभूराजांना जेरबंद केले, करकचून बांधले आणि त्यांचे केस धरून फरफटत हत्तीजवळ आणले. त्याचप्रमाणे जखमी झालेल्या कवी कलशालाही आणण्यात आले.

शंभूराजांवरील आरोप

शंभूराजांना मुकर्रबखानाने धरून बहादूरगडाकडे नेल्यावर झुल्फिकारखानाने रायगडावर हल्ला करून महाराणी येसूबाई आणि शाहूराजे यांना अटक केली. त्याचवेळी त्याने रायगडावरील सर्व कागदपत्रे अक्षरशः जाळून टाकली.

शंभूराजांविषयी अभ्यास करताना हिंदुद्वेष्टे खाफीरखान, मुस्तैदखान, ईश्वरदास नागर यांच्या नोंदी, शंभूराजांचा द्वेष्टा मल्हार रामराव चिटणीस, राजारामाचा पक्षपाती सभासद आणि परकीय इंग्रज, पोर्तुगीज इत्यादि राज्यकर्ते व प्रवासी यांच्याच नोंदी पुढे येतात.

एखाद्या आरोपीजवळील सर्व कागदपत्रे काढून घेऊन, त्याला वकीलही न देता विरोधी पक्षाच्या सर्व साक्षीदारांना भरपूर वाव देऊन, त्यांनाच खरे मानून, आरोपीला गुन्हेगार ठरवावे, तसे आजपर्यंत शंभूराजांचे बाबतीत झाले आहे; पण या पुढे मात्र अन्य असंख्य पुरावे असे आहेत, की जे शंभूराजांचे खरे व्यक्तिमत्त्व पटवून देण्यास समर्थ आहेत.

वढू की तुळापूर?

''त्याचे असे आहे, वढू पडलं लहान गांव. जवळच मैल-दोन मैलांवर तुळापूर, भीमा आणि इंद्रायणीचा संगम पडला तुळापुरास; ते एक क्षेत्र म्हणून प्रसिद्ध अन् औरंगजेबाची छावणी पार कोरेगांवपासून थेट वढूवरून तुळापूरपर्यंत पाच-सात मैल लांब पसरलेली. त्यामुळे तुळापूरच्या प्रसिद्ध नावावरून लोक 'तुळापूर, तुळापूर' म्हणतात; पण वध खरा झाला वढू गांवी, मग तुळापुरास कदाचित अस्थि टाकून क्रिया वगैरे काही झाली असल्याचा संभव आहे.''

पेशवे दप्तरातला पुरावा ''मौजे वढू बुद्रुक येथे संभाजी महाराजांचे वृंदावन आहे. तेथे झाडलोटीसाठी आणि पुष्पवाटिका लावण्यासाठी इनामे दिल्याचे तारीखवार दाखलेच मिळाले आहेत.''

–म.म. दत्तो वामन पोतदार
(छ.संभाजी स्मारक ग्रंथावरून)

२५. निर्भय मृत्युंजय !

बड्याबड्या मातब्बर सरदारांना लाखांच्या सेनेसह प्रचंड खटपट करून जे यश मिळाले नाही ते आपणांस आज मिळाले, त्यामुळे मुकर्रबखानाला हर्षवायूच व्हायचा राहिला होता. खानाने ताबडतोब हीआनंदाची बातमी औरंगजेब बादशहाला कळविली आणि मुळीच वेळ न गमावता २०-२५ हजारांची फौज घेऊन मुकर्रबखान कऱ्हाड, वडूज, दहीवडी, फलटण, बारामतीमार्गे बहादूरगडाकडे गेला. बादशहाची छावणी त्या वेळी अकलूजहून निघून त्याच दिवशी बहादूरगडास येऊन पडली हेती. संगमेश्वर ते बहादूरगड हे अंतर २३० मैल आहे.

मुकर्रबखानाने शंभूराजे आणि कवी कलश यांना जेरबंद करून हत्तीवर बांधले. इतर सुमारे २५ जणांना अटक करून बरोबर घेतले. कित्येकांच्या गळ्यात साखळ्या बांधल्या. हा सर्व लवाजमा १५ फेब्रुवारी १६८९ रोजी छावणीत येऊन पोहोचला. बादशहाच्या सूचनेनुसार शंभूराजांच्या अंगावरील राजवस्त्रे उतरविण्यात आली. त्यानंतर त्यांना इराणात गुहेगारांच्या अंगावर घालतात तसा विदुषकी अंगरखा व लाकडी उंच टोपी (तख्ताकुलाह) चढवून इतरांनाही विदूषकी अंगरखे व टोप्या घालून सर्वांची धिंड छावणीच्या परिसरात ११ मैलपर्यंत काढण्यात आली. त्यांना उंटावर उलटे बसविण्यात आले आणि पुढे ढोल, कर्णे वाजवीत, लष्करातून मिरवीत नंतर बादशहासमोर दरबारात आणण्यात आले. छावणीतल्या मुसलमानांना तो ईदच्या सणासारखाच दिवस वाटला. शंभूराजांची अशी घोर विटंबना करण्यात आली. वाटेत कुणी उंटाला टोची, कुणी दगड मारी, तर कुणी शंभूराजांना अपशब्द ऐकवीत. अखेर त्यांना बादशहापुढे उभे करण्यात आले.

अल्लाच्या कृपेनेच हा विजय आपल्याला लाभला या कृतज्ञभावनेने बादशहाचे अंतःकरण भरून आले. तो सिंहासनावरून बिछायतीच्या खाली येऊन, जमिनीवर डोके टेकून अल्लाचे आभार मानू लागला. हे पाहताच शंभूराजे आणि कवी कलश यांनी एकमेकांकडे पाहिले. त्या जखडलेल्या स्थितीतही त्यांचे मनोधैर्य कायम होते.

शीघ्रकवी, कवी कलश याने या प्रसंगी एक कवन रचून आपल्या धन्याच्या चरणी अर्पण केले.

यावन रावन की सभा संभू बंध्यो बजरंग।
लहू लसत सिंदूरसम खुब खेल्यो रनरंग॥
जो रवि छवि लछत ही खद्योत होत बदरंग।
त्यो तुव तेज निहारी ते तखत तज्यो अवरंग॥

(रावणाच्या सभेत ज्याप्रमाणे हनुमंताला आणले होते, त्याप्रमाणे संभाजीराजास औरंगजेबासमोर बांधून उपस्थित करण्यात आले आहे. हनुमंताच्या अंगाला शेंदूर शोभून दिसतो तसे घनघोर युद्धामध्ये रक्ताने अंग माखल्याने, हे राजन, ते तुला शोभून दिसत आहे. ज्याप्रमाणे सूर्याला पाहताच काजव्याचा प्रकाश नाहीसा होतो, त्याप्रमाणे तुझे तेज पाहून औरंगजेबाने आपल्या सिंहासनाचा त्याग केला आहे.)

बादशहापुढे उभे करण्यात आल्यानंतर इखलासखानाने मुजरा करण्यास वारंवार सांगूनही शंभूराजांनी यत्किंचितही मान लवविली नाही व बादशहास ताजीम दिली नाही. उलट संतप्त नजरेने ते बादशहाकडे पहात होते. संतापलेल्या बादशहाने त्यांना तशाच अवस्थेत कैदेत टाकण्याचा हुकूम दिला.

दोनच दिवसांनी बादशहाने सरदार रुहुल्लाखान यास शंभूराजांकडे पाठविले. रुहुल्लाखानामार्फत त्यांना दोन प्रश्न विचारण्यात आले. ''तुझे खजिने, जडजवाहीर कोठे आहे ? बादशाही सरदारांपैकी कोणी कोणी पत्रव्यवहाराद्वारा तुझ्याशी संपर्क ठेवला होता ?'' शंभूराजांनी या प्रश्नांना उत्तरे न देता अत्यंत संतापाने बादशहासंबंधी घाणेरडे शब्द उच्चारले आणि त्यांची निंदा-नालस्ती केली. रूहुल्लाखान शब्दन्‌शब्द बादशहाला सांगू शकला नाही; पण एकूण वक्तव्याची रूपरेषा त्याने सांगताच बादशहा भडकला, त्यानंतर त्याच्या आज्ञेनुसार शंभूराजे आणि कवी कलश यांच्या डोळ्यात तापलेल्या सळ्या फिरवून त्यांचे डोळे फोडण्यात आले आणि नंतर त्या दोघांच्या जिभा कापून काढण्यात आल्या. त्या दिवसापासून त्या दोघांनी अन्नपाणी वर्ज्य केले.

मुसलमानी सत्तांच्या परंपरेमध्ये यात नवीन काहीच नव्हते. अत्यंत क्रूर व निर्दय पद्धतीने शत्रूंचा नायनाट करण्याची त्यांना धर्माज्ञाच आहे; परंतु एका सर्वतंत्र स्वतंत्र राजाचे त्याच क्रूर पद्धतीने हाल हाल करणे ही असंस्कृततेची परमावधी आहे. ही गोष्ट १७ फेब्रुवारी १६८९ रोजी घडली.

बादशहाने शंभूराजांना ‘मुसलमान झालास तर जीवदान देतो’ असेही अमिश दाखविले होते म्हणतात. शंभूराजांनी त्याला, “तुझी मुलगी देत असशील तर होतो मुसलमान.” असे उलट उत्तर दिल्याचेही सांगतात. त्यात बाणेदारपणा व्यक्त होत असला, तरी सत्यता वाटत नाही. कारण कोणत्याही परिस्थितीत शंभूराजांना जिवंत ठेवण्याची बादशहाची इच्छाही नव्हतीआणि हिंमतही नव्हती. तसेच बादशहाच्या पांच मुलींपैकी मोठ्या दोघी अविवाहित होत्या. त्यातील सर्वांत मोठी बादशाही तुरुंगात होती आणि दुसरी शंभूराजांपेक्षा १४ वर्षांनी मोठी होती, त्यामुळे शंभूराजांचे तथाकथित बाणेदार उत्तर अप्रस्तुत वाटते.

बादशहाने शंभूराजांना ठार मारण्याचा तर पक्का निश्चयच केला होता; पण रुहुल्लाखानकडून शंभूराजांचे वक्तव्य कळल्यावर तो इतका संतापला, की त्याने त्यांचे हाल हाल करण्यास आरंभ केला.

या दरम्यान शाही छावणी बहादूरगडाकडून हालून ३ मार्च १६८९ रोजी भीमा कोरेगांवजवळ पडली. भीमा नदीच्या विस्तृत कोरड्या पात्रात व सपाट मैदानी प्रदेशात ७-८ मैल लांबीची ही छावणी होती. तुळापूरपासून कोरेगावपर्यंत तिचा विस्तार होता. वढू हे ठिकाण तुळापूर आणि कोरेगांव यांच्या मध्यावर आणि तुळापूर भीमा-इंद्रायणीच्या संगमावर आहे.

औरंगजेबाची छावणी म्हणजे एक मोठे शहरच असायचे. छावणीचा घेर ३० मैलांचा असून तेथे ६० हजार घोडेस्वार व एक लक्ष पायदळ असायचे. याशिवाय सामानाचे ५० हजार उंट, ३ हजार हत्ती, २५० बाजार, व्यापारी, जनानखाने, नोकरचाकर एवढे सर्व मिळून छावणीतील एकूण संख्या किमान ५ लाख भरे. (श्री.विजय देशमुखांच्या ‘राजा शंभू छत्रपती’ मधून)

या विस्तृत छावणीत खासा औरंगजेब बादशहाचे तंबू तुळापूरला होते. तेथून जवळच शंभूराजांना सिकंदरखानच्या तंबूलगतच्या कारागृहात डांबण्यात आले होत. बावीस दिवस त्यांचे वेगवेगळ्या प्रकारे अत्यंत क्रूर पद्धतीने हाल हाल करण्यात आले. अखेर अर्धमेल्या अवस्थेतील त्यांचे देह वढू गावाजवळच्या रानात आणण्यात आले. कवी कलशाचा शिरच्छेद करण्यात आला आणि शंभूराजांना जमिनीवर पालथे झोपवून कुऱ्हाडीने पायापासून त्यांच्या शरीराचे तुकडे तुकडे करण्यात आले. तो दिवस होता, फाल्गुन वद्य अमावास्या, दि. ११ मार्च १६८९.

दुसऱ्या दिवशी हिंदूंचा वर्षप्रतिपदेचा महत्त्वाचा सण! त्या दिवशी प्रत्येक हिंदू घराच्या दारात गुढी उभारली जाते. शंभूराजांचे धडावेगळे मस्तक एका उंच भाल्यावर

रोवले गेले. ढोल, कर्णे वाजवीत शेकडो बाजारबुणग्यांसह मोगली मिरवणूक छावणीतून फिरविण्यात अली. औरंगजेब आनंदाने ही मिरवणूक पाहात होता. नंतर ते शंभूराजांचे मस्तक महाराष्ट्राच्या अनेक मोठ्या शहरांत असेच फिरविण्यात आले.

शंभूराजांच्या या महान बलिदानाने उभ्या महाराष्ट्राला बल दान केले. सारा महाराष्ट्र पेटून उठला. महाराष्ट्रात प्रत्येक अंकुर भाल्यांचे फाळ आणि तलवारींची पाती बनू लागला. पावसाचा पडणारा प्रत्येक थेंब अमृतबिंदू बनून वनस्पतीत राष्ट्रप्रेमाचे चैतन्य भरू लागला. महाराष्ट्राच्या कडेकपारीतून हिंदुत्वाच्या सिंहगर्जना निनादू लागल्या. हैंदवी स्वराज्य नष्ट करण्याचे औरंगजेबाचे स्वप्न सायंकाळच्या छायेप्रमाणे लांबतच राहिले.

शंभूराजांच्या वधानंतर अठरा वर्षे औरंगजेब हा पिसाटासारखा महाराष्ट्रातील हैंदवी तेज नष्ट करण्यासाठी तडफडत होता; पण महाराष्ट्राला अमृत लाभले होते, वढूमधील आत्मसमर्पणातून ! त्यातून धनाजी जाधव, संताजी घोरपडे, परशुरामपंत प्रतिनिधी, रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण यांसारखी नररत्ने नवे तेज घेऊन उदयाला आली. अखेर यथाकाली औरंगजेब अपूर्ण स्वप्न उराशी बाळगून औरंगाबादेतील आपल्या कबरीत गाडला गेला.

शाक्तांचा प्रभाव

शंभूराजांनी कवी कलशाच्या सहवासाने शाक्त पंथाचा स्वीकार केला होता व स्वतःस कलषाभिषेक करवून घेतला होता. त्या वेळी शृंगारपूर भागात शाक्तांचा बराच प्रभाव होता. ही गोष्ट खरी असली तरी महाराष्ट्रात बंगाली पद्धतीचा शाक्तांचा वामपंथ कधीच रुजला नाही. महाराष्ट्रातला शक्तिउपासनेचा तंत्रमार्ग जगद्गुरु आद्यशंकराचार्य प्रणित दक्षिणतंत्र होता. मद्य, मांस, मैथुनादी पंच मकारांचे माहात्म्य वामतंत्रात आहे. दक्षिणतंत्रात नाही!

शतचंडी, सहस्रचंडी, आयुतचंडी, लक्षचंडी इत्यादी यज्ञ व विविध हविर्द्रव्यांची हवने हाच दक्षिणतंत्राचा भाग.

तंत्र शब्द ऐकताच काही लेखकांनी तंत्रभेदांच्या अज्ञानाने, तांत्रिकांच्या नादाने शंभूराजे मदिरापान व अन्य दुराचरणे करू लागले अशी कल्पना केली.

२६. शंभूराजे ! आम्हाला सामर्थ्य द्या !

धर्मवीराग्रणी, शिवराज्यभूषण, हैंदवी स्वराज्यसंरक्षक, यवनशासनप्रपीडक, सनातन वैदिक धर्मसिद्धांताभिमानी, परमईश्वरनिष्ठ, महाप्रतापी, छत्रपती शंभूराजांचा त्रिवार विजय असो ! विजय असो !! विजय असो !!!

महाराज, आपण राष्ट्रासाठी मृत्यू पत्करून अमर झालात. आपण सूर्यमंडल भेदून सायुज्यमुक्तीला पोहोचलात. आपले व्यक्तिमत्त्व इतके मोठे आहे की, त्याचा विचार करण्याची, खरेच आमची कुवत नाही. हिमालयाच्या शिखराची उंची उशी खालच्या ढेकणांना काय समजणार ? सूर्याचे तेज घुबडांना कुठून आकलन होणार ? कमलपरागांचा आस्वाद बेडके कशी घेणार ? स्वर्गलोकातील अलकापुरीचे सौंदर्य पापी दुराचाऱ्यांना कसे बघायला मिळणार ? आपल्या उदात्त जीवनाची उंची महाराष्ट्राला दुर्दैवाने समजलीच नाही. नुसतीच समजली नसती तरी ठीक ! पण घोर अंधःकारात जसे एखादे बहुरंगी सुंदर चित्र दिसतच नाही, तसे फार तर झाले असते ! पण झाले अगदी उलट. एखाद्या वेड्यावाकड्या आरशात जसे प्रतिबिंब वेडेबिंद्रे दिसते तसे आपले अगदी घाणेरडे, अगदी तिरस्करणीय असे चित्र आमच्यापुढे रेखाटले गेले. गेली पावणेदोनशे वर्षे महाराष्ट्राला आपले हेच गलिच्छ चित्र माहीत आहे ! तेच आपले खरे रूप आहे असे लोकमानसात शिरले आहे. फक्त आपला तेजस्वी मृत्यू म्हणजेच आपली झालेली भीषण हत्या हीच तेवढी या तथाकथित चित्रकारांना विकृत चितारता आली नाही. नाही म्हणायला आपल्या या मृत्युंजय-त्वाला सुद्धा बादशहाच्या मुलीच्या मागणीची एक विकृत फित चिकटवली गेलीच आहे.

आपण जर या भरतखंडात पुनः जन्माला आलात, तर आपल्याला आपल्यावर सुमारे साठ नाटके, अनेक चित्रपट, अनेक कादंबऱ्या तयार झालेल्या आहेत असे दिसून येईल; पण महाराज, ते चित्रपट, ती नाटके तुम्ही पाहू नका, त्या कादंबऱ्या तुम्ही वाचू नका ! का ठाऊक आहे ? कारण ते सारे तुम्हाला दुसऱ्याच कोणाचे तरी चरित्र वाटेल ! कारण तुम्ही थोरातांची कमळा, तुळसा, गोदावरी या बायांना पाहिलेले सुद्धा नाही (कारण त्या जन्मलेल्या सुद्धा नव्हत्या.) तर त्यांच्यावर प्रेम कुठले करणार ? ज्या पन्हाळ्यावर तुम्ही सुभेदार म्हणून वावरत होता तेथे तुम्हाला तुरुंगात

ठेवले होते म्हणे शिवाजी महाराजांनी! असे तुम्हाला या विकृत साहित्यात पहावे लागेल. काही थोडेच साहित्यिक तुमचे खरे स्वरूप जाणतात.

महाराज, तुम्ही मराठेशाहीच्या पाठीत खंजीर खुपसण्यासाठी दिलेरखानाकडे गेला होता आणि पस्तावून परत आलात असे इथल्या सगळ्यांनी पक्के खरे मानले आहे. ज्या मराठेशाहीला बुडवायला आलेल्या औरंगजेबाला तुम्ही 'तोबा, तोबा' करायला लावले, त्याच्या मनसबदारीचा स्वीकार शिवरायांच्या राजकारणापायी तुम्हाला तीन वेळा स्वीकारावा लागला आणि तुम्ही ती नाटके उत्तम वठवलीत हे Documentry Evidence खरे म्हणणाऱ्यांना कसे पटावे? सहेतुक राजकारणी पत्रे खरीच मानणारे तुमचा इतिहास आपल्याला हवा तसा विकृतपणे रंगवीत आले आहेत!

महाराज, तुम्ही बादशहाच्या पापी हातात सापडल्यावर रायगडावरील तुमच्या कारकिर्दीतली सर्व महत्त्वाची कागदपत्रे जाळली गेली. ज्यांतून तुमचे खरे व्यक्तिमत्त्व स्पष्ट झाले असते, ती तुमची तेजस्वी, राष्ट्रभक्त, देदीप्यमान मूर्ती चक्काचूर झाली आणि मग परकीयांनी दुष्ट हेतूने व अर्धवट आधाराने जे लिहिले ते, स्वकीयानेच पूर्वजांच्या हत्येचा सूड म्हणून आपली बदनामी करणारे लिहिले ते, तर अन्य कुणी स्वकीयानेच एकाची स्तुती करण्याच्या भरात आपणांस निंदिले ते, आणखी कुणी आपण जन्माने काफर आणि काफरांचे स्वराज्य उभारायला निघालात म्हणून ज्यांचे जन्मसिद्ध शत्रू, त्या जात्यंध हिरवटांनी शिवीगाळ करीत करीत आपल्याबद्दल लिहिले ते, असे सारे तुकडे एकत्र करून, ते कसे तरी जोडून, आपली एक अगदी बीभत्स मूर्ती तयार करण्यात आली.

या मूर्तीचा तोंडावळा फक्त आपला होता. पण डोळे दारुड्याचे होते. मेंदू उग्र प्रकृतीचा होता. मन विषयांध कामलंपट राजपुत्राचे होते, वृत्ती मवाल्याची होती, पाय अनेकांना चिरडून टाकणाऱ्या हत्तीचे होते, हात सोयराबाईला भिंतीत चिणणाऱ्या कसाबाचे होते, बुद्धी खुनी माणसाची होती आणि आचार तंत्रमार्गाने जारण-मारण करणाऱ्या चेटक्याचा होता. हे सारे तुकडे जोडण्यात आले आणि त्याला नांव देण्यात आले 'संभाजी!' महाराज! आपली ही भीषण क्रूर चेष्टा खुद्द औरंगजेबाने केलेल्या हत्येपेक्षासुद्धा अधिक विषारी आहे. आपल्या या भीषण चेष्टेबद्दल आपल्या या गलिच्छ मूर्ति निर्मितीबद्दल महाराज, आम्ही शरमिंदे आहोत. काही वर्षे हेच आपले रूप खरे मानण्याचे पाप कळत-नकळत आम्हीसुद्धा केले आहे. महाराज, आम्हालाच हत्तीच्या पायी द्या.

पण, महाराज, आपण उदार होता, आपण सहृदय होता, आपण पूर्ण विचारी होता, म्हणून तर आपणांस पन्हाळ्यावर शिवरायांच्या मृत्यूचे वृत्त न कळविता राजारामाला गादीवर बसविण्याचे कारस्थान करणाऱ्यांवर आपण धाऊन गेला नाहीत. महाराजांच्या मृत्यूनंतर अडीच महिने आपण पन्हाळ्याहूनच कारभार चालविलात; पण रायगडचे बंड त्वेषाने मोडले नाही. आपणांस पन्हाळ्यात येऊन अटक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या रायगडच्या मुखंडांना आपण क्षमा करून अष्टप्रधानांतील आपापल्या पदांवर स्थापन केलेत. केवढी ही उदार बुद्धी! पुढे त्यांनीच पुनः वर्षभराने विषप्रयोगाचा प्रयत्न केला, तेव्हांच आपण त्यांना देहांताची कठोर शिक्षा राष्ट्रहितासाठी दिलीत. तरीही या कटाच्या मूळ प्रणेत्या सोयराबाई यांना आपल्या सावत्र का होईना; पण मातोश्री असल्यामुळे 'कसा करू मी वार ?' असा विचार करून आपण केवळ नजरकैदेत ठेवण्याचीच शिक्षा दिलीत. पुढे त्यांनी आत्महत्या केली हे त्यांच्या मनस्वी स्वभावाला शोभणारेच होते.

आपण पावणेनऊ वर्षांत शंभर लढाया करून राष्ट्ररक्षणाची पराकाष्ठा केलीत, खरोखरच राजारामाला हे काम झेपणारे नव्हते. आपल्या जागी कोणीही असता तरी खाली मान घालून शरणागती पत्करण्याशिवाय त्याला दुसरा मार्गच सुचला नसता.

पण आपण कठोर झुंज दिलीत, कडवी झुंज दिलीत, औरंगजेबी हिरवट वृत्तीला आपण पाणी पाजलेत! साफ लोळवलेत!

महाराज, हे लेखन केवळ आपली स्तुती करण्यापुरतेच नाही, तर आपली स्मृती मनात ठेवून आम्ही आपणांस प्रार्थना करणार आहोत.

''आम्ही हिंदू परधर्माचे वा परधर्मीयांचे वैरी नाही, द्वेष्टे नाही, पंथभेद, उपासना भेद, सहजीवनाच्या आड येण्याचे काहीच कारण नाही, असेच आम्ही मानतो. पण केवळ आम्ही हिंदू आहोत म्हणून कोणी आम्हाला, आमच्या देवस्थानांना, आमच्या देवप्रतिमांना, आमच्या धर्मग्रंथांना शत्रुभावाने पाहत असेल, तर आम्हीही त्याची गय करणार नाही. औरंगजेब मेला, पण औरंगजेबी जात्यंध, आक्रमक हिंदुद्वेष्टी वृत्ती मेली नाही. ती तशीच राहणार असेल, तर आपली स्मृती आम्हाला निश्चितच तिचा सर्वनाश करण्याची प्रेरणा देईल यात शंका नाही. महाराज, तुम्हीच आम्हाला सामर्थ्य द्या आणि शिवप्रभूंचे हिंदवी स्वराज्य पुनः एकदा महदैश्वर्यासह साकार करा.

हर हर महादेव! हर हर महादेव!! हर हर महादेव!!!

परिशिष्ट - १
छत्रपती संभाजी महाराजांच्या चरित्रातील रूढ कल्पना व वास्तवता

क्र.	रूढ कल्पना	वास्तवता
१.	थोरातांची कमळा, तुलसी इ. प्रेमपात्रे	ऐतिहासिक पात्रे नाहीत. कविकल्पनेतून उदयाला आलेल्या व्यक्ती.
२.	ब्राह्मणकन्या गोदावरीला पळविली म्हणून ती सती गेली.	ही कोणाची कोण हे अज्ञात, बिनबुडाची कथा.
३.	व्यसनासक्ती	त्यांना खरेच कोणतेही व्यसन नव्हते.
४.	१६७९ या वर्षी स्वराज्याला सोडून मोगलांना मिळाले.	दिलेरखानाकडे गेले हे खरे; पण महाराजांच्याच सूचनेनुसार, अंतरंगाचा शोध घेणे व आक्रमण थोपवणे यासाठी. रुसून-फुगून स्वार्थासाठी नव्हे.
५.	शिवरायांनी पन्हाळ्यास तुरुंगात ठेवले होते.	पन्हाळा, प्रभावळी, शृंगारपूर या सुभ्याचे सरसुभेदार होते. त्यांना तुरुंगात ठेवलेले नव्हते.
६.	महाराजांच्या निधनानंतर संतप्त शंभूराजे रायगडावर धावून आले आणि त्यांनी राजारामाला तुरुंगात टाकले. सोयराबाईला चिणून मारले, अन्य २०० लोकांना ठार केले व राज्याभिषेक करवून घेतला.	१) महाराजांचे निधन दि. ३-४-१६८०. २) शंभूराजे रायगडावर आले दि. १८-६-१६८०. ३) सर्व मंत्र्यांना व पदाधिकाऱ्यांना पूर्ववत मानसन्मान व पदे दिली. ४) शंभूराजांचे राज्यारोहण दि. १६-१-१६८१.

	५) सोयराबाईंना कोणतीही शिक्षा दिलेली नाही. ६) राजारामाला तुरुंगवास नाही. ७) पुनश्च शंभूराजे यांना विषप्रयोग करण्याचा कट, जुलै १६८१. ८) मग मात्र कटात सामील असणारे ठार मारले. सोयराबाईंना नजरकैदेत ठेवले (ऑगस्ट १६८१) ९) सोयराबाईंनी आत्महत्या केली (ऑक्टो. १६८१)
७) शिवरायांनी जमविलेल्या अनेक वजनदार व्यक्तींना बाजूला सारून कलुषा कब्जीला जवळ केले.	शिवरायांनी जमविलेली जी मंडळी शंभूराजांविरुद्ध विषप्रयोगापर्यंत कारस्थाने करीत होती, त्यांना त्यांनी दूर केले, कवी कलश हा विद्वान, पराक्रमी आणि विश्वासू पुरुष ही श्रीशिवरायांचीच निवड होती. कलुषा हे त्याच्या नांवाचे विकृतीकरण आहे.
८. शिवरायांनी मिळविलेले स्वराज्य शंभूराजांनी घालविले.	शिवरायांच्या मृत्युसमयी असलेला राज्यविस्तार शंभूराजांनी दुप्पट केला. खजिना अनेकपट वाढविला. सेना दुप्पटीपेक्षा अधिक केली.
९. शंभूराजांनी शिर्के यांचे शिरकाण केले. (सर्व शिर्के मारले)	शिरकाण म्हणजे शिर्क्यांचा प्रदेश (जसे बागलाण, फिरंगाण) तो प्रदेश लुटला. शिर्क्यांचा बिमोड केला, कत्तल नव्हे.
१०. कवी कलश फितूर झाला होता.	कवी कलश शंभूराजांशी एकनिष्ठ होता. तो फितूर झाला नव्हता. अन्यथा शंभूराजांच्या

	वृंदावनाजवळ त्याचेही वृंदावन शाहूराजांनी बांधले नसते.
११. संगमेश्वरची बेफिकिरी नडली.	शंभूराजे बेफिकीर नव्हते. शेख निजाम ऊर्फ मुकर्रबखान घाट उतरून येणार याची त्यांना खात्री होती, म्हणून त्यांनी घाटात सर्वत्र गुप्तहेर पेरले होते; पण फितूर गणोजी शिर्क्यांनि त्याला वेगळा मार्ग दाखविला.
१२. औरंगजेबाने मुसलमान होत असशील तर जीवदान देतो असे सांगितल्यावर संभाजी महाराजांनी 'तुझी मुलगी देत असलास तर मुसलमान होतो' असे बाणेदारपणे सांगितले.	औरंगजेबाला पांच मुली होत्या. मोठी औरंगजेबाच्या कैदेत होती, धाकट्या तिघीं लग्न झालेल्या होत्या. दुसरी कन्या अविवाहित होती. ती शंभूराजांपेक्षा १४ वर्षांनी मोठी होती. म्हणजे जेव्हां शंभूराजे ३२ वर्षांचे होते तेव्हां ती ४६ वर्षांची होती आणि हा धर्मवीर असे बोलणे कदापीही शक्यच नाही.

परिशिष्ट - २
शंभूराजे आणि दिलेरखान प्रकरण

राष्ट्रवीर युवराज शंभूराजे कोण्या एका नैराश्यजनक काळी स्वराज्याला सोडून पळून जाऊन दिलेरखानाला मिळाले. त्याच्या सहकार्याने मराठी राज्य जिंकण्याचे मनसुबे रचू लागले. अखेर दिलेरखानाकडून भ्रमनिरास झाल्यावर पुनः स्वराज्यात परत येऊन, शिवरायांना भेटून त्यांनी क्षमा मागितली आणि महाराजांनी 'लेकरा, चुकला होतास; बरे झाले, परत आलास.' असे म्हणून त्यांचा स्वीकार केला ही इतिहासाने आणि कथा-कादंबऱ्यांनी लोकमानसांत घट्ट बसविलेली कथा आहे. तसे त्या घटनेला कागदोपत्री आधारही आहेत.

तथापि आमच्या मनाला ही घटना पटत नाही. हे असे घडणेच शक्य नाही, असे वाटते. बाळपणापासून शिवरायांच्या तालमीत तयार झालेला, आक्रमणाचा प्रसंग प्रत्यक्ष अनुभवलेला, राज्याभिषेकप्रसंगी युवराज म्हणून ख्यातनाम झालेला, ब्रिटिश वकिलानांसुद्धा निर्णायक राजकीय संवादात चक्रावून टाकणारा, प्रजाजनांच्या कळवळ्यामुळेच मंत्र्यांनीही अप्रिय होण्याची तमा न बाळगणारा, संस्कृतात काव्यरचना करण्याइतका विद्वान, बुद्धिमान आणि सामर्थ्यसंपन्न असलेला हा युवराज आपल्या जीवनाची अखेरही देदिप्यमान होतात्म्यानेच करतो. तो महापुरुष स्वराज्य-संस्थापक शिवरायांना सोडून बंड करण्यासाठी मोगलांना मिळेल हे पटत नाही. आणि ते जर खरे असेल, तर ज्याच्या मोगलांना मिळण्यामुळे भूपाळगडावर शेकडो मराठ्यांचे हात तुटले असा स्वराष्ट्राला धोका देणारा युवराज परत आल्यानंतर केवळ 'लेकरा चुकला होतास, बरे झाले, परत आलास' म्हणून त्याचा राष्ट्रघातकी, देशद्रोही गुन्हा क्षमा करून पुत्रप्रेमाने शिवाजी महाराज त्याला जवळ करतात, त्याला शिक्षा करीत नाहीत, हेही पटत नाही. रांझ्याच्या पाटलाला एका बाईशी केलेल्या वाह्यात वर्तनाबद्दल हात-पाय तात्काळ तोडून टाकण्याची शिक्षा देणारा, चंद्रराव मोरे यांचा शिरच्छेद करणारा, खंडोजी खोपड्यांचे हात-पाय तोडणारा, बेलवडीच्या ठाणेदारिणीशी रायगडच्या तुरुंगात लगट करण्याच्या प्रयत्नाबद्दल स्वतःचा मेहुणा सखुजी गायकवाड याचे डोळे काढणारा, कठोर न्यायी राजा शंभूराजांच्या अक्षम्य गुन्ह्याबद्दल पुत्रप्रेमापायी त्याला काही शिक्षा करीत नाही हे आमच्या मनांत ठसलेल्या शिवाजीराजांना शोभत नाही. मग या साऱ्या प्रकरणांचे गौडबंगाल आहे तरी काय ?

या घटनेचा मुख्य सत्य सांगाडा पुढीलप्रमाणे आहे. अर्थ आपल्याला लावायचा आहे.

१. १६७४ जून - शिवरायांना राज्याभिषेक झाला त्यावेळी शंभूराजांचे वय १७ वर्षे.

२. त्यानंतर सव्वादोन वर्षे रायगडावर महाराजांबरोबर शंभूराजांचे वास्तव्य.

३. राज्याभिषेकप्रसंगी शंभूराजे युवराज म्हणून घोषित.

४. सोयराबाई आणि काही मंत्री शंभूराजांच्या विरोधात.

५. रायगडावरून ऑक्टोबर १६७६ ला दक्षिणदिग्विजयाला महाराज निघाले, तेव्हां शंभूराजांची प्रभावळीचे सरसुभेदार म्हणून नेमणूक करून पन्हाळगड, शृंगारपूर, प्रभावळीकडे पाठवणी.

६. शंभूराजांचा २ वर्षे मुक्काम पन्हाळे, शृंगारपूर भागात.

७. या दरम्यान शंभूराजांचा दिलेरखानाशी पत्रव्यवहार झाला.

८. एप्रिल १६७८ - महाराज दक्षिणदिग्विजय आटोपून पन्हाळ्यावर.

९. नोव्हेंबर १६७८ - महाराजांच्या सूचनेनुसार शंभूराजे सज्जनगडावर.

१०. १३ डिसेंबर १६७८ - शंभूराजे मोगली गोटात दाखल.

११. २१ डिसेंबर १६७९ - शंभूराजे स्वराज्यात परतले. पन्हाळगडावर आगमन.

१२. १३ जानेवारी १६८० - शिवाजी महाराजांची भेट. संवाद - क्षमा.

उपरोक्त घटना घडल्या याबद्दल कोणताच वाद नाही. महाराजांचा राज्याभिषेक, शंभूराजे युवराज घोषित, सव्वादोन वर्षे रायगडी वास्तव्य हा सरळ विषय. इथून पुढचा भाग महत्त्वाचा.

सोयराबाईंच्या मनात कैकयी जागी झाली. राजारामाला युवराजपद मिळाले नाही, तेव्हां महाराजांनंतर त्याला काहीच मिळणार नाही हे लक्षात घेऊन त्यांनी राज्याच्या वाटणीचा विषय महाराजांजवळ काढला. प्रियपत्नीकडून अप्रिय विषय निघाल्यावर सर्वांचे जे होते तेच त्यांचेही झाले असेल असे वाटत नाही; पण हा विचार त्यांना यातना देणारा होता खास. महाराजांनी दक्षिणदिग्विजयाला जाताना रायगडावर कुरबुरी नकोत म्हणून आणि विजापुरात ठाण मांडून बसलेल्या मोगली छावणीवर बारीक नजर राहावी म्हणून शंभूराजांना पन्हाळ्यावर धाडले. आपण

परत येईपर्यंत मोगलांना पुढे सरकू देऊ नये ही अर्थातच शंभूराजांवर जबाबदारी. शत्रूला पुढे येऊ न देण्याचे दोन मार्ग. एक- आपल्या सामर्थ्याचा वचक, दुसरा- त्याच्याशी मैत्रीचे नाटक. शिवरायांचे राज्य कायमचे नेस्तनाबूत करण्याचा, औरंगजेबाचा मनसुबा होता. त्याने महाप्रचंड सेना विजापूरजवळ आणून ठेवली होती. ही सेना सकृद्दर्शनी विजापूरकरांना चेपीत होतीच; पण मुख्यतः मराठी राज्यावर आक्रमण करण्याच्या पवित्र्यात होती. त्यातच महाराज मोठी सेना घेऊन दूरच्या प्रांतात गेलेले. हे आक्रमण थोपवून धरण्यासाठी आणि दिलेरखानाला गाफील ठेवण्यासाठी शंभूराजांनी त्यांच्याशी पत्रव्यवहार केला. तसा मोगलांशी संधीबाबत शिवाजी महाराजांचा पत्रव्यवहार आधीपासून चालू होताच; पण ते शंभूराजांना ओलिस म्हणून पाठवायला तयार नव्हते.

स्वराज्यात चाललेल्या घडामोडी दिलेरखान आपल्या गुप्तहेरांद्वारे जाणून होता. कौटुंबिक भांडणाचा फायदा घेऊन शंभूराजांना फोडावा हा दिलेरखानाचा विचार, त्यादृष्टीने त्याने खडा टाकला. दिलेरखानाने प्रथम शंभूराजांना मोगली सेनेत येण्याने कसा फायदा होणार आहे याबद्दल आमिष दाखविले. त्याला झुलवत ठेवायचा हा मोका शंभूराजांना उत्तम मिळाला. त्यांनीही जिव्हाळ्याचे पत्र लिहिले. त्यात स्वतःच्या मनातले दुःख उघड करण्याचा आव आणला आहे. माझ्या बापाचे अंतःकरण सर्वथा सावत्र मातेने ग्रासून टाकले आहे. मला बापच नाही म्हणा ना. स्वतःची माता तर मला नाहीच. शनीची माझ्यावर वक्रदृष्टी चालू आहे..मोरोपंतादी दुष्ट प्रधान माझा उच्छेद करण्यासाठी टपले आहेत. ते राक्षस मला दृष्टीसमोर नकोत... (गो. स. सरदेसाई) अशाप्रकारे त्यांनी दिलेरखानाच्या मनात आपुलकी उत्पन्न केली आणि शंभूराजांना सहज फोडता येईल ही आशा त्याच्या मनात दुणावली.

दिलेरखानाने पत्र धाडले. औरंगजेबही गुणवान अशा तुला चाहतो. तू त्वरित इकडे निघून ये आणि त्याचा आश्रय घे... काहीही शंका न धरता ये... तुला तुझ्या इच्छेप्रमाणे बिनशर्त रहाता येईल. याला उत्तर म्हणून शंभूराजांनी कळविले की, ''हा देश माझ्या हातात टाकून वडील दूर गेले आहेत. ते येईपर्यंत मला इथून येता येणार नाही.'' अशी ही उभय पक्षांची ८-१० पत्रे झाली असावीत व त्यात वर्ष-दीड वर्ष सहज गेले असावे.

हा पत्रव्यवहार पाहिला म्हणजे शंभूराजांनी ही एक खोटीच भुलभुलावणी तयार केली होती असे दिसते. स्वराज्याविरुद्ध खरोखरच मोगलांना मिळायचे होते, तर

हीच उत्तम वेळ होती, महाराज सुमारे ६० हजार मावळ्यांना बरोबर घेऊन कर्नाटक-स्वारीवर गेले होते. बंडच करायचे होते, तर अशी सुवर्णसंधी पुनः कधी मिळणार होती ? पण शंभूराजांनी पत्रव्यवहारात वेळ काढला व महाराज येईपर्यंत मोगलांचे आक्रमण होऊ दिले नाही. १६७८ एप्रिलमध्ये महाराज दक्षिणेच्या स्वारीवरून परत आले ते प्रथम पन्हाळ्यालाच आले. त्यावेळी शंभूराजांनी हा सारा वृत्तांत महाराजांना सांगितला असला पाहिजे. मोगली सेनेत फितुरीच्या मिषाने जाऊन, तिचे सामर्थ्य जवळून समजून घेऊन, जमल्यास त्यांना झुलवीत ठेवण्याचा डाव महाराजांचाच असावा. कारण महाराज पावणेदोन वर्षे ६० हजार मंडळींसह महाराष्ट्राबाहेर होते. सेनेलाही विश्रांती देणे आवश्यक होते. शिवाय मिळवून आणलेल्या द्रव्याची व्यवस्था लावणे व नव्याने शस्त्रास्त्रे तयार करणे यासाठी उसंत हवी होती. म्हणून बंडखोरीचा आव आणून दिलेरखानाला मिळण्याची ही कामगिरी महाराजांनीच शंभूराजांवर सोपविली असावी. त्यानंतर महाराज रायगडास गेले. महाराजांच्या मागोमाग शंभूराजे गेले नाहीत; पण महाराजांच्या गुप्त सूचना शंभूराजांना मिळालेल्या असणार. अखेर महाराजांच्या सूचनेनुसार शंभूराजे मोगलांना जाऊन मिळाले असे आम्हाला का वाटते ? महाराजांकडे शंभूराजांबद्दल रायगडावर हेतुपूर्वक तक्रारी केल्या जात होत्या, सोयराबाई आणि त्यांच्या कोंडाळ्याकडून. महाराज त्याबद्दल काहीही करीत नाहीत हीही एक तक्रार असणार. अखेरीस महाराजांनी शंभूराजांना सज्जनगडावर जाण्याची आज्ञा केली. 'सज्जनगडावर जावे' याचा अर्थ, प्रथम सज्जनगडावर जाऊन तेथून योजनापूर्वक दिलेरखानाला मिळावे हाच असावा. दिलेरखानाला शंभूराजांनी मिळण्याचा महाराजांचा आणखी एक हेतू, स्वराज्यावर मोगली आक्रमण होऊ नये व ते विजापूर-भागानगरकडे व्हावे म्हणजे आपणांस अपेक्षित उसंत मिळेल हाही असावा. शिवरायांसारख्या राजकारणधुरंधर माणसाला समर्थ त्यावेळी गडावर नव्हते ते माहीत नसावे काय ? ते नाहीत असे पाहूनच त्यांनी शंभूराजांना पाठवले. तेथून शंभूराजांनी दिलेरखानाशी पत्रव्यवहार केला आणि आपण केव्हां येतो ते कळविले. दिलेरखानाने स्वागतास सैनिक पाठविले आणि माहुलीला जाण्याचे नाटक करून शंभूराजे मोगली छावणीत जाऊन दाखल झाले. काही इतिहासकारांचाआक्षेप असा आहे की, शंभूराजांची पत्रे हाच फुटून निघाल्याचा पुरावा आहे. आमचे म्हणणे एवढेच की, जर शंभूराजांचा आम्ही म्हणतो तसे खोटेखोटेच सामील होण्याचे नाटक करून मोगली सेनेचे आक्रमण टाळण्याचा

होता, तर त्यांनी पत्रात काय लिहिले असते ? ' आम्ही आपल्यात शिरून कारस्थान करू इच्छितो. ' असे लिहिले असते का ?

मोगलांना मिळाल्यानंतर पांच महिन्यांत स्वराज्यावर एकही स्वारी झाली नाही. एप्रिल १६७९ ला भूपाळगडची लढाई झाली. किल्लेदार होता, फिरंगोजी नरसाळा. शंभूराजांनी त्याला पत्र पाठवून किल्ला सोडून द्यायला कळविले. प्रचंड मनुष्यहानी त्यांना दिसत होती. फिरंगोजीने विशेष खळबळ न करता जुजबी लढाईला तोंड देत गड सोडला. या लढाईचेवेळी भीमसेन सक्सेना हा मोगलांच्याबरोबर होता. त्याने लिहून ठेवलेल्या वृत्तांतात या लढाईत शंभूराजे उपस्थित असल्याचा किंवा मराठ्यांचे हात तोडल्याचा किंवा भीषण क्रूर कत्तल केल्याचा एकही उल्लेख नाही. असो.

दिलेरखान विजापूर गिळंकृत करण्याच्या योजनेत होता. सारी मोगली छावणी त्या वेळी औरंगाबादेस होती. शिवाजीमहाराजांनी विजापूरकरांशी सख्य केले आणि आपली सेना घेऊन प्रदेश जिंकत महाराज जालन्यापर्यंत येऊन पोहोचले. तथापि दिलेरखान शंभूराजे व आपल्या सेनेसह ज्वालगिरी, तिकोट लुटत अथणीपर्यंत आला. तिकोट्यास त्याने हिंदू जनतेवर भारी अत्याचार केले, तेव्हां शंभूराजांचे व दिलेरखानाचे भांडण झाले, मारामारीची वेळ आली आणि त्या झटक्यात शंभूराजे मोगली आश्रय सोडून निघाले. शिवाजीमहाराजही तडक पन्हाळगडावर आले. डिसेंबर १६७९ मध्ये शंभूराजे मोगल छावणीतून निसटले आणि विजापुरास गेले. तेथील सरदार मसऊदखान याने महाराजांनी दिलेल्या सूचनेनुसार तीन हजार सैनिकांसह शंभूराजांना पन्हाळगडावर सुखरूप पाठविले. २१ डिसेंबर १६७९ ला शंभूराजे पन्हाळ्यास आले.

शंभूराजांच्या परत येण्यावर डच, इंग्रज, पोर्तुगीज, मुसलमान सर्व पत्र व बखरलेखकांनी नाना तर्ककुतर्क लढविले आहेत. ते पळून गेले, ते शिवाजीच्या आश्वासनावर भरंवसा ठेवून गेले इत्यादी नाना कल्पना केलेल्या आहेत.

शिवाजीमहाराजांनी आपला सावत्रभाऊ व्यंकोजी यास पत्र लिहून ते वर्तमान कळविले आहे. ते लिहितात... चिरंजीव राजश्री संभाजीराजे मोगलाईत गेले होते. त्याला आणावयाचा उपाय बहुतप्रकारे केला. त्यासही कळो आले की, ये पातशाहीत अगर विजापूरचे अगर भागानगरचे पातशाहीत आपले मनोगतानुसार चालणार नाही. ऐसे जाणोन त्यांनी आमचे लिहिण्यावरून स्वार होऊन आले. त्यांची आमची भेट झाली. घरोब्याचे रीतीने समाधान करून ये तैसे केले.

आता या पत्रावरून शंभूराजे स्वेच्छेने स्वराज्य सोडून गेले होते हे स्पष्ट दिसते. शिवाय हे खुद्द महाराजांचे स्वतःचे पत्र आहे. मग ? यावरही आमचे उत्तर असे की, हे पत्र शिवाजीमहाराजांचे आहे. शिवाजीमहाराज राजकारणधुरंधर होते. त्यांचे राजकारण अत्यंत पाताळयंत्री होते. ते तिकडे जातो म्हणत तिकडे जात नसत. गणदेवीला जाण्याचे जाहीर केले, सुरतेला गेले. यालाच राजकारण म्हणतात.

शंभूराजे स्वराज्याला सोडून गेले होते हेच सकृद्दर्शनी सर्वत्र प्रसारित करायचे होते. तरच त्यांचे काम ते उत्तमप्रकारे करू शकतील आणि मोगलांचा विश्वास संपादन करू शकतील.

सर्वांत महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, खरोखरीच स्वराज्याच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे हे शंभूराजांचे कर्म असते, तर शिवरायांनी त्यांचा निश्चित शिरच्छेद केला असता, कडेलोट केला असता. त्यांना अत्यंत कठोर शिक्षा केली असती. केवळ आपला मुलगा म्हणून त्याची गय केली असेल, तर आजच्या नेत्यांच्यात आणि शिवरायांत कोणता फरक करता येईल ?

म्हणून आमचा निष्कर्ष स्पष्टपणे असा आहे की, दक्षिणेच्या स्वारीवर जाताना महाराजांनी शंभूराजांवर मोगलशाहीशी लाडीगोडीचे संबंध निर्माण करून त्यांना थोपवून ठेवण्याची कामगिरी दिली होती. ती २ वर्षे त्यांनी यशस्वी केली. २ वर्षांनी महाराज परतले. आता अंतरंगभेदाचे काम महाराजांनी सोपवले. शंभूराजे आपल्याला सोडून गेल्याचे नाटक केले आणि काम होताच त्यांना परत बोलावले. आल्यावर सर्व लोकांसमोर, 'लेकरा, चुकला होतास, बरे झाले, परत आलास. मला सोडू नको. औरंगजेबाचा आपला दावा तुजला दगा करावयाचा होता; परंतु श्रीने कृपा करून सोडून आणिला. थोर कार्य जाहले.' असे महाराज बोलले, हेही नाटकच !

हे कारस्थान इतके गुप्तपणे झाले की, महाराजांजवळ वावरणाऱ्या कवींना, विद्वानांना, राजकारण्यांनाही याचा मागमूस लागला नाही. राष्ट्रकार्यासाठी जीवनभर झगडणारे, राष्ट्रकार्यात मृत्यूही पत्करणारे आणि राष्ट्रकार्यासाठी राष्ट्रद्रोहाच्या पातकाचा कलंक तीनशे वर्षे आपल्या कीर्तीवर सहन करणारे धन्य ते शंभूराजे !

परिशिष्ट - ३
शंभूराजांच्या चरित्रातील महत्त्वाचे दिनांक

शंभूराजांचा जन्म	१४ मे १६५७
सईबाईचा मृत्यू	५ सप्टेंबर १६५९
अफझलखानाचा वध	११ नोव्हेंबर १६५९
पुरंदरचा तह	१३ जून १६६५
शंभूराजे जयसिंगाच्या छावणीत	१८ जून १६६५
शंभूराजांना मनसबदारी फर्मान	२२ सप्टेंबर १६६५
आग्र्याकडे प्रस्थान	५ मार्च १६६६
आग्र्याच्या सीमेवर	११ मे १६६६
आग्र्याचा दरबार	१२ मे १६६६
महाराज नजरकैदेत	२५ मे १६६६
सुटका	१७ ऑगस्ट १६६६
शंभूराजे राजगडावर	२० नोव्हेंबर १६६६
शंभूराजे औरंगाबादेस मोअज्जमकडे निघाले	९ ऑक्टोबर १६६७
राजारामाचा जन्म	२४ फेब्रुवारी १६७०
शंभूराजांना कारभार सोपवला	२६ जानेवारी १६७१
रामनगर जव्हार मोहिमेत	१६७२
महाराजांचा राज्याभिषेक	६ जून १६७४
जिजाबाईंचे निधन	१७ जून १६७४
शंभूराजांचे उपनयन	४ फेब्रुवारी १६७५
महाराजांच्या मृत्यूची अफवा	डिसेंबर १६७५
गोवा, उत्तरकर्नाटक, भागानगर मोहिमा	१६७५-१६७६
महाराजांचे दक्षिणेकडे प्रयाण	ऑक्टोबर १६७६
शंभूराजांचा कलशाभिषेक	२३ मार्च १६७८
रायगडास महाराजांचे पुनरागमन	११ मे १६७८

महाराजांचा मुक्काम पन्हाळ्यास	१० सप्टेंबर १६७८
शंभूराजे सज्जनगडी	२० ऑक्टोबर १६७८
दिलेरखानाकडे प्रयाण	१३ डिसेंबर १६७८
भूपाळगडची लढाई	२ एप्रिल १६७९
दिलेरखानाकडून सुटका	२२ नोव्हेंबर १६७९
विजापूरहून पन्हाळ्याकडे	१ डिसेंबर १६७९
पितापुत्रांची भेट	१३ जानेवारी १६८०
राजारामाचा विवाह	१५ मार्च १६८०
शिवरायांचे निधन	३ एप्रिल १६८०
राजारामाचे मंचकारोहण	२१ एप्रिल १६८०
शंभूराजे रायगडावर	१८ जून १६८०
पुतळाबाई सती गेल्या	२७ जून १६८०
शंभूराजांचे मंचकारोहण	२० जुलै १६८०
मोरोपंतांचा मृत्यू	ऑक्टोबर १६८०
शंभूराजांचा राज्याभिषेक	१६ जानेवारी १६८१
औरंगाबाद, जालना, मेहेकरवरील हल्ले	मे १६८१
अकबराचे आगमन	१ जून १६८१
रायगडावरील कठोर शासन	ऑगस्ट १६८१
सोयराबाईचे निधन	२७ ऑक्टोबर १६८१
अकबराची भेट	१३ नोव्हेंबर १६८१
मराठ्यांची फोज अहमदनगरावर	नोव्हेंबर १६८१
दंडाराजपुरीस वेढा	डिसेंबर १६८१
रामसेजचा वेढा	एप्रिल १६८२
कल्याण - भिवंडीची लढाई	मे १६८२
येसूबाईंना पुत्र झाला	१८ मे १६८२
म्हैसूरकरांशी युद्ध	जून १६८२
बादशहाची प्रतिज्ञा	३० जुलै १६८२
रामसिंगाला संस्कृत पत्र	१६८३
टिटवाळ्याची लढाई	मार्च १६८३
तारापूरवर हल्ला	१५ एप्रिल १६८३

रुहुल्लाखान परतला	एप्रिल १६८३
चौलला वेढा	ऑगस्ट १६८३
मोअज्जमची दक्षिणकोकणात रवानगी	१३ सप्टेंबर १६८३
दिलेरखानाची आत्महत्या	२० सप्टेंबर १६८३
पोर्तुगीजांचा उत्तरकोकणातील प्रभाव	ऑक्टोबर-नोव्हेंबर १६८३
फोंड्याची लढाई सुरू	१ नोव्हेंबर १६८३
शंभूराजे फोंड्यात घुसले	१० नोव्हेंबर १६८३
विजरेई आल्व्हारो पळाला	११ नोव्हेंबर १६८३
जुवे बेट जिंकले	२४ नोव्हेंबर १६८३
साष्टबारदेशवर चढाई	११ डिसेंबर १६८३
मोअज्जमची फटफजिती	फेब्रुवारी १६८४
रायगडावरील फितुरांना अटक	३० ऑक्टोबर १६८४
शहाबुद्दिनचा पराभव	१४ जानेवारी १६८५
धरणगांव लुटले	फेब्रुवारी १६८५
विजापूर मदतीसाठी मराठी फौजा रवाना	मार्च १६८५
मोगलांचा विजापूरला वेढा	एप्रिल १६८५
मराठ्यांची भडोचकडे मोहीम	डिसेंबर१६८५
विजापूरचा पाडाव झाला	१२ सप्टेंबर १६८६
शहाजाद्याकडून मादण्णा आकण्णांचा खून	१६ मार्च १६८६
मोअज्जमला बादशहाने कैद केले	२१ फेब्रुवारी १६८७
अकबर इराणकडे गेला	फेब्रुवारी १६८७
कुतुबशाहीचा पाडाव	२२ सप्टेंबर १६८७
वाईच्या लढाईत हंबीरराव ठार	ऑक्टोबर १६८७
कवी कलशवर गणोजीचा हल्ला	ऑक्टोबर १६८८
शंभूराजांना संगमेश्वरी अटक	३ फेब्रुवारी १६८९
कैद शंभूराजे बहादूरगडाजवळ	१५ फेब्रुवारी १६८९
शंभूराजांची धिंड	१५ फेब्रुवारी १६८९
बादशहापुढे हजर	१५ फेब्रुवारी १६८९
कवी कलश व शंभूराजे यांच्या जिभा व डोळे काढले	१७ फेब्रुवारी १६८९

मोगली छावणी भीमातीरी आली	३ मार्च १६८९
कवी कलश व शंभूराचे यांचा अत्यंत निर्दयी वध	११ मार्च १६८९

अभिप्राय क्र. १२

लेफ्टनंट कर्नल प्र. न. मोडक (निवृत्त)
प्लॉट क्र. ३०६/३०७/३१०, सेक्टर 'सी' एन-१
सिडको, औरंगाबाद ४३१ ००३

प्रा.सु.ग.शेवडे यांनी लिहिलेले 'शंभूराजे' हे पुस्तक माझ्या वाचनात आले. वैरभावनेने अंध झालेल्या व्यक्तींकडून जेव्हां जेव्हां घटनांची नोद केली जाते, त्यामुळे इतिहासाचे वास्तव पुसले जाऊन काल्पनिक इतिहासच कसा सत्य वाटू लागतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे संभाजी महाराज. ज्या मुलाला लहानपणापासून शिवाजीराजांचा आदर्श दिसत होता तो एकदमच इतका देशद्रोही होऊन स्वतःचे व राष्ट्राचे स्वातंत्र्य धोक्यात आणेल ही कल्पना खरी वाटत नाही, असे असूनही सर्वांपुढे सातत्याने संभाजी म्हणजे एक करंटाच जन्माला आला होता हा भास निर्माण करण्यात त्याचे वैरी यशस्वी झाले असेच म्हणावे लागेल.

प्रा. शेवडे यांनी 'शंभूराजे' ह्या पुस्तकाद्वारे गैरसमज दूर करण्याचे प्रयत्न केले आहेत ते निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत. एखादी व्यक्ती अत्यंत चैनी, ख्यालीखुशाली, रंगेल असली तर मृत्यू समोर दिसत असताना आणि शरीराचे हाल हाल होत असतानाही निर्भय व स्वाभिमानी राहील असे दृश्य दिसणार नाही; परंतु शंभूराजे ज्या अर्थी कष्ट सोसायला तयार झाले आणि शेवटी त्यातच त्यांचा मृत्यू झाला, त्या अर्थी त्यांची या तऱ्हेची पुढे प्रतिमा जी उभी करण्यात आली ती चुकीची वाटते. रंगेल मनुष्य तेव्हांच शरण गेला असता. सत्ता हाती आल्यानंतर ती डोक्यात चढून काही प्रमाद त्यांच्या हातून झाले असतील; पण त्यामुळे ते सर्वस्वी निकम्मा होणे शक्य नाही व हे त्यांनी शत्रूशी दिलेल्या प्रखर झुंझीवरून स्पष्ट होते. दुही, वैरभाव, स्वार्थ, घरभेदीपणा याची अनेक उदाहरणे आपल्या इतिहासात आहेत; पण एखाद्या व्यक्तीचे संपूर्ण चरित्रच खऱ्याचे खोटे करून कसे उखडून टाकता येते हे संभाजीबद्दलच्या चरित्रामधून जे आपल्याला दिसते, ते कसे चुकीचे होते व मुळात वास्तवरूप काय होते हे प्रा.शेवडे यांनी सुस्पष्ट केले आहे.

एक योद्धा या नात्याने त्याचे युद्धकौशल्य उच्च दर्जाचे होते असे मला वाटते आणि हे काम चारित्र्यहीन व्यक्तीकडून होणे अशक्य आहे अशी माझी दृढ कल्पना आहे. संभाजी-महाराजांबद्दलचे बरेचसे गैरसमज या पुस्तकाद्वारे दूर होतील, अशी आशा आहे.

–प्र. ना. मोडक

परिशिष्ट - ४ : शेर शिवा का छावा था!

देश धरम पर मिटने वाला
शेर शिवा का छावा था।।
महापराक्रमी परम प्रतापी
एक हि शंभू राजा था।।
तेजःपुंज तेजस्वी आँखें।
निकल गयीं पर झुका नहीं।।
दृष्टि गयी पण राष्ट्रोन्नति का।
दिव्य स्वप्न तो मिटा नहीं।।
दोनो पैर कटे शंभू के।
ध्येय मार्ग से हटा नहीं।।
हाथ कटे तो क्या हुआ?।
सत्कर्म कभी भी छुटा नहीं।।
जिव्हा कटी, खून बहाया।
धरम का सौदा किया नहीं।।
शिवाजी का बेटा था वह।
गलत राह पर चला नहीं।।
वर्ष तीन सौ बीत गये अब।
शंभू के बलिदान को।।
कौन जीता, कौन हारा।
पूछ लो संसार को।।
कोटि कोटि कंठों में तेरा।
आज जयजयकार है।।
अमर शंभू तू अमर हो गया।
तेरी जयजयकार है।।
मातृभूमि के चरण कमलपर।
जीवन पुष्प चढाया था।
है दुजा दुनिया में कोई।
जैसा शंभू राजा था?।।

—शाहीर योगेश

परिशिष्ट - ५ : कवी कलश

कवी कलश हा कनोजी ब्राह्मण, प्रयागजवळ राहणारा. काशी येथे भोसले कुळाचा कुलोपाध्याय होता. इ.स. १६६६ मध्ये शिवाजीमहाराज व युवराज संभाजी आग्र्याहून परत येताना युवराज संभाजी व कवि कलश यांची भेट झाली. 'कवींमध्ये कलश' श्रेष्ठ या अर्थाचा कविकलश हा किताब त्यास होता.

संभाजीमहाराजांचा हा सर्वांत अधिक विश्वासांतील सेवक होता. इ.स. १६८४ पूर्वी कविकलशास संभाजीराजांनी 'छंदोगामात्य' हे पद दिले. याचा अर्थ-वेदशास्त्रामध्ये पारंगत अमात्य असा होतो. इ.स. १६८३ मध्ये कविकलश 'कुलयेख्तियार' म्हणजे कारभाराचे अध्यक्ष म्हणून नेमले गेले.

कवी कलशाचे व्यक्तिमत्त्व असामान्य होते. त्याने संस्कृत आणि हिंदी भाषेत ग्रंथरचना केली आहे. तो संभाजीमहाराजांचा राजकीय तसेच साहित्यिक गुरु होता. कविकलश फक्त प्रशासनाच्या क्षेत्रात कार्य करीत होता असे नाही. तो युद्धाच्या कामगिरीवरही जात असे.

कविकलश औरंगजेबाला फितूर होता, त्यानेच संभाजीराजांना बिघडविले व त्याच्यामुळेच संभाजीराजांचा नाश झाला, असा आरोप कविकलशावर लादण्यात येतो; परंतु या मतास कोणताही ठोस आधार नाही. राजाराममहाराजांनी कवी कलशाच्या मुलास वतनाच्या सनदा करून दिल्याचे प्रसिद्ध संशोधक सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी म्हटले आहे. पुढे शाहूमहाराज स्वराज्यात आल्यावर त्यांनी संभाजी-महाराजांचे वृंदावन, वढू बु.॥ येथे बांधले. त्याच वृंदावनाशेजारी कविकलश यांचेही वृंदावन बांधले. त्या काळी लोक कवि कलशास बेइमान, फितुर मानत असते, तर शाहूमहाराजांनी संभाजीमहाराजांच्या वृंदावनाजवळ कविकलशाचे वृंदावन बांधले नसते.

—प्रा. डॉ. वसंत शंकर मोरे

परिशिष्ट - ६ : शंभूराजांची संस्कृत रचना

शंभूराजांनी स्वतः रचलेल्या 'बुधभूषण' या राजनीतिशास्त्राच्या संस्कृत ग्रंथातील आत्मचरित्रात्मक निवडक श्लोक–

भृशत् बलान्वयसिंधु सुधाकरः प्रथितकीर्त उदार पराक्रमः।
अभक्त अर्थकलासु विशारदो जगति शाहनृपः क्षितिवासवः।।

(सिंधु सुधाकरासारखे प्रचंड बलशाली, कीर्तिवान, उदार, पराक्रमी व अर्थ कलांमध्ये विशारद असे राजे शहाजी होऊन गेले.)

यस्य अनेक वसुंधरापरिवृढप्रोत्तुंग चूडामणेः।
पुत्रत्त्वं समुपागतः शिव इति ख्यातः पुराणे विभुः।।

(त्या शहाजीराजांना महापुर मुलखाचे धनी असलेले, लोकांना डोंगरासारखे उत्तुंग वाटणारे, पुराणातील पुरुषश्रेष्ठ शिवासारखे राजे शिवाजी हे पुत्रश्रेष्ठ झाले.)

तस्यात्मजः शंभुरितिप्रसिद्धः समस्त - सामंत - शिरोवतंसः।
यः काव्यसाहित्यपुराणगीतकोदंडविद्यार्णव पारगामी।।
विविच्य शास्त्राणि पुरातनानामादाय तेभ्यः खलुसोयमर्थम्।
करोति सद्ग्रंथममुं नृपालः स शंभुवर्मा बुधभूषणाख्यम्।।

(त्या शिवाजीराजांच्या भोवतीच्या साऱ्या राजेलोकांना शिरोभूषण वाटणारा, काव्य, साहित्य, पुराण, संगीत, धनुर्विद्या यांचे ज्ञान घेतलेला मी पुत्र शंभूराजे या नांवाने प्रसिद्ध आहे. प्राचीन शास्त्रांचे विवेचन करून, त्यांतील अर्थपूर्ण भाग निवडून मी शंभुवर्मा, हा बुधभूषण नांवाचा सद्ग्रंथ रचित आहे.)

संदर्भ ग्रंथ

१.	मराठी रियासत	गो. स. सरदेसाई
२.	छ.संभाजी स्मारक ग्रंथ	डॉ. जयसिंगराव पवार
३.	छ.संभाजी महाराजांचे चिकित्सक चरित्र	वा. सी. बेंद्रे
४.	सभासद बखर	सं. शं. ना. जोशी
५.	चिटणीस बखर	सं. र. वि. हेरवाडकर
६.	श्री शिवछत्रपती	त्र्यं. शं. शेजवलकर
७.	परमानंद काव्यम् - अनुपुराण	अनु. डॉ. द्रविड
८.	शिवपुत्र संभाजी	डॉ. कमल गोखले
९.	जेथे शकावली	सं.आपटे, दिवेकर
१०.	हिंदवी स्वराज्य आणि मोगल	सेतुमाधवराव पगडी
११.	मराठे व औरंगजेब (मुस्तैदखान)	अनु. से.मा. पगडी
१२.	पेशवे दप्तर खंड ३९ ते १३८	
१३.	मराठ्यांच्या इतिहासाची साधने	वि. का. राजवाडे
१४.	राजनीति	रामचंद्रपंत अमात्य
१५.	उग्रप्रकृती संभाजी	गो. स. सरदेसाई
१६.	असे होते मोंगल-मनुची	अनु ज. स. चौबळ
१७.	मराठ्यांच्या इतिहासाची साधने (पोर्तुगीज दप्तर)	सं. पां. स. पिसुर्लेकर
१८.	मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध	खाफीखान अनु.से.मा.पगडी
१९.	मोंगल-मराठा संघर्ष	ईश्वरदास नागर अनु. से. मा. पगडी
२०.	संभाजीकालीन पत्रसारसंग्रह	सं. शं. ना. जोशी
२१.	राजा शंभूछत्रपती	श्री. विजय देशमुख
२२.	मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर	श्री. शं. श्री. पुराणिक
1.	History of Aurangzib	Jadunath Sarkar
2.	Rise of Maratha Power	M. G. Ranade
3.	History of the Marathas	James Grant Duff
4.	Historical Fragments	Ormes
5.	New History of the Marathas	G. S. Sardesai

महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार, प्रवचनकार, **धर्मभूषण प्रा. सु. ग. शेवडे** यांचे व्यावहारिक शिक्षण एम्.ए., एम्.एड् पर्यंत झालेले असून, सोळा वर्षे त्यांनी शिक्षणक्षेत्रात शिक्षक, मुख्याध्यापक, प्राध्यापक इत्यादी पदे भूषवून सेवा केली आहे. १९७६ पासून ते पूर्णवेळ प्रवचने, कीर्तने, व्याख्याने इत्यादी माध्यमांतून धर्मसेवा करीत आहेत.



धर्मभूषण प्रा.सु.ग. शेवडे
एम्.ए., एम्.एड्.
जन्म दि. १९ जुलै १९३५

प्रा.शेवडे यांचे आतापर्यंत सुमारे अकरा हजार कार्यक्रम झाले आहेत. त्यांनी जगातील पंधरा देशांचा प्रवास केला असून, इंग्लंड, अमेरिका, कॅनडा इत्यादी देशांत त्यांची शेकडो प्रवचने झाली आहेत. एकटच्या अमेरिकेत त्यांनी सात वेळा दौरे करून तेथील ८५ शहरांत, त्यांची सुमारे साडेपाचशे प्रवचने झाली आहेत. इंग्रजी, मराठी, हिंदी आणि गुजराती या चार भाषांतून त्यांची प्रवचने असतात. अमेरिकेतील विश्वहिंदू परिषदेच्या बॅटनरूज आणि लॉसएन्जलिस येथील संमेलनात ते सहभागी झाले होते.

महाभारत, रामायण, शिवचरित्र, भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास, ज्ञानेश्वरी, भगवत्‌गीता, उपनिषदे, हिंदूधर्म, भारतीय संस्कृती, शंभूराजे इत्यादी विविध विषयांवर ते बोलतात.

फेब्रुवारी १९८९ मध्ये कोल्हापूर येथे भरलेल्या अखिल भारतीय कीर्तन संमेलनासाठी प्रा.शेवडे यांची स्वागताध्यक्ष म्हणून निवड झाली होती आणि १९९५ मध्ये आयनी येथील अखिल भारतीय युवक कीर्तनकार संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

जगद्‌गुरु शंकराचार्य संकेश्वर पीठाकडून धर्मभूषण, काशी येथील विद्वत्‌सभेकडून प्रवचनरत्न, गोवा कीर्तन संमेलनात कीर्तनविशारद, कोल्हापूर येथील सिद्धिविनायक सांस्कृतिक सेवा मंडळाकडून भारताचार्य इत्यादी पदव्या त्यांना मिळाल्या आहेत. महाराष्ट्रातील एक नामवंत अभ्यासक, वक्ते व प्रवचनकार म्हणून ते प्रसिद्ध आहेत.

त्यांची १२ पुस्तके प्रसिद्ध आहेत – १) नऊ महर्षी, २) चित्रगुप्त - एक शास्त्रीय सिद्धांत, ३) १९७१ चे अभिमन्यु, ४) शांतिपर्व कथासार, ५) शेवडेजींची अमेरिकेतील प्रवचने, ६) महाभारतः व्यासांचे आणि चोप्रांचे, ७) शंभूराजे, ८) भारतीय संस्कृती, ९) पुत्र अमृताचा, १०) गजानन बावन्नी, ११) कथाभारत, १२) मम सुखाची ठेव.